नगरपालिका नगर वाचनालय, कऱ्हाड.

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९९०



# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04283

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04283
DATE: 8/6/2015

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

१९९२

— वर्ष २० वे —

923.60954/NAG
Y.C.P. LIBRARY
G04283

* प्रकाशन –

**प्रा. श्रीनिवास खांदेवाले, नागपूर**

यांचे शुभहस्ते

दिनांक १२ मार्च १९९३

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.

* प्रकाशन स्थळ –

**यशवंतराव चव्हाण स्मृति-सदन**

कऱ्हाड नगरपालिका, कऱ्हाड.

* प्रकाशक –

**श्री. पांडुरंग दादासाहेब पाटील**

अध्यक्ष

कऱ्हाड नगरपालिका, कऱ्हाड ४१५११०.

* मुद्रक –

**श्री. गजानन रामचंद्र गिजरे**

४०४ - ४०५ गुरुवार पेठ, कऱ्हाड.

फोन : २१५६

* मुद्रणस्थळ –

**लोकमान्य मुद्रणालय,**

४०४ - ४०५ गुरुवार पेठ, कऱ्हाड ४१५ ११०.

किंमत रु. ४०/–



जया वाटते प्रेरणा ती मिळावी ।
तयाने ग्रंथसेवा करावी ॥

# मनोगत

सन १९९२ सालच्या विसाव्या ' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले ' त आदरणीय साहेबांच्या जयंतीदिनी " एक वक्ता - एकच विषय " या व्याख्यानमालेच्या प्रथेस अनुसरून डॉ. भा. ल. भोळे, नागपूर यांना या वेळी प्रयत्नपूर्वक व्याख्याते नेमस्त केले होते.

डॉ. भोळे नागपूर विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्रदीर्घ अनुभवी प्राध्यापक, त्या विषयाचे गाढे अभ्यासक, महाराष्ट्रातील एक थोर साहित्यिक. व्यासंगी - विचारवंत, विशेषतः चव्हाणसाहेबांच्या चतुरस्त्र नेतृत्वावर प्रगाढ श्रद्धा असलेले परखड व्यक्तिमत्व म्हणून सुपरिचित आहेत. त्यांनी " आपल्या विकासाची दिशा आणि लोकशाहीचे भवितव्य " या सद्यस्थितीतील अत्यंत महत्वाच्या व मूलगामी अशा विषयावर सलग तीन दिवस व्याख्यानातून अभ्यासपूर्ण - मौलिक विचार कराडवासियांना ऐकविले आहेत, त्या बद्दल आम्ही डॉ. भोळे यांचे आभारी आहोत.

आदरणीय यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या सबंध राजकीय जीवनात समाज प्रबोधन आणि समाज परिवर्तन या कार्यांना अनन्यसाधारण महत्व दिले होते; ते कार्य या पुढेही तसेच तेवत रहावे या जाणीवेतून सन १९७३ पासून ' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले ' ची सुरुवात केली. या व्याख्यानमालेत व्यक्त झालेल्या मौलिक विचारांचा प्रभाव पाहून आणि कांही व्यासंगी सज्जनांच्या सूचनेवरून अशी अभ्यासपूर्ण आणि निवडक व्याख्याने

पुस्तकरूपाने प्रकाशित केली. हा उपक्रम स्तुत्य - प्रशंसनीय ठरलेला आहे. त्या प्रोत्साहनातून निवडक व्याख्याने शब्दबद्ध करुन ती पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा पायंडा असाच पुढेही चालू ठेवण्याचा 'मनोदय' आहे. पुस्तक रुपातील विचारांचा हा मौलिक ठेवा भावी पिढीस दीपस्तंभाप्रमाणे जरुर मार्गदर्शक ठरेल, अशी आमची श्रद्धा आहे.

सदर पुस्तक मे लोकमान्य मुद्रणालय, कऱ्हाडचे श्री. गजानन गिजरे व त्यांचे वाकबगार व मेहनती कामगार यांनी वेळेतच नव्हे तर सुबक छपाई करून दिलेबद्दल त्या सर्वांचे आभार !

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेच्या निमित्ताने साहेबांच्या जयंतीदिनी त्यांना 'उदंड आयुरारोग्य लाभावे' म्हणून प्रार्थना करावयाची पण . . . . ते सर्वांचे आदरणीय - प्रिय 'साहेब' आज आपल्यात नाहीत ! सामान्यांबद्दल सतत आत्मीयता बाळगून तसे वागणारा चतुरस्त्र नेता कृष्णाकाठी कायमचा विसावला आहे ! त्यांच्या पवित्र स्मृतीला ही निर्मिती विनम्र सादर समर्पण !

कऱ्हाड **पी. डी. पाटील**

दि. १२-३-१९९३ **नगराध्यक्ष**

अं
त
रं
ग

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

१९९२

## वर्ष २० वे

## विषय : " आपल्या विकासाची दिशा आणि लोकशाहीचे भवितव्य "

प्रतिपादन : डॉ. भा. ल. भोळे,
नागपूर विद्यापीठ, नागपूर


- १२ मार्च - मा. यशवंतराव चव्हाण यांची विकासविषयक संकल्पना : अपेक्षा व फलश्रुती
- १३ मार्च - विकासाचा विनाशकारी नमुना
- १४ मार्च - विकासाचे पर्यायी प्रतिमान



# व्याख्यात्यांचा परिचय

डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे यांचा जन्म १९४२ साली झाला. त्यांचे शालेय शिक्षण जळगांव जिल्ह्यातील वरणगांव येथे झाले. त्यांनी त्यांचे महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन शिक्षण औरंगाबाद येथे पूर्ण केले. १९६२ साली त्यांनी बी. ए. ची पदवी प्रथम श्रेणीत मिळविली आणि त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून राज्यशास्त्र हा विषय घेवून ते १९६४ साली प्रथम श्रेणीतच एम. ए. झाले. पुढे त्यांनी 'भारतीय शेतकरी कामगार पक्ष' या तत्कालीन महत्वाचे विषयावर १९८२ साली नागपूर विद्यापीठास प्रबंध सादर केला आणि ते पीएच. डी. झाले.

ज्ञानलालसेतून त्यांनी अध्यापनाचा पवित्र व्यवसाय जाणीवपूर्वक निवडला आणि त्याप्रमाणे सुरवातीस पदवीपर्यंतचे अध्यापनकार्य औरंगाबाद येथे केले. १९७० सालापासून त्यांनी नागपूर विद्यापीठात राज्यशास्त्राचे पदव्युत्तर अध्यापन केले. सध्या ते तेथे राज्यशास्त्राचे प्रपाठक आणि विभाग प्रमुख म्हणून दुहेरी जबाबदारी पूर्ण कार्यक्षमतेनें पार पाडीत आहेत.

साहित्यातील त्यांची कामगिरीही नजरेत भरण्यासारखी झालेली आहे. महाराष्ट्रातील प्रतिष्ठित नियतकालिकामधून त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वाङ्मयीन विषयावर शेकडो लेख प्रसिद्ध झालेले आहेत. समाज प्रबोधन पत्रिका, आजचा सुधारक, शब्दसंगत, विचारशलाका, पर्याय, इत्यादि वैचारिक नियतकालिकांचे सल्लागार व संपादक म्हणून त्यांनी कामगिरी बजाविली आहे. तसेच 'युगवाणी' आणि 'अक्षरवैदर्भी' या वाङ्मयीन नियतकालिकांचे संपादनाशी संबंधित म्हणून त्यांनी कार्य केलेले आहे. आजपर्यंत विविध विषयावरील त्यांची १६ पुस्तके प्रकाशित झालेली असून बारावीपासून एम. ए. पर्यंतच्या राज्यशास्त्राचे अभ्यासास त्यापैकी काही नेमलेली आहेत. त्यांच्या "म. जोतिराव फुले: वारसा व वसा" या पुस्तकास १९९१ मध्ये 'चेतश्री' पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांच्या याच पुस्तकास १९९१-९२ सालचा 'महात्मा जोतिराव फुले पुरस्कार' महाराष्ट्र शासनाने नुकताच जाहीर केलेला आहे. तसेच त्यांनी 'महादेव गोविंद रानडे' व 'इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टीकोन' हे दोन ग्रंथ अनुवादित केलेले आहेत.

सामाजिक कार्यातही त्यांचा मोलाचा सहभाग आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, लोकविज्ञान संस्था, दलित चळवळ, हुंडाविरोधी आघाडी या व अशा सामाजिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध आहे. त्याशिवाय त्यांनी मराठी विश्वकोषाच्या संपादक मंडळाचे सदस्य, महाराष्ट्र राज्य दर्शनिका समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाच्या इतिहास समितीचे सदस्य-क्रमिक पुस्तके निर्मितीत प्रमुख सहभागदार, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य,

जनसाहित्य संमेलन (अमरावती) अध्यक्ष, विदर्भ साहित्यसंघ कार्यकारिणी सदस्य - उपाध्यक्ष, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ शास्त्रज्ञ समितीचा सदस्य, महाराष्ट्र राज्य शास्त्र परिषदेच्या १२ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र विधीपीठाच्या (जळगांव) राज्यशास्त्र मंडळाचा सदस्य आदि जबाबदाऱ्या सांभाळून सन्मान प्राप्त केला आहे.

महाराष्ट्रातील एक थोर साहित्यिक, परखड विचारवंत, राज्यशास्त्रातील गाढें अभ्यासक - व्यासंगी म्हणून आणि विशेषत: आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या सर्वसमावेशक वृत्तीवर आणि चतुरस्त्र नेतृत्वावर श्रद्धा, विश्वास व नितांत आदर असलेली एक प्रमुख व्यक्ती म्हणून ते सर्वत्र ओळखले जातात.

**पी. डी. पाटील**
नगराध्यक्ष

पत्ता :

**डॉ. भा. ल. भोळे,**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
नागपूर विद्यापीठ,
नागपूर - ४४० ०३२

# आपल्या विकासाची दिशा
# आणि
# लोकशाहीचे भवितव्य

१२ मार्च १९९२

## ' मा. यशवंतराव चव्हाण यांची विकासविषयक संकल्पना : अपेक्षा व फलश्रुती

डॉ. भा. ल. भोळे
नागपूर विद्यापीठ, नागपूर

करा़ड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आणि आजच्या सभेचे अध्यक्ष माननीय श्री. पी. डी. पाटील, उपाध्यक्षा श्रीमती अश्विनी डुबल आणि श्रोतृवृंदात बसलेले आमचे मित्र श्री. ठोके, श्री. ढोले, श्री. पाटील आणि कराडवासीय नागरीक बंधु-भगिनींनो, गेल्या अनेक वर्षांपासून मला या व्याख्यानमालेसाठी संयोजकांनी निमंत्रण दिले. पण त्यांनी वारंवार बोलावूनही आणि माझी येण्याची प्रामाणिक इच्छा असूनसुद्धा मला येता आले नाही. या वर्षी मात्र खरोखरच मी ठरवून टाकलं होतं की यंदा कराडला जायचंच. किंवा खरं सांगायचं तर मी वाट पहात होतो आपल्या निमंत्रणाची असं म्हटलं तरी चालेल. ज्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही

व्याख्यानमाला गेल्या वीस वर्षांपासून सुरु आहे, त्या यशवंतराव चव्हाणांच्याबद्दल मला अत्यंत मनापासून आदर आहे. साधारणतः राजकीय नेते, आजच्या अध्यक्षांची क्षमा मागून मी असं म्हणेन, राजकीय नेते, कुठल्याही पक्षाचे असोत, राजकीय नेते आणि मी यांच्यातला आकडा नेहमी छत्तीसचा असतो. फार सख्य असं माझं कोणत्याही नेत्याशी नाही आणि सामान्यतः राजकारणात क्रियाशील असलेल्या लोकांच्यापासून चार हात लांब रहावं असा माझा स्वभाव आहे. पण त्याला अपवाद चव्हाणसाहेबांचा आहे. या माणसाच्या व्यक्तीमत्त्वाने मला अनेक अर्थांनी भुरळ घातली आहे. केवळ राजकीय नेता म्हणून नाही तर एक अत्यंत संवेदनाक्षम असा कलाकार म्हणूनसुद्धा, लेखक म्हणून, चतुरस्त्र असा वक्ता म्हणून आणि एक अत्यंत मूलगामी अशी दृष्टी असलेला लोकनायक या अर्थाने सुद्धा. त्यामुळे त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या जन्मभूमीला आणि कर्मभूमीला जाऊन त्यांच्या स्मृतीला अभिवादन करणं हा मी माझा गौरव समजतो. ही संधी मला या व्याख्यानमालेनं मिळवून दिली ही अत्यंत आनंदाची गोष्ट वाटते. मी याप्रसंगी यशवंतरावांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करतो आणि माझ्या भाषणाचा प्रारंभ करतो.

आपल्या विकासाची दिशा आणि लोकशाहीचं भवितव्य या विषयाची मांडणी मी तीन व्याख्यानांतून करणार आहे. पहिल्या भाषणात आज मी माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या विकासविषयक कल्पना, अपेक्षा आणि त्याची फलश्रुती अशी मांडणी करणार आहे. उद्याच्या व्याख्यानामध्ये आपण आतापर्यंत केलेल्या विकासाच्या संदर्भात "विकासाचा विनाशकारी नमुना" अशी मांडणी करण्याचा प्रयत्न मी करणार आहे आणि

मग या विकासाच्या वाटचालीला पर्यायी अशा प्रकारच्या विकासाचं प्रतिमान असू शकतं काय याचा विचार मी तिसऱ्या व्याख्यानामध्ये करीन. अशारीतीने प्रतिपाद्य विषयाची विभागणी मी तीन भागांत केलेली आहे.

यशवंतराव चव्हाण यांची एक विकास कल्पना होती आणि ती विकासकल्पना त्यांना कुठल्या प्रबंधातून, पुस्तकातून वा कुठल्या सूत्रातून सुचण्याऐवजी प्रत्यक्ष जीवनक्रमातून सुचलेली होती. या संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊन यशवंतराव चव्हाण आले आणि मुंबईच्या त्या समुद्रकाठी मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून त्यांनी महाराष्ट्रामध्ये समाजवादाचा पहिला पाळणा हालेल असे सांगितले. ' सोनियाचा दिवस आज अमृते पाहिला ' अशा शब्दांत त्यांनी त्या सोहळ्याचं वर्णन केले. तो जो क्षण होता तो यशवंतरावांच्या मनातल्या महाराष्ट्राच्या एका नीलचित्राला प्रत्यक्ष साकार करण्याच्या संकल्पाचा मंगलदिन होता. त्यांच्या मनामध्ये संयुक्त महाराष्ट्राचं एक चित्र होतं. इथल्या आर्थिक विकासाचं, राजकिय विकासाचं एक चित्र होतं. आणि त्याची मांडणी त्यांनी वेळोवेळी केलेली आहे असं आपल्याला दिसून येतं.

स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच त्यांच्या मनामध्ये महाराष्ट्राच्या विकासाचं एक सूत्ररूप बीजारोपण झालेलं आपल्याला दिसून येते. कुठेतरी तेव्हाच्या राष्ट्रीय नेत्यांना स्वातंत्र्याचा अभिप्रेत असलेला अर्थ हा फार वरवरचा आहे, हा शहरी वर्गीयांचा आहे, उच्चवर्णियांचा आहे. खेड्यात राहणाऱ्या, शोषणाला बळी पडणाऱ्या, वंचित असणाऱ्या कितीतरी तळागाळातल्यांच्या

दृष्टीने स्वातंत्र्याचा आशय काय असेल याची मांडणी राष्ट्रीय नेत्यांच्या स्वातंत्र्यविषयक चिंतनात नाही याची खंत यशवंतरावांना होती. " कृष्णाकाठ " मध्ये त्यांनी ती व्यक्तही केली आहे. स्वातंत्र्य आंदोलनाच्या व्यासपीठांवरून जी स्वातंत्र्याविषयी भाषणं व्हायची त्यात व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा, राजकीय स्वातंत्र्य अशा गोष्टींची चर्चा होत असे. परंतु ग्रामीण शेतकऱ्याचे प्रश्न, दारिद्र्याचे प्रश्न, बेरोजगारीचे प्रश्न यांची मांडणी फारशी होत नसे. खेड्यांतून पसरलेला जो अफाट मोठा समाज आहे त्यांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांची मांडणी त्यात नसे याची खंत त्यांनी नमूद केली आहे.

सामान्य माणसाच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ काय ? महात्मा गांधींनी ज्यावेळी स्वातंत्र्य संकल्पनेची मांडणी केली तेव्हा यशवंतराव गांधींच्या या मांडणीकडे आकर्षित झाले. गांधीजी म्हणाले होते, समाजातल्या शेवटच्या सामान्य माणसाला सार्व–भौम सत्तेच्या विरोधात जोपर्यंत उभे राहता येत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थानं स्वातंत्र्य मिळालं असं मी म्हणणार नाही. फाटक्यातला फाटका नागरिक आज सत्तेच्या विरोधात उभा राहिला पाहिजे. आणि यशवंतरावांना कुठेतरी ही खूणगाठ पटली की हेच आपल्या स्वराज्याचे सूत्र आणि ध्येय आहे. सामान्य माणसाची स्वायत्तता, सामान्य माणसाचा स्वाभिमान आणि सामान्य माणसाचा आत्मविश्वास वाढावा, सामान्य माणसाची मुळं बळकट व्हावी. सशक्त मुळं असलेला माणूसच कुठल्याही सत्तेच्या विरोधात उभा राहू शकतो. सामान्यतः अनुभव असा आहे की राजकीय प्रतिकारशक्तीच नव्हे तर शारीरिक प्रतिकारशक्तीसुद्धा खेड्यातील शेतकऱ्यांची साधारणतः

जेवढी असते तेवढी शहरी कारखान्यात काम करणाऱ्या, फॅक्टरीत काम करणाऱ्या मजुराची नसते आणि त्याला एक कारण आहे. ते असे की शेतीत राबणाऱ्या, कष्ट करणाऱ्या माणसाचा आपल्या मुळांशी जैव संबंध असतो. ऑरगॅनिक संबंध टिकून असतो. कारखान्यात मजूर मुळांपासून तुटलेला असल्यामुळे दुबळा झालेला असतो. त्याची प्रतिकारशक्ती क्षीण झालेली असते. त्यामुळे यशवंतरावांचा असा ठाम आग्रह होता की विकास हा शेतीशी संबंधित असाच असला पाहिजे. विकासाची गंगा सामान्य माणसाच्या उंबरठ्यापर्यंत गेली पाहिजे.

यशवंतराव हा एक जाणता नेता होता. प्रत्यक्ष अनुभवांतून, जीवनानुभवांतून त्यांनी भोवतालची परिस्थिती नीट समजावून घेतलेली होती. स्वातंत्र्याचा सकारात्मक अर्थ त्यांना आपल्या नेतृत्वाची पायाभरणी करीत असतानाच गवसला होता. यशवंतरावांचं नेतृत्व हे वीटेवर वीट ठेवून पायरीपायरीनं क्रमशः तयार झालेलं नेतृत्व होतं. एकदम प्रकाशझोतात येऊन काल–पर्यंत अज्ञात असलेली एखादी व्यक्ती महान नेता होतो तसा चमत्कार हा यशवंतरावांच्याबद्दल घडलेला नव्हता. नेतृत्वासंबंधीची त्यांची धारणासुद्धा अशीच आहे की नेतृत्व हे सामूहिक परिणाम करणारं असावं. यशवंतरावांनी असा सामूहिक परिणाम करण्याचा प्रयत्न केला. संबंध समाजाचं, भोवतालच्या समाजाचं उन्नयन करणारा, निश्चित अशी वैचारिक भूमिका असणारा, लोकांच्या मनाची मशागत करणारा तोच खरा नेता. राजकीय स्वार्थासाठी लोकांच्या भावना भडकावून देणारा खरा नेताच नव्हे! विकासासाठी–खऱ्याखुऱ्या ग्रामीण विकासासाठी ज्या नेतृत्वाची आवश्यकता आहे ते नेतृत्व कसं असावं? तर ते संवेदनशील

असावं, समूहातून वर आलेलं असावं, समूहाशी साक्षात संवाद असलेलं असावं आणि समूहाला काहीतरी वैचारिक दिशा देणारं असावं. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाबळेश्वरला काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरात त्यांचं भाषण झालं तेव्हा त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना एक सांगितलं की मला जे नेतृत्व हवं आहे ते असं की ज्याच्यापुढे विकासाचा योजनाबद्ध व निश्चित कार्यक्रम असेल असंच नेतृत्व यापुढे काहीतरी करु शकेल. केवळ घोषणा करुन भागणार नाही तर या समाजाच्या सर्व उपलब्ध साधनसंपत्तीच्या आधारे येथील जनतेच्या विकासाच्या सर्व व्यक्त - सुप्त शक्तींना जे प्रवाहित करील आणि प्रवाहित करण्यासाठी ज्याच्यापाशी निश्चित असा कार्यक्रम असेल असे नेतृत्व यापुढं महाराष्ट्रात टिकेल.

यशवंतरावांच्या विकास कल्पनेविषयी बोलत असताना मी मुद्दामच अपेक्षा व फलश्रुती हे दोन्ही शब्द वापरले हे आपल्या लक्षात आलं असेल आणि यशवंतरावांनी ज्या ज्या अपेक्षा बाळगल्या - नेतृत्वासंबंधी, विकासासंबंधी, शेतीसुधारणेसंबंधी, सहकारासंबंधी, विकेंद्रीकरणासंबंधी, शिक्षणासंबंधी, त्या सगळ्या पूर्ण झालेल्या आहेत असे कोणीही म्हणणार नाही. मीही म्हणत नाही. विकासाची जी संकल्पना यशवंतरावांनी रेखाटली ती पूर्ण झालेली नाही. पण हे सर्व मान्य करून सुद्धा एक बाब नि:संशय उरतेच; ती ही की त्यांनी विकासाची जी रूपरेषा रेखाटली ती नीट समजून घेणे आजसुद्धा आवश्यक आहे. यशवंतरावांना ती साकार करण्यात अपयश आले असेल तर त्या अपयशाचीसुद्धा मीमांसा झाली पाहिजे. त्याच दृष्टीनं त्यांना यश कुठें आले आहे आणि अपयश कुठे आले आहे याचा ताळेबंद माझ्या पद्धतीने

मांडण्याचा मी प्रयत्न करीन. त्याचप्रमाणे अपयश जर आले असेल तर ते अपयश कोणत्या कारणांनी आले याची मला सापडणारी जी कारणं आहेत ती विशद करण्याचा मी प्रयत्न करीन, त्यातून माझ्या पुढच्या व्याख्यानाचं एक सूत्र हाती येऊ शकेल अशी माझी अपेक्षा आहे.

यशवंतरावांनी केलेली मांडणी १०० टक्के प्रत्यक्षात आलेली आहे अशी माझी धारणा नाही. हे मी सुरुवातीस यासाठी सांगतोय की जन्मदिनी भाषण देत असताना कदाचित कुणाला असे वाटेल मी केवळ गौरव करण्यासाठी इथं उभा आहे. प्रश्न तो नाही. हा नेता एवढा थोर आहे की त्याच्या अपयशातसुद्धा त्यांचा मोठेपणा सामावलेला आहे. आणि अपयशाची मीमांसा होणंसुद्धा आज यासारख्या वैचारिक व्यासपीठावरुन आवश्यक आहे, असे प्रामाणिकपणे मानणारा मी माणूस आहे. त्यामुळेच विकासाच्या त्यांच्या संकल्पनेची मांडणी करीत असताना मी प्रथम सर्व तपशीलांसह त्यांना अभिप्रेत असलेला विकासाचा आराखडा आपल्यासमोर ठेवीन. त्यानंतर यशापयश आपण पाहू. आणि मग यशापयशाची मीमांसा व्याख्यानाच्या शेवटी करु.

सर्वप्रथम एक गोष्ट विकासाबद्दल यशवंतराव स्पष्ट करतात ती अशी की "विकास" हा सहेतुक व योजनापूर्वक घडून आलेलाच असावा. समाजात यदृच्छयाही बदल होतच असतात. समाज बदलत असतो. कुठलाही समाज स्थिर राहात नाही. तो नित्य बदलत असतो. पण त्याला आपण विकास म्हणत नाही. विकास हा विशिष्ट दिशेने करावयाचा असतो आणि जाणीवपूर्वक करायचा असतो. त्याच्यामधली सहेतुकता फार महत्वाची असते.

काहीतरी नीट योजून, काही कालबद्ध कार्यक्रम निश्चितपणे ठरवून घेऊन त्याची दिशा ठरवून त्या दिशेने जाणे विकास-प्रक्रियेत अंगभूत असते. त्याचप्रमाणे विकास हा सर्वांगीण असायला पाहिजे. एकाच क्षेत्रात विकास झाला आणि बाकीची क्षेत्रं जर लंगडी पडली तर पक्षाघात झालेल्या शरीराप्रमाणे त्या समाजाची अवस्था होईल, हा इशाराही यशवंतरावांनी त्यावेळेला दिलेला आहे. महाराष्ट्राचे जे वेगवेगळे प्रदेश आहेत, त्या प्रदेशा-मध्ये विकासाबाबत संतुलन राहणं या राज्याच्या भवितव्यासाठी आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं होतं. विकास हा केवळ एका भागात होऊन चालणार नाही, एका वर्गात होऊन चालणार नाही, तर सगळ्या वर्गांना त्याचे फायदे मिळावेत अशा प्रकारचा हा विकास असला पाहिजे. हा समन्वित विकास पाहिजे, यावरही त्यांचा कटाक्ष होता. शेतीच्या क्षेत्रात विकास, शिक्षणाच्या क्षेत्रातला विकास आणि आरोग्याच्या क्षेत्रातला विकास या सर्व क्षेत्रांतील विकासांचा एक अन्योन्य संबंध असतो. विकास नेहमीच समन्वित (इंटिग्रेटेड), असला पाहिजे, संतुलित पाहिजे. अशा–प्रकारे सर्वांगीण, समन्वित आणि संतुलित अशा प्रकारच्या विकासाचे एक प्रतिमान यशवंतरावांनी महाराष्ट्रासमोर मांडले. म्हणजे जनतेच्या विकासाच्या सर्व शक्ती मोकळ्या करणं, तसंच विकासाच्या प्रक्रियेमध्ये जनतेने प्रत्यक्ष सहभागी होणं - जनतेच्या वतीने कोणीतरी सहभागी न होता जनतेनेच प्रत्यक्ष सहभागी होणं - शिक्षण, सहकार, आरोग्य इ. सर्व क्षेत्रांमध्ये समता, समृद्धी आणि परिवर्तनक्षमता यांचा परिपोष होणं, समाजामध्ये जी कमालीची विषमता आहे ती क्रमाक्रमाने नष्ट होणं, थोडक्यात सामान्यांच्या जीवनामध्ये व्यापक स्वरूपाची क्रांती घडून येणं

हे या विकासाचे अंतिम साध्य आहे. ज्या समाजस्तरांना आजपर्यंत राजकीय प्रक्रियांमध्ये सहभागी होता आलेलं नाही, इथें राजवटी आल्या व गेल्या पण ज्यांचा जीवनक्रम वर्षानुवर्षे जसाच्या तसा राहिला आहे अशा, पूर्णपणे राजकारणाच्या वर्तुळाच्या बाहेर राहिलेल्या जनसामान्यांना व्यापक अर्थानें राजकारण करता यावं ही प्रेरणा यशवंतरावांच्या विकास संकल्पनेच्या मुळाशी होती. व्यापक अर्थानं राजकारण मी मुद्दामच म्हणतोय. व्यक्तीला अर्थपूर्ण सहभाग करता यावा, निर्णयप्रक्रियेत भाग घेता यावा, तिला या लोकशाहीचा एक आधार होऊन राहता यावं, सत्तेच्या क्षेत्रातील मक्तेदारी, मिरासदारी मोडीत निघून सत्ता ही खऱ्या अर्थाने लोकांपर्यंत जावी हे या राजकारणात अभिप्रेत असते. लोकांची सत्ता हा केवळ शब्दप्रयोग न राहता, ती केवळ संविधानातील एक तरतूद न राहता ती प्रत्यक्ष वस्तुस्थिती व्हावी. म्हणजेच ग्रामीण जीवनातील मक्तेदारी, आर्थिक मक्तेदारी, राजकीय मक्तेदारी, जातीय मक्तेदारी नष्ट होईल. मिरासदारी नष्ट व्हावी, सरंजामीवृत्ती नष्ट व्हावी व एकापरीने सगळे जे सामाजिक संबंध आहेत त्यांच्यामध्ये क्रांतिकारक बदल घडून यावेत, जे आम्ही पिढ्यानपिढ्या सहन करतोय ते या पुढच्या पिढ्यांना सहन करावं लागू नये अशा पद्धतीने या समाजाची वाटचाल व्हावी.

ठोस शब्दामध्ये सांगावयाचं झालं तर माणूस, जमीन आणि पाणी यांचा योजनापूर्वक निश्चित अशा हेतुंनी कार्यक्षम वापर करून घेणं हे यशवंतरावांना अभिप्रेत असलेल्या विकासाच्या मागचं सूत्र होतं. जे सबंध मनुष्यबळ उपलब्ध आहे-जे केवळ

शहरात नव्हे, खेड्यात नव्हे तर अगदी पाड्यापर्यंत, जंगलातल्या आदिवासींपर्यंत उपलब्ध आहे - ह्या सगळ्या मनुष्यबळाचा नीट वापर, पद्धतशीर वापर करणे. जे पाणी उपलब्ध आहे, त्या पाण्याचा सर्वांनी लाभ होईल अशा पद्धतीने वापर करणे. जमिनीचा वापर समस्त शेतकरी वर्गाला लाभ होईल अशाप्रकारे केला जाणं त्यांना अपेक्षित होतं. शेतकऱ्याचा मुलगा असलेले यशवंतराव शेतीबद्दल फार सखोल चिंतन करताना आपल्याला दिसतात. ही शेतजमीन, ही काळी आई जीवनदाती आहे हे जाणून सबंध विकासाचा जो नमुना आखायचा तो जमिनीला मध्यवर्ती ठेवूनच आखावा लागेल अशी त्यांची धारणा होती.

आजपर्यंतचा विकास-कार्यक्रम शेतीकडे दुर्लक्ष करून राबविला गेलेला आहे. त्यामुळे शेतीची अवस्था वाईट झाली आणि म्हणूनच खेड्यांचं कंगालीकरण झालं. खेड्यांचं कंगालीकरण झालं म्हणून शहरांकडे फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झालं. हे सर्व चित्र जर पालटवायचं असेल, तर शेती सुधारली पाहिजे, शेतीचं आधुनिकीकरण झालं पाहिजे, शास्त्रीय पद्धतीने शेती केली गेली पाहिजे, शेती परवडली पाहिजे.

शेती विकासाच्या संदर्भात शेतीविषयक शिक्षणाचे महत्व यशवंतरावांनी ओळखले होते. महाराष्ट्र राज्यात कृषिविद्यापीठांनी शेतकीच्या क्षेत्रात जे मूलभूत महत्त्वाचे कार्य व नवनवे प्रयोग केले ती यशवंतरावांच्या दूरदृष्टीचीच फलश्रुती आहे. त्यांना हे अपेक्षित होतं की या विद्यापीठांनी शेतीला पूरक पोषक असलेलं विज्ञान आणि शेतकरी यांची हातमिळवणी केली पाहिजे. परभणीच्या कृषीविद्यापीठाच्या उद्घाटनाच्या वेळी त्यांनी केलेलं

भाषण अप्रतिम आहे. त्यात ते असं म्हणतात की, शेतीची पदवी घेतलेल्या माणसांनी शेतकी खात्यातल्या नोकऱ्या मिळवण्यासाठीच जर लाईन लावली किंवा केवळ त्यांना शेतकी महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या नोकऱ्यांचेच जर आकर्षण पडलं तर त्यापेक्षा अधिक मोठी शोकांतिका दुसरी असणार नाही. शेतीच्या पदवीधरांनी प्रत्यक्ष शेती पहायला पाहिजे. त्यांनी सुशिक्षित शेतकरी झालं पाहिजे. पारंपारिक जी काही शेती चालत आलेली आहे त्यातलं चांगलं ते घेऊन आधुनिक शेतीशी त्याचा मेळ घालण्याचं सर्जनशील कार्य त्यांनी केलं पाहिजें. त्या दृष्टीनं ज्याला प्रतिभा लागते असं कार्य करण्याची तयारी या शिक्षित पदवीधरांची असली पाहिजें. प्रयोग, संशोधन, व्यवहार व विस्तार या चार अंगांनी या विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या उपयोगी पडलं पाहिजें असं मी (ते) म्हणतो. नवनवीन शेतीतील प्रयोग झाले पाहिजेंत. खतांचे प्रयोग, पिकांचे प्रयोग, बी-बियाण्यांचे प्रयोग झालें पाहिजेंत. त्यांच्यावर संशोधन झालं पाहिजें. आणि हें संशोधन केवळ कागदोपत्री राहू नये किंवा केवळ पदव्यांसाठी वापरलं जाऊ नये, तर हे संशोधन प्रत्यक्ष व्यवहारात यावं, सार्वत्रिक व्यवहारात यावं, त्याचा विस्तार व्हावा, एक्स्टेन्शन व्हावं, एक्स्टेन्शन सर्व्हिसेस - विस्तार सेवा या विद्यापीठाकडून शेतकऱ्यांना उपलब्ध व्हाव्यात या बाबीवर यशवंतरावांनी आपल्या भाषणातून भर दिला होता. आमचे मित्र ना. धों. महानोर यांनी अलिकडे एक पुस्तक यशवंतरावांवर लिहिले आहे आणि ते त्यात असं म्हणतात की हे भाषण ऐकत असताना मला असं वाटलं की ते जातिवंत शेतकऱ्याचं हृदगत आहे. शेतीचा केवळ पदवीधर हे बोलू शकणार नाही. परदेशात जाऊन शेतीविषयक काही अभ्यास

करून आलेले हे काही बोलू शकणार नाहीत तर प्रत्यक्ष शेतकऱ्याला कुठें काय बोचतं त्याची जाणीव असलेला शेतकऱ्याचा मुलगाच हे बोलू शकतो.

शेतीविषयक हे यशवंतरावांचं चिंतन पाहता त्यांची अशी दृढ धारणा दिसते की या देशाचा ७० टक्के समाज हा शेतकरी आहे आणि जोपर्यंत तो दुस्थितीत आहे तोपर्यंत राज्य करण्याला काही अर्थ राहणार नाही. शेतीचा प्रश्न हा क्रमांक एकचा राष्ट्रीय प्रश्न आहे आणि येथील नवसमाजाची आधारतत्त्वं सबंधपणे संपूर्णपणे शेतीशीच निगडीत आहेत. त्यामुळे शेतीशी संबंधित असलेला समाज -"कृषी औद्योगिक समाज" अशी संज्ञा आज आपण त्याच्यासाठी वापरतो - कृषी औद्योगिक समाज निर्माण करणं ही काळाची गरज आहे. विकासाचं ते एक लक्ष्य असायला पाहिजे, ध्येय असायला पाहिजे अशी मागणी यशवंतरावांनी केलेली होती. या देशामध्ये कृषी औद्योगिक समाजाचं अत्यंत स्पष्ट चित्र सर्वप्रथम यशवंतरावांनी रेखाटलं होतं. धनंजयराव गाडगीळ त्यांच्याबरोबर होते, पद्मश्री विखे पाटील त्यांच्याबरोबर होते, वसंतरावदादा पाटलांनीही काही काम केले होते. हे सगळं खरं आहे. पण शासनाची शक्ती कृषी औद्योगिक समाजाच्या उभारणीच्या पाठीशी यशवंतराव चव्हाणांनीच सर्वप्रथम उभी केली. कसं होतं या कृषिऔद्योगिक समाजाचं चित्र ? या देशाच्या औद्योगिकरणाचा सांधा शेतीशी जोडला जावा. ग्रामीण भागात कारखानदारी निघाली पाहिजे. शेतीसाठी ज्या गोष्टी लागतात - ज्यांना इनपुटस् असं इंग्रजीमध्ये आपण म्हणतो - उदाहरणार्थ रासायनिक खतं, बी-बियाणं किंवा आणखीन बाकी सगळ्या

गोष्टी, त्या तयार करणारे कारखाने खेड्यात निघाले पाहिजेत. शेतमालावरती प्रक्रिया करणारे उद्योगधंदे खेड्यात निघाले पाहिजेत आणि हे उद्योगधंदे कुणा बाहेरच्या भांडवलदारांनी येऊन खेड्यात काढायचे नाहीत तर स्थानिक लोकांनी सहकाराच्या मार्गाने एकत्र येऊन संघटित शक्ती उभी करून, संघटित मालकी निर्माण करून हे उद्योगधंदे काढायचे. याचा अर्थ असा की आज जी मूठभर भांडवलदारांची पकड या समाजाच्या राज्यसत्तेवर बसलेली आहे ती जर सोडवायची असेल आणि खऱ्या अर्थाने ग्रामीण भागापर्यंत जर राज्यसत्ता पोहचवायची असेल तर त्यासाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर लागतं, जी अधोसंरचना, जी पायाभूत रचना लागते ती निर्माण करणं हे या कृषिऔद्योगिक समाजाचं लक्ष्य आहे. केवळ खेड्यामध्ये ग्रामोद्योग सुरु केले किंवा खेड्यात इतरही उद्योगधंदे काढले की कृषि-औद्योगिक समाज आपोआप निर्माण होईल असं मात्र नाही. कृषि-औद्योगिक समाज हे साध्य होतं, ध्येय होतं. त्यातला " समाज " हा शब्द अधिक महत्वाचा आहे मी नंतरच्या प्रतिपादनात ते सांगणार आहे की आजही आपण हा " समाज " नजरेआड ठेवला आहे. कृषि-औद्योगिक रचना पुष्कळ झाल्या पण एक नवा समाज मात्र अस्तित्वात आलेला नाही. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे समाजातल्या सर्व व्यक्त आणि सुप्त शक्ती उत्पादनासाठी क्रियान्वित करण्याची संधी आणि सामर्थ्य उपलब्ध करून देणारा संतुलित समाज म्हणजे कृषिऔद्योगिक समाज होय ! समाजातल्या सर्व शक्तींना क्रियान्वित करण्याचं – विकासाच्या सर्व शक्ती असं म्हणत असताना केवळ चार सधन, वरचढ व्यक्तींची शक्ती नाही तर अगदी पार शेवटच्या फाटक्या माणसापर्यंत जी शक्ती आहे तिचा

विकास होणं यात अपेक्षीत असते. लोकशाहीचा हा विश्वास आहे की सामान्यातला सामान्य माणूस जरी असला तरी तो एक शक्ती आहे, तो एक शक्तीपुंज आहे आणि या शक्तीपुंजाला प्रज्वलित करणे, त्याला विकासाच्या कामासाठी उत्पादनाच्या कार्यासाठी क्रियान्वित करणं हे शासनव्यवस्थेचे कार्य आहे.

तेव्हा केवळ खेडयात उद्योगधंदे निर्माण करून शहरं आणि खेडी यांच्यातलं अंतर कमी करणं एवढयापुरतं हे साध्य मर्यादित नाही. किंबहुना जर अशा प्रकारच्या संस्था खेडयात निर्माण झाल्या आणि त्या मूठभर श्रीमंतांची श्रीमंती वाढवण्यास कारणीभूत ठरल्या तर तो यशवंतरावांच्या विकास-कल्पनेचा पराभवच ठरतो. यशवंतरावांच्या विकासकल्पनेत या गोष्टीवर विशेष कटाक्ष होता की हे उद्योग म्हणजे श्रीमंतांच्या हातातली खेळणी होऊ नयेत. त्यासाठीच त्यांनी सहकारी संस्थांवर भर दिला होता. सहकारी संस्थांवर शहरी वर्तमानपत्रांमध्ये येणारी टीका यशवंतरावांनी परतून लावली होती. त्यानी सांगितलं होतं की ही बरीचशी टीका जी केली जाते ती पूर्वग्रहदूषित आहे. या वर्तमानपत्रांना खेडयातल्या व्यक्तींच्या आकांक्षा समजू शकत नाहीत, महत्वाकांक्षा समजू शकत नाहीत, त्यांच्या कर्तृत्वाचा यांना परिचय नाही आणि त्यामुळे त्यांनी आपल्या कर्तृत्वामधून उभ्या केलेल्या या संस्थांना हे लोक गालबोट लावतात. पण ही शहरवासीयांकडून होणारी टीका अनुदार आहे हे म्हणत असतानाच यशवंतरावांनी सहकाराच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या अपप्रवृत्तींनासुद्धा आळा घातला पाहिजे हे आवर्जून सांगितले होते. सहकारी संस्था श्रीमंतांच्या हातातली खेळणी होता कामा नयेत, ही केवळ स्थानीय गुंडपुंडांची आश्रयस्थाने होता कामा

नयेत, एकाच व्यक्तीच्या हाती तहहयात सहकारी संस्था कायमच्या राहू नयेत, एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांचे अध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे असू नये हे सर्व यशवंतराव जे म्हणत होते त्यातून त्यांना अभिप्रेत असलेली कृषि-औद्योगिक समाजरचना स्पष्ट होते. ज्याच्यामध्ये एक सामूहिक पुरुषार्थ उभा राहू शकेल, सामान्यातील सामान्य माणसाचा सहभाग यामध्ये मिळू शकेल आणि ग्रामीण जीवनाशी एकरुप असलेले, एकजीव असलेले उद्योगधंदे खेड्यामध्ये निघू शकतील असा हा आदर्श समाज यशवंतरावांना हवा होता. येथील निर्णयअधिकार कोणाकडे जाईल ? या कृषि-औद्योगिक समाजाच्या सगळ्या निर्णयांचा - कोणते उपक्रम, त्यांचे कोणते अग्रक्रम. केव्हा काय करावयाचे यासंबंधीचे सर्व निर्णय घेण्यासंबंधीचा अधिकार गावातल्या लोकांनाच असावा, म्हणून गावपातळीवर निर्णयसत्ता यावी असा त्यांचा आग्रह होता.

यशवंतरावांच्या विकासकल्पनेमध्ये विकेंद्रीकरणाच्या योजनेला अनन्यसाधारण महत्व होते. तशी विकेंद्रीकरणाची योजना ही नवी नव्हती परंतु ती योजना ज्या पद्धतीने महाराष्ट्रात राबविली गेली ती कौतुकास्पद आहे. आजही राजस्थान वगळता देशात विकेंद्रित लोकशाही किंवा लोकशाही विकेंद्रीकरण हे फक्त महाराष्ट्रातच कार्यक्षमपणे राबविले जात आहे, याचा निर्वाळा अनेक अभ्यासकांनी दिला आहे आणि त्यात काहीही अतिशयोक्ती नाही. विकेंद्रित लोकशाहीचे प्रयोजन हे केवळ स्थानिक पातळीवर सत्ताकेंद्र निर्माण करणं हे नाही तर ती सत्ताकेंद्र खऱ्या अर्थाने स्थानिक विकासाची निर्णयकेंद्रे म्हणून राबविली जाणं अपेक्षित आहे. एखादा आमदार निवडून येऊ शकला नाही तर त्याला

सामावून घेण्यासाठी म्हणून तळपातळीवर विकेंद्रीकरणाच्या या जागांचा उपयोग करणं हे मुळीच अभिप्रेत नाही. मतदारांनी नाकारलेल्या उमेदवारांचे पांजरापोळ हे विकेंद्रित लोकशाहीचं स्वरूप नाही किंवा हे त्याचं प्रयोजनही नाही तर खऱ्या अर्थाने पुढाकार, उपक्रमशीलता व निर्णयप्रक्रिया ही गावाच्या पातळीवर घडून आली पाहिजे. त्यामुळे आपल्या सगळ्या विकेंद्रीकरणाच्या ढाच्यामध्ये ग्रामसभेला कमालीचे महत्व आहे. ग्रामसभा ही आज कोठेही भरत नाही ही वस्तुस्थिती खेदजनक आहे. परंतु ग्रामसभेचे प्रयोजन जर आपण पाहिले तर गावच्या सर्व स्त्रीपुरुष प्रौढ नागरिकांनी एकत्र येऊन निर्णय घेणे आणि विकासासंबंधीचे उपक्रम राबवणं, सरपंचाना जाब विचारणं, आपल्या अडीअडचणी, गाऱ्हाणी, तक्रारी त्यांच्यापर्यंत पोहोचवणं हे सारं त्यात येतं. खऱ्या अर्थानं याला आपण लोकशाहीची पाठशाळा म्हणू शकू. विकेंद्रीकरणाची रचना करताना तशाप्रकारची भूमिका ग्रामसभे-कडून अपेक्षित होती आणि ती जर खरी रचना अशी प्रत्यक्षात आली असती तर ज्याला आपण असं म्हणू शकतो की ग्रामीण जीवनातील सत्तेची मक्तेदारी मोडीत निघाली असती. निर्णय-प्रक्रिया ही खालून वर खऱ्या अर्थाने अस्तित्वात आली असती. खऱ्या अर्थाने सगळ्या लोकांचा सहभाग शक्य झाला असता. विकासाच्या योजनांच्या राबविण्यामध्ये अगदी सुरुवातीपासून लोकांचा असा सहभाग असता तर मग मूठभर वर्गाची ही मिरासदारी अशी टिकून राहिली नसती. रोजगाराच्या नवनवीन शक्यता निर्माण झाल्या असत्या कारण ती प्रत्येकाची मागणी आहे. ती प्रत्येकाची गरज आहे. लोकांच्या गरजा जर खरोखर लक्षात घेतल्या गेल्या असत्या तर विकासातून काय साध्य करायचं

याबद्दल संभ्रमच उरला नसता. प्रत्येकाच्या किमान गरजांची परिपूर्ती हेच विकासाचं साध्य ठरलं असतं. ते प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्यकर्त्यांवर दडपण आणलं गेलं असतं. तसं दडपण यायला पाहिजे. ते दडपण आलं असतं तरच या विकेंद्रीकरणाच्या संस्था खऱ्या अर्थाने क्रियाशील झाल्या असत्या, खऱ्या अर्थाने ग्रामसभा भरल्या असत्या, ग्रामसभेमध्ये मोकळेपणी चर्चा झाल्या असत्या आणि खऱ्या अर्थाने सर्व प्रौढांनी त्यात भाग घेतला असता आणि तसे झाले असते तर मग लोकांच्या खऱ्या समस्या वर आल्या असत्या आणि ज्याला आपण खरी लोकशाही म्हणतो ती निर्माण झाली असती. विकासाची जी जी प्रयोजनें सांगितली जातात ती प्रत्यक्षात उतरली असती. सबंध गावाची भरभराट होणं, सबंध गावासाठी असलेल्या सोयी निर्माण होणं, पिण्याच्या पाण्याची सोय होणं आणि मुख्य म्हणजे प्रत्येकाला रोजगार मिळणं – काम करण्याची तयारी असलेल्या प्रत्येकाला काम देणं अशा प्रकारच्या शक्यता सर्वत्र निर्माण झाल्या असत्या. अशाप्रकारचं दडपण स्थानिक पातळीवरच निर्माण व्हावं लागतं. स्थानिक पातळीवरचा माणूस हा मुंबईच्या विधीमंडळावर किंवा दिल्लीच्या लोकसभेवर दडपण आणू शकत नाही, पण स्थानिक पातळीवर तो आणू शकतो हे या मागचं गृहीत आहे. खऱ्या अर्थानं स्थानिक पातळीवरच्या या ज्या मागण्या, या सगळ्या अपेक्षा निर्णयप्रक्रियेमध्ये व्यक्त झाल्या असत्या तर विकेंद्रित लोकशाहीचं खऱ्या अर्थानं प्रयोजन सफल झालं असं आपल्याला दिसून येईल.

कृषि – औद्योगिक समाजाची उभारणी, विकेंद्रीकरणाच्या योजनेची राबवणूक, आणि मनुष्यबळ, जमीन व पाणी यांच्या जास्तीत जास्त कार्यक्षम उपयोगाची अपेक्षाही सर्व विकासाची

प्रतिमाने यशवंतरावांच्या मांडणीत असताना प्रत्यक्षांत आपल्याला काय दिसते ? प्रत्यक्षात यशवंतरावांची ही विकासविषयक भूमिका काही बाबतीत यशस्वी ठरलेली आहे. या राज्यामध्ये काँग्रेसला स्वातंत्र्यपूर्व काळात नसलेली पत यशवंतरावांनी मिळवून दिलेली आहे. येथे एक नवी विश्वसनीयता यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला मिळाली आहे. विकेंद्रीकरणामधून, सहकारामधून अशा अनेक जागा उपलब्ध झाल्या की ज्या जागांमुळे एक नवा गोतावळा त्या पक्षाच्या भोवती उभा राहिला आणि त्यामुळे त्याची ताकद वाढली. तर पक्षाचा संघटनात्मक पाया महाराष्ट्रामध्ये पक्का रोवला गेला याचे श्रेय यशवंतरावांना आहे. ज्यांच्या हातून सत्तेची सूत्रं हिरावली गेली त्यांच्याशीही संवाद करण्याचं कौशल्य यशवंतरावांच्याकडे असल्यामुळे त्यांचाही फारसा रोष महाराष्ट्रात शिल्लक राहिलेला नाही, हेही त्यांच्या नेतृत्वाचे एक अतुलनीय यश आहे. बहुजन समाजातून वर आलेलं पण बहुजन समाजाच्या स्वाभाविक मर्यादांवर मात केलेलं असं नेतृत्व यशवंतरावांचं होतं हे मी मुद्दाम म्हणतोय, कारण बहुजन समाजाच्या ज्या ज्या त्रूटी आहेत त्या अचूकपणे हेरून प्रयत्नपूर्वक दूर करण्याची धडपड यशवंतरावांनी केली होती. बहुजन समाजाचा तरुण धाडसी असतो पण बहुश्रुत नसतो, तो एकेका विषयामध्ये प्रगती चांगली करतो पण जीवनाचा चौफेर आस्वाद घेण्याची वृत्ती व क्षमता त्याच्या अंगी सहसा नसते. यशवंतरावांनी जाणीवपूर्वक तसा प्रयत्न केला आणि त्यात यशस्वीही झाले. त्यांच्याइतका व्यासंगी, त्यांच्याइतका अफाट वाचन असलेला, त्यांच्याइतका सहृदय, त्यांच्याइतका वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये मैत्री कायम ठेवलेला आणि मनापासून कवितेला दाद देण्यापासून ते

वैज्ञानिकांच्या परिषदेला मार्गदर्शन करण्यापर्यंतचा अधिकार अंगी असणारा असा नेता शोधून सापडणार नाही. त्यांच्या या सर्व नेतृत्वगुणांचा लाभ महाराष्ट्राच्या काँग्रेस पक्षाला मिळाला आहे. प्रारंभिक काही वर्षांमध्ये यशवंतरावांचे नेतृत्व मिळाल्यामुळेच त्यांचा पक्ष सत्तेवर स्थिरपद राहिला हे आपल्याला नाकारता येत नाही. ग्रामीण भागामध्ये एक आधाररचना सहकारामधून निर्माण झाली, सत्तेच्या विकेंद्रीकरणातून निर्माण झाली हेही आपल्याला नाकारता येत नाही. अनेक क्षेत्रांत विकास घडून आला. गावोगावी माळरानांचे रूपांतर हिरव्यागार अशा परिसरात झालं. या भागामध्ये तर आपण हे विशेषत्वानं पाहतो. पण विकासाच्या प्रक्रियेतून ज्या अपेक्षा यशवंतरावांनी ठेवल्या होत्या त्या पूर्ण झाल्यात का ?

संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा पहिल्या भाषणात त्यांनी असं सांगितलं होतं की मराठवाडा, कोकण, विदर्भ या मागासलेल्या भागांच्या विकासाकडे आम्ही विशेष लक्ष देऊ. संतुलित विकासामध्ये हे येतंच. नैसर्गिकदृष्ट्या काही राज्याचे भाग साधनसामग्री असलेले असतात, काही नसतात. काहींच्याकडे नेतृत्व असतं तर काहींच्या ठिकाणी नसतं. तरीही अनेक कारणं अशी असू शकतात की ज्यामुळे काही भागात प्रगती होते तर काही मागे राहतात. परंतु तरीसुद्धा त्याच्यावर मात करून प्रादेशिक संतुलन टिकवले जाणे आवश्यक होते. विकासात जी काही प्रादेशिक विषमता निर्माण होईल, तिचं स्वरुप कसं असावं ? गुन्नार मिर्दाळ म्हणून एक लेखक आहेत. त्यांनी प्रादेशिक विषमतेचं विश्लेषण करताना असं सांगितलय की प्रादेशिक विषमतेचे परिणाम दोन प्रकारचे

संभवतात. एक प्रकार असा की ज्यात विकसित प्रदेश मागासलेल्या प्रदेशांची उपेक्षा किंवा शोषण करतात, तर दुसऱ्या प्रकारात विकसित झालेल्या भागांचा आदर्श मागासलेल्या भागांना मिळतो, त्याच्यापासून प्रेरणा मिळते, मार्गदर्शन मिळते. एका परीने विकासाचं एक प्रतिमान समोर आहे आणि त्या दिशेने आपल्याला जायचं आहे, अशा प्रकारचं स्फुरण हे मागासलेल्यांना मिळावं, मागासलेल्या भागांना पाठिंबा, मार्गदर्शन व पाठबळ हे या प्रगत भागांनी द्यावं असे या परिणामांमध्ये अभिप्रेत असतं. यशवंतरावांना हेच अभिप्रेत होतं.

यशवंतराव म्हणाले होते की काही भाग त्यांची पूर्वतयारी नीट झाली असल्यामुळे पुढं जातील पण धाकटया भावाला बोटानें धरून चालवावं त्याप्रमाणे मागे राहिलेल्या प्रदेशांना ते पुढं नेतील. पण प्रत्यक्षात हे झालेलं नाही. उलट ज्याला प्रतिसारण परिणाम असे मिर्दाळ म्हणतो त्या पहिल्या प्रकारचाच परिणाम येथे झालेला आहे अविकसित भागातील प्रतिभा,अविकसित भागातील श्रमशक्ती व अविकसित भागातील कौशल्य हे विकसित भागांकडे स्थानांतरित झालेलं आहे आणि त्यामुळे अविकसित भागातील मागासलेपणाची टोचणी अधिकअधिक तीव्र होत गेली. आणि हा प्रश्न आपण आज अत्यंत भीषण स्वरुपात पुढे आलेला पाहतो. विदर्भाच्या ठिकाणी विकासाचं सुप्त सामर्थ्य असताना, चंद्रपूर सारख्या जिल्ह्यात खनिजे फार मोठ्या प्रमाणावर असूनसुद्धा, जलसंपदा फार मोठ्या प्रमाणावर असूनसुद्धा तिचा पुरेपुर विनियोग झालेला नाही. कुणी म्हणेंल की अकरा वर्षे या विदर्भाच्या नेतृत्वाकडे राज्याची धुरा होती, आजही आहे, हे

खरं आहे पण इथे हे मला सांगितलं पाहिजे की यशवंतरावांच्या विकाससंकल्पनेला महाराष्ट्रात नंतरच्या काळात कुणी वारसदारच उरलेला नाही. यात यशवंतरावांचा दोष किती आणि इतरांचा किती या चिकित्सेत आपल्याला येथें जायची गरज नाही.

यशवंतरावांनी नेमलेले वारसदार हे त्यांच्या विकाससंकल्पनेशी सहमत तरी होते की नाही हा खरा प्रश्न आहे. अकरा वर्षे राज्य करूनही वसंतराव नाईक यांनी ज्या हेतूंनी यशवंतरावांनी विकासप्रक्रिया सुरू केली होती त्या हेतूच्या अनुषंगाने वाटचाल केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. वर्गीय दृष्टीकोनातून पाहिले असता आपल्याला काय दिसतं ? संतुलित विकासामध्ये जसं प्रदेशाचं संतुलन अभिप्रेत आहे त्याचप्रमाणे वर्गाचंसुद्धा संतुलन अभिप्रेत आहे. येथे जो विकास झाला त्यातून समाजातल्या उच्चवर्गीयांनाच लाभ मिळाला आणि सामान्य माणूस, शेवटचा माणूस मात्र विकासविषयक चिंतनाचा विषय झालेला नाही असं झालंय की नाही ? तर याचं स्पष्ट उत्तर हे असंच झालं आहे असंच आपणास द्यावं लागेल. विकेंद्रीकरणामधून मघाशी सांगितल्याप्रमाणे पक्षाचा फायदा काय व्हायचा तो झाला, पक्षाची बांधणी करण्यासाठी त्याचा उपयोग व्हायचा तो झाला. सामान्य माणसाच्या दृष्टीनें किंवा नियोजनाच्या उद्दिष्टांच्या परिपूर्ततेच्या दृष्टीने, विकासाच्या दृष्टीने किंवा विकासप्रक्रियेत जनतेचा सहभाग होण्याच्या दृष्टीने त्याचा फारसा उपयोग झालेला नाही हे सगळं मान्य केलं पाहिजे. पी. बी. पाटील समितीने जो अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे त्यातही हे मान्य केलं आहे की विकेंद्रीकरणाकडून विकासाला अपेक्षित चालना मिळाली

नाही आणि विकासप्रक्रियेतून शेवटच्या माणसाचा लाभ साध्य झालेला नाही. विकासाचे लाभ सर्वांना सारखे मिळावेत ही अपेक्षाही पूर्ण झालेली नाही.

महाराष्ट्रात सहकारामधून साखर कारखानदारी निघाली. साखर कारखानदारी ही महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक दृष्टींनी महत्वाची आहे हे कुणीच नाकारणार नाही. येथे एक ऐतिहासिक कार्य साखर कारखानदारीनें पार पाडलेलं आहे. साखरेचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढलेलं आहे. लाभधारकांची संख्या मोठ्या प्रमाणावरती आहे. परंतु तरीही आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची जरुरी आहे की ऊस वगळता बाकीच्या पिकांची स्थिती काय आहे? ऊस बारमाही ७० टक्के पाणी पितो, इतर पिके हंगामी ३० टक्के पाणी पितात, तरीसुद्धा ऊसाच्या पिकाला अग्रक्रम देऊन आपण काय साधलं? ऊसापायी लागणारं हें पाणी जर ५० ते ६० टक्के जमिनीला मिळालं तर त्यातून सामाजिक न्याय तर साध्य होईलच, परंतु ज्याला कृषि-औद्योगिक समाजाची पक्की पायाभरणी म्हणता येईल तेही साध्य होईल. महाराष्ट्रात साखर कारखाने निघूनसुद्धा कृषि-औद्योगिक समाज निर्माण झालेला नाही याचं कारण काय? आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ज्या उद्योगामध्ये केला जातो तेथे तो करणाऱ्या उद्योजक व्यक्ती मजुरांशी मात्र पारंपारीक पद्धतीनेच वागतात, हे लक्षात घेण्याची गरज आहे. कारण आजही हे उद्योजक समाजाच्या उच्चवर्णीय-उच्चवर्गीय समाजाचे असतात, वरिष्ठ समजल्या गेलेल्या जातीचे असतात आणि मजूर हे मध्यम व निम्न जातीचे असतात. त्यामुळे ऊस मळ्यातल्या कामगारांची स्थिती अपेक्षित प्रमाणात सुधारली

नाहीं. हरिजन, मातंग, आदिवासी यांच्यापैकी किती उद्योजक निर्माण झालेत? आणि झाले नसल्यास का झाले नाहीत? समाजाच्या सर्व स्तरातल्या सुप्त शक्तींना जागृत करणं आणि क्रियान्वित करणं हे जर विकासाचं प्रयोजन असेल तर ते साध्य झालेलं नाही. बहुसंख्यांक समाज आजही विकासप्रक्रियेला पारखा आहे, विकासप्रक्रियेच्या लाभांपासून वंचित आहे. साखर कारखाने निघूनही साखरेची पूर्ण गरज या राष्ट्राची भागलेली नाही. ऊस वगळता कडधान्य, इतर धान्य आणि जीवनावश्यक गोष्टी यांच्याबद्दल महाराष्ट्राची पिछेहाट झालेली आहे. अण्णासाहेब शिंदे मागे असं म्हणाले होते की इतर प्रगत राज्यांच्या तुलनेत या सर्व पिकांबाबतीत महाराष्ट्र मागेच पडलेला आहे. महाराष्ट्र मागे आहे हे सत्य स्वीकारायला आपल्या मनाची तयारी होत नाही. पण ऊस वगळता जर बाकी सगळ्या पिकांच्या बाबतीत महाराष्ट्र मागासलेला असेल तर हे आपल्या विकासाचे धादांत अपयश आहे हे सत्य आपल्याला स्वीकारलं पाहिजे. विकासप्रक्रियेचा एखाद्या पक्षाला काय फायदा झाला असेल तो असो, जनतेचे मुख्य प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत. अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला असे एकीकडे आपण घोषीत करीत असतानाच या देशाच्या निम्म्या लोकसंख्येला रोज उपाशीपोटी झोपावं लागतं ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. एकीकडे अन्नधान्याचे पडून राहिलेले साठे आणि दुसरीकडे उपाशी वा अर्धपोटी राहिलेले नागरिक यांची गाठभेट आपल्या विकासाच्या प्रक्रियेने होऊ शकलेली नाही. देशाचे पस्तीस-चाळीस टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जगतात हे कशाचं लक्षण आहे?

महाराष्ट्रातील कृषि औद्योगिक समाजाच्या उभारणीतून जो विकास साध्य केला त्याचं जातिनिष्ठ स्वरूप अजूनही नाहीसं झालेलं नाही. मग हा समाज एकजिनसी व्हावा हे जे ध्येय होतं ते कसं साध्य होणार ? संयुक्त महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावरूनच्या पहिल्या भाषणात यशवंतरावांनी सांगितलं होतं की हा समाज एकजिनसी व्हावा, या समाजामध्ये परंपरेने निर्माण झालेल्या फटी बुजवल्या जाव्यात, जातीय तेढ नष्ट व्हावी, स्पृश्य-अस्पृश्य हा भेद राहू नयें, गरीब श्रीमंतातील दरी कमी व्हावी यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न केले जातील. महाराष्ट्राची परिस्थिती ही कुठल्याही राज्यापेक्षा समाजवादासाठी अनुकूल आहे, असेही त्यांनी सांगितलं होतं. ते त्यांचं स्वप्न अजून प्रत्यक्षात आलेलं नाही असं आपल्याला दिसून येईल.

विकासानं महाराष्ट्रात काहीही साधलं नाही असं मी म्हणत नाही. विकासानं जे साधलं ते मी नमूद केलेलंच आहे. परंतु विकासातून जे परिणाम अपेक्षित होते ते प्रत्यक्षात दिसत नाहीत – येथे एकजिनसी समाजाची उभारणी झालेली नाही. प्रदेशामध्यें एकमेकांच्याबद्दल किती आकस आहे हे विदर्भातून पश्चिम महाराष्ट्रात प्रवास करताना रेल्वेगाडीमध्ये आपल्याला दिसतं. ताबडतोब लोक बोलतात. आपल्या प्रदेशाचा मागासलेपणा आणि इकडच्या प्रदेशाची समृद्धी यांची तुलना करीत ते बोलत असतात. विकेंद्रीकरणाची स्थिती काय आहे ? विकेंद्रीकरणामधून आमदार – खासदारांना वगळलं त्याचं कारण सांगताना नाईक समितीने असं सांगितलं होतं की स्थानिक पातळीवर त्यांच्यावर दडपण येता कामा नये, स्थानिक पातळीवरच्या लोकप्रतिनिधीवर

दडपणं येता कामा नये. परंतु अशा पद्धतीने वगळल्यामुळे आमदार खासदार प्रत्यक्षात या स्थानिक पातळीवरच्या संस्थांना धड कामच करू देत नाहीत ही आज वस्तुस्थिती आहे. त्यांचा हस्तक्षेप हा त्यांच्या तिथल्या उपस्थितीने झाला असता त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात आज होत आहे हे आज आपल्याला नाकारता येईल का? त्यांच्या सर्वस्पर्शी हस्तक्षेपामुळे विकेंद्रीकरण देखील निकालात निघतंय. नोकरशाहीला तर विकेंद्रीकरण नकोच आहे आणि आज नोकरशाहीच सर्व सरकारी उपक्रमांची 'सारे काही' झालेली असल्यामुळे नोकरशाहीला जे नको आहे ते होणेच शक्य नाही.

ग्रामीण जीवनाशी एकरुप असलेले उद्योगधंदे असावेत हे फार महत्वाचं एक वाक्य यशवंतरावांच्या एका भाषणात आहे. कोणते उद्योगधंदे ग्रामीण जीवनाशी एकरुप आहेत? ज्या उद्योगधंद्यांचा सामान्य माणसाच्या जगण्याशी किंवा जीवनावश्यक गरजांशी काहीही संबंध नाही असे उद्योगधंदे खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनाशी एकरुप होऊच शकत नाहीत. एखादा साखर कारखाना निघाल्यानंतर रोजगार वाढतो, कदाचित थोडे पैसे मिळतात. रोजगार हमी योजना निघाल्यावरसुद्धा रोजगार मिळतो. अशाप्रकारे मिळणारा रोजगार हा आनंददायी रोजगार असू शकतो काय हा खरा प्रश्न आहे. ग्रामीण जीवनाशी एकरुप झालेले औद्योगीकरण घडवून आणणारा विकास जर झाला असता तर हा आनंद त्यांना मिळाला असता. असं आज झालेलं नाही. चार पैसे एकत्र करुन उभारलेल्या भांडवलामधून सहकार चळवळीनें असा एक वर्ग ग्रामीण पातळीवर तयार केला आहे की जो शहरातल्या धनिकांशी बरोबरीच्या नात्याने वागू शकतो. हे

साध्य झालं. परंतु वर्गीय हितसंबंधाच्या दृष्टीने पाहिले तर शहरातला तो धनिकवर्ग आणि खेड्यापाड्यातल्या सहकारी चळवळीतून वर आलेला धनिकवर्ग यांच्या हितसंबंधांमध्ये फारसा फरक नसल्यामुळे आजवर झालेला विकास हा सामान्य माणसाच्या दृष्टीने परिणामशून्य ठरलेला आहे.

आज प्रश्न असा पडतो की यशवंतरावांसारखी प्रतिभा, यशवंतरावांसारखे वजन, यशवंतरावांसारखं वकूब असलेला नेता या राज्याला लाभूनसुद्धा हे असं का व्हावं ? त्यांच्या स्वप्नांची अशी धूळधाण का व्हावी ? वस्तुतः एका नेत्याचा एका राज्याशी घनिष्ट व दीर्घकाळ संबंध जोडला जावा याचं यशवंतराव व महाराष्ट्र उदाहरण अद्वितीयच म्हणावं लागंल. यशवंतराव इथं किती काळ प्रत्यक्ष सत्तेवर होते ते महत्वाचं नाही. इथून गेल्यानंतरसुद्धा कितीतरी वर्षे ते येथील राजकारणाचं रिमोट कंट्रोल करीत होते. तरीही त्यांच्या विकासकल्पनेची अशी शोकांतिका का व्हावी ? आणि या प्रश्नाचं उत्तर मला दिसतं ते असं की एकतर संसदीय-शासकीय यंत्रणेवर यशवंतरावांनी वाजवीपेक्षा जास्त भर दिला होता. "यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य" या माझ्या पुस्तकामध्ये प्रतिपादन करताना मी असं म्हटलं आहे की यशवंतरावांचा भर हा जनतेचे सामर्थ्य वाढवण्यापेक्षा कायदे, विधिमंडळ, प्रशासनयंत्रणा, सहकारी व सरकारी संस्था यांच्यावर जास्त होता. लोकशक्तीपेक्षा शासनशक्तीवरचा त्यांचा विश्वास जास्त असे. त्यांच्याबद्दल असंच वारंवार घडलेलं आहे. आयुष्यात प्रत्येक प्रसंगी जेव्हा जेव्हा निर्णय घेण्याची किंवा निवड करण्याची वेळ आली तेव्हा यशवंतरावांनी कॉंग्रेसच्या बाजूने आणि शासनाच्या बाजूने ठाम

राहण्याचं पत्करले आहे. अनेक उदाहरणांवरुन हे सिद्ध करता येईल. लोकांमध्ये जाऊन लोकांची शक्ती उभी करणं त्यामुळेच त्यांना साध्य झाले नाही. पक्षबांधणी करताना त्यांनी हे पाहिलं की ठीक आहे गावातील एखादा नामांकित वकील सगळी मतं हाती ठेवीत होता किंवा गावातील मताचा एखादा नेता मक्ता घेतो असे होता कामा नये. त्याच्याऐवजी पक्षाचे गावोगाव कार्यकर्ते झाले पाहिजेत. त्यांच्या योगक्षेमासाठी सहकारी संस्था उपयोगी पडल्या पाहिजेत. तसा सहकारी संस्थांचा उपयोग कार्यकर्त्यांचा योगक्षेम करण्यासाठी झाला आणि कार्यकर्त्यांचं जाळं त्या अर्थानं निर्माण झालं. पण प्रत्यक्ष कार्यामधून संस्कारित झालेले कार्यकर्ते निर्माण झाले नाहीत, तर संस्थांच्या आयत्या जागा भरण्यासाठी म्हणून " आपली " माणसं आणून बसवली गेली आणि हीच पक्षाचे कार्यकर्ते म्हणून ओळखली जाऊ लागली. त्यामुळें विकास प्रक्रियेमधून सामान्य माणसांच्या कर्तृत्वशक्ती जाग्या करणं हे जे यशवंतरावांना अभिप्रेत होतं ते साध्य झालं नाही.

दुसरी एक गोष्ट आहे की जी माझ्या दुसऱ्या भाषणाशी जास्त संबंधित आहे व विस्ताराने येणारच आहे, ती अशी की विकासाचं प्रतिमान राववीत असताना आदर्श कोणाचा ? गांधींचा की नेहरुंचा ? असा एक प्रश्न यशवंतरावांच्या मनामध्ये पडलेला सतत जाणवतो. बोलताना ते गांधी – नेहरु असा संयुक्त नामोल्लेख वारंवार करतात. गांधी – नेहरुंची पुण्याई, गांधी - नेहरुंचा देश, गांधी - नेहरुंचो ध्येयवादिता, गांधी - नेहरुंचा कार्यक्रम, वगैरे वगैरे. म्हणजे जणू काही गांधी व नेहरु हे समानार्थीच आहेत ! अशाप्रकारची मांडणी त्यांनी अनेक ठिकाणी केली. खोलात जाऊन विचार केल्यानंतर माझ्या असं लक्षात आलं की

यशवंतराव 'गांधीवादी' असण्यापेक्षा, 'नेहरुवादी' च जास्त होते. मला गांधी अथवा नेहरु यांच्यापैकी कोणाचाही अधिक्षेप करायचा नाही. परस्परविरुद्ध अशी ही दोन प्रतिमानं आहेत. विशेषत: ज्या विकासाच्या संकल्पनेविषयी आपण बोललो आहोत, दोन तीन दिवस बोलणार आहोत, त्या संदर्भामध्ये गांधी व नेहरू ही दोन भिन्न प्रतिमानांची नावे आहेत, या दोन्हीपैंकी एकाची निवड करण्याची वेळ जेव्हा जेव्हा आली तेव्हा यशवंतरावांनी 'नेहरू मॉडेल'ची निवड केलेली आहे आणि हे त्यांच्या अपयशाचं एक मुख्य कारण आहे, असं मी म्हणतो. बेलेस हैजेन नावाचा एक माणूस आहे आणि त्यानं "हू आफ्टर नेहरु" या नावाचा ग्रंथ लिहिला. 'हू आफ्टर नेहरु' हे लिहिणारा हैजेन हा यशवंत-रावांना पूर्णपणे अनुकूल असलेला लेखक आहे. किंबहुना त्याने ज्या ८-१० व्यक्तींचा नेहरुंचा संभाव्य वारसदार म्हणून एकेका प्रकरणामधून ऊहापोह केलेला आहे किंवा जो तपशील सांगितला आहे त्यात सर्वात जास्त अनुकूल अभिप्राय यशवंतरावांबद्दल आहे त्याच्या मते यशवंतरावच नेहरुंच्या पश्चात या देशाची धुरा समर्थपणे सांभाळू शकतील. कारण त्यांच्या ठिकाणी जी कर्तबगारी आहे, जी परिपूर्णता, जी परिबद्धता आहे, जी कुवत आहे, जी लोकप्रियता आहे ती अन्य कोणत्याच नेत्यापाशी नाही. हे त्याने फार पूर्वीच नेहरुंच्या निधनाच्या आधीच सांगितले होते. मी हे यासाठी सांगतो आहे की हा लेखक पूर्ण संशोधनान्ती लिहिणारा असून यशवंतरावांचा तो चाहता आहे. आपल्या यशवंतरावांविषयीच्या विवेचनात आधी सगळ्या गोष्टी अनुकूल नोंदविल्यानंतर हैजेन असे म्हणतो की यशवंतराव म्हणजे "स्वत:ला गांधीवादी न म्हणवून घेणारा पहिला भारतीय नेता

मला भेटलेला आहे."

यशवंतराव खादी वापरत असत. परंतु खादीचं संपूर्ण तत्वज्ञान यशवंतरावांनी मान्य केलं होतं असं नाही. विरक्तीपूर्ण जीवनाचं फार कौतुक त्यांनी कधीच केलेलं नाही. त्यांना सुखवस्तुपणा आवडायचा. अधूनमधून गांधींचे उल्लेख त्यांनी केलेले असले तरी गांधींच्या विचारप्रणालीमध्ये या समाजाच्या मूलभूत समस्यांचे निराकरण होऊ शकेल असा विश्वास यशवंतरावांचा नव्हता. जे गांधीवादी विकास–प्रतिमान आहे, त्या मार्गानें जाऊन या समाजातल्या तळागाळातल्यांचे प्रश्न मिटू शकतील किंवा या समाजाच्या मूलभूत समस्यांचे निराकरण होऊ शकेल यावर यशवंतरावांचा विश्वास नव्हता आणि त्यामुळे देखील कदाचित असेल की, गांधीप्रणीत मार्गापेक्षा नेहरुंच्या समाजवादाचं आकर्षण यशवंतराव चव्हाणांना कायम वाटत गेलं आहे. आणि कधी कधी तर त्यांची ही नेहरुनिष्ठा त्यांच्यातल्या समाजवादावरसुद्धा मात करताना आपल्याला दिसते. एकदा संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात, आपण नेहरुंना महाराष्ट्रापेक्षा मोठं मानतो असं यशवंतराव स्पष्टच म्हणाले होते आणि त्याबद्दल त्यांच्यावर बरीच टीका झाली होती हे आपल्याला माहीत असेलच. नेहरु-निष्ठा सुद्धा कशासाठी तर या सबंध कांग्रेस पक्षाच्या एकात्मतेचं प्रतिक म्हणून नेहरू ! त्यामुळे नेहरू जे म्हणतील किंवा नेहरू जे करतील त्याला समाजवाद म्हणावयाचं अशाप्रकारची तडजोड यशवंतरावांनी नंतरच्या त्यांच्या काळात केली. तळपातळीवर त्याचे फार भीषण परिणाम झाले आहेत आणि हे अपयश यशवंतरावांचेच नाही तर हे अपयश नेहरूंच्या विकास प्रतिमानाचेच अपयश आहे. त्यामुळे यशवंतरावांना दोष देणं

हा येथे हेतू नाही. पण त्याबरोबर हें स्पष्ट सांगायलाच हवे की बालपणीच्या संस्कारांतून मूळ धरलेली आणि पुढे जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून साकार झालेली जी विकास संकल्पना यशवंतरावांना लाभली होती ती प्रत्यक्षात राबविली गेली नाही, किंवा ती प्रत्यक्ष राबवली जात असताना त्यात विकृती आल्या. सामान्य माणसाला मध्यवर्ती ठेवून विकासयोजना राबवण्याऐवजी त्याला गृहीत धरुनच सारं काही केलं गेलं. त्यामुळे ते त्याच्या हिताचं होऊच शकलं नाही. सबंध विकास कल्पनेची २०–२५ वर्षे उलटून गेल्यानंतर आपण हे पाहतोय की, तिची जी फलश्रुती झाली ती अपेक्षित फलश्रुती नाही. आणि म्हणूनच आपण इथे एका टप्प्यावर येतो, जेथे हा प्रश्न उभा रहतो की नेहरु–चव्हाण यांच्या विकासचं हे प्रतिमान खरोखरच आमल्या संविधानाने आपल्याला दिलेली जी उद्दिष्टं आहेत ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने उपयोगी पडणार आहे काय ? उद्योगधंदे केवळ खेड्यामध्ये काढल्याने खेड्यांचा विकास होऊ शकतो का ? आज अनेक सिडको, एम. आय. डी. सी. अमुक तमुक सगळीकडे झालेले आहेत आणि तिथे एका ठराविक पद्धतीचे कारखाने निघाले आहेत. अशा पद्धतीचे कारखाने गावोगाव काढतांना स्थानिक साधनसामग्रीचा स्थानिक लोकांच्या गरजांच्या सहभागांचा काहीही विचार केला गेलेला नाही. अशाप्रकारचे हे ठोकळेबाज औद्योगीकरण आणि असा विकास हा देशाच्या लोकशाहीला स्थिर करण्याच्या दृष्टीने या देशाच्या लोकशाहीला बळकट पाया प्रदान करण्याच्या दृष्टीने कितपत उपयोगी पडणार आहे? असा एक लाखमोलाचा प्रश्न आपल्यासमोर निर्माण झालेला आहे. आजच्या व्याख्यानाच्या परिमित कक्षेमध्ये यशवंतरावांची

विकासकल्पना, तिची फलश्रुती व तिच्या अपयशाची कारणमीमांसा एवढया तीनच गोष्टींचा विचार मी आपल्यासमोर मांडला आहे. शेवटी जो लाखमोलाचा प्रश्न मी उपस्थित केला आहे, उद्याच्या माझ्या भाषणात त्या प्रश्नाचं उत्तर देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. विकासाचा जो नमुना आपण स्वीकारला आहे तो किती विनाशकारी आहे यावर मी उद्या बोलणार आहे आणि पर्यायी विकासाचा नमुना कसा असू शकतो याची मांडणी परवाच्या भाषणात करीन. आज मी जे बोललो ते आपण शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल मी आजच्यापुरता आपला आभारी आहे. उद्या आपण पुढे बोलू या.

# आपल्या विकासाची दिशा
# आणि
# लोकशाहीचे भवितव्य

१३ मार्च १९९२

## ‘ विकासाचा विनाशकारी नमुना ’

डॉ. भा. ल. भोळे
नागपूर विद्यापीठ, नागपूर

अध्यक्ष महाराज आणि मित्रहो, आपला देश प्रगतीच्या मार्गावर जायचा असेल तर आपल्याला पाश्चात्त्य विज्ञान तंत्रज्ञान यांचा अवलंब करुन आधुनिकीकरणाच्या वाटेने गेले पाहिजे अशी पंडित जवाहरलाल नेहरुंची धारणा होती. नेहरु पश्चिमी संस्कारात वाढले होते आणि त्यामुळे त्यांच्या मनात अशी पक्की समजूत होती की, विज्ञान आणि तंत्रज्ञान हा मानवी मुक्तीचा मूलमंत्र आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यामधून समाजाच्या सगळ्या क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक परिवर्तन घडून येऊ शकते. समाजाचें मन्वंतर घडून येऊ शकते. एखाद्या राष्ट्राला जर पुढे जायचे असेल तर विज्ञान - तंत्रज्ञानाखेरीज दुसरा तरणोपाय नाही.

यशवंतरावांचाही या आशावादावर स्वाभाविकच विश्वास होता, किंबहुना त्यावेळच्या संपूर्ण शिक्षित पिढीचा होता. त्यांना असं वाटत होतं की आपला देश मागास आहे याचं एक महत्वाचं कारण इथे अपुरा तंत्रविकास झाला हे आहे. आपली शेती का परवडत नाही ? कारण शेतीचं तंत्र हे मागासलेलं आहे, आपण जुन्या काळापासून ज्या लाकडी - लोखंडी नांगराने नांगरत आलो आहोत त्याच पद्धतीने आजही नांगरतो, त्याच पद्धतीनं पेरतो, इतरत्रही समाज जीवनात तीच सगळी पारंपारिक रचना सांभाळतो आणि यामध्ये काहीतरी आगळवेगळं केल्याशिवाय आपला विकास होणे नाही. आधुनिकीकरण करावयाचे म्हणजे यंत्रे आणली पाहिजेत. जपानमध्ये झालेले शेतीचे प्रयोग, तिकडं युरोपात झालेले प्रयोग, त्या प्रयोगांचं इथे आपण प्रशिक्षण शेतकऱ्यांना दिलं पाहिजे, त्यांच्या हाती यंत्रसामग्री दिली पाहिजे. ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्या केल्या पाहिजेत. आणि शेतीचे आधुनिकीकरण केलं पाहिजे. शेती परवडेनाशी झाली आहे. शेतीवर जास्त भार पडलेला आहे. आणि हा भार हलका केल्याखेरीज आपल्याला स्वयंपूर्ण समाज निर्माण करताच येणार नाही. आपल्या देशाची जी दारिद्र्याची समस्या, मागासलेपणाची समस्या आहे ती जर दूर करायची असेल तर यांत्रिकीकरण, औद्योगीकरण, शहरीकरण यांशिवाय आपल्याला गत्यंतर नाही.

कृषी-औद्योगिक समाजाचा जो प्रयोग होता, ज्याच्या पाठीशी यशवंतरावांनी शासनाची शक्ती उभी केली असं मी काल म्हणालो, तोसुद्धा या प्रकारच्या धारणेतून निर्माण झालेला होता की आपल्याला विज्ञान तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. नेहरुंच्या तर

कित्येक भाषणांमधून हे व्यक्त झाले आहे की विज्ञान तंत्रज्ञानाशिवाय आपल्याला पर्याय नाही. रशियाचा नियोजित विकासाचा नमुना नेहरुंच्या समोर होता आणि रशियाप्रमाणे आपल्यालाही करता आलं पाहिजे, आपणसुद्धा नियोजनाचा मार्ग अवलंबायला पाहिजे, आपणसुद्धा विकासमग्न नोकरशाहीची यंत्रणा अवलंबली पाहिजे. आपणसुद्धा पंचवार्षिक योजना राबवल्या पाहिजेत, याप्रकारच्या महत्वाकांक्षा नेहरुंनी रशियापासून उचलल्या होत्या. यामागे एक गृहीत असे होते, ही राज्यसंस्था हे सामाजिक परिवर्तनाचं एक केंद्र होऊ शकतं, एक साधन होऊ शकतं. राज्यसंस्थेच्या पुढाकाराने समाजाचा चेहरामोहरा बदलला जाऊ शकतो. समाजामध्ये एक आर्थिक स्थित्यंतर आणलं जाऊ शकतं. आर्थिक प्रगती करण्याचं साधन राज्यसंस्था होऊ शकते. राज्यसंस्था ही तटस्थ असते, राज्यसंस्थेचे स्वतःचे असे काही हितसंबंध नसतात. राज्यसंस्था ही संपूर्ण समाजाच्या विकासाची जबाबदारी पार पाडू शकते. संपूर्ण समाजाच्या हे मी मुद्दाम जोर देऊन म्हणतोय कारण राज्यसंस्थेला विकासप्रक्रियेत भावात्मक भूमिका देणारी असे गृहीत धरीत असते की राज्यसंस्था पक्षपात करीत नसते. तिला समाजातील सगळीच माणसे सारखीच असतात. राज्यसंस्था ही परिवर्तनाच्या कामांमध्ये शासनाच्या योजनांच्याद्वारे नवा समाज घडवून आणू शकते. कृषि-औद्योगिक समाजाच्या उभारणीचा प्रयत्न माननीय यशवंतरावांनी महाराष्ट्रात केला त्यामागची भूमिका हीच की जो कृषक समाज आहे, हा जो कृषिप्रधान समाज आहे याला औद्योगिकरणाच्या दिशेने न्यायचं आणि औद्योगिक समाजाच्या जवळ हा जाईल असा प्रयत्न करायचा.

आता काय असतंय की कुठलेही तंत्रज्ञान जे आहे त्याचे काही सामाजिक - आर्थिक - सांस्कृतिक परिणाम होतच असतात. तंत्रज्ञान तटस्थ असतं असं आपण कधी - कधी म्हणतो, वाचतो, पण ते खरं नसतं. तंत्रज्ञान शस्त्राप्रमाणे तटस्थ असतं असं कधी-कधी भासवलं जातं. असं की त्याची इष्टानिष्टता ते वापरण्या-वरती अवलंबून आहे. तंत्रज्ञान हे मुळात चांगले किंवा वाईट नसतं. पण वस्तुस्थिती अशी आहे की तंत्रज्ञान कधीच तटस्थ नसतं, तंत्रज्ञान हे मूल्यमुक्तसुद्धा नसतं. तंत्रज्ञान काही मूल्यांची रुजवात करतं. ती मूल्यं आपल्याला हवीत की नकोत हे ठरवायला हवं. आपण जी मूल्यं प्रमाण मानतो त्या मूल्यांची रुजवात या तंत्रज्ञानातून होते की नाही हे आपल्याला ठरवायला लागेल. मूल्यांशी तंत्रज्ञानाचा - विज्ञानाचा संबंध असतो. आताच नव्हे पूर्वीपासून तो आहे आणि आधुनिक समाजातच नव्हे तर पारंपारिक समाजातही आहे, थेट आदिम समाजातसुद्धा आहे. अगदी दोन ठळक उदाहरणे मानसशास्त्रामध्ये सांगितली जातात.

एस्किमो समाज मासेमारी करतो आणि मासेमारीसाठी तो भाल्याचा वापर करतो. भाला हे त्या एस्किमो समाजाचे तंत्रज्ञान आहे. पर्यावरणातून आपल्या प्राथमिक गरजा भागवण्यासाठी ज्या ज्या साधनांचा वापर होतो त्याला तंत्रज्ञान म्हणायचं. तंत्रज्ञान म्हणजे गुंतागुंतीचं असंच काहीतरी असतं असं नव्हे. हा साधा भालाच कशाला, अश्मयुगातील माणसाने दगडाला धार लावून जे आद्य आयुध तयार केलं असेल तेसुद्धा तंत्रज्ञानच होतं. तेव्हा एस्किमोचं मासेमारीचे भाला एक तंत्रज्ञान आहे आणि त्याचा परिणाम त्यांच्या सबंध सामाजिक रचनेवर होतो. मासेमारीला जायचं म्हणजे एक-एकटयानं जायचं असतं, संपूर्ण समूहानं जाऊ

शकत नाही. असा झुंड चा झुंड जर मासेमारीसाठी निघाला तर माशांना चाहूल लागेल व ते आतल्या भागात निघून जातील, मासेमारीला यश येणार नाही. तेव्हा मासेमारीला अत्यंत सावधपणे जायचं, एक-एकटयानं जायचं, पाऊल न वाजवता जायचं. परिणामी त्या एस्किमोंची समाजरचनाच अशी झाली आहे की त्यात मोजकी लहान लहान कुटुंबेच राहू शकतात. त्यांच्यात फारच बेताचे परस्परावलंबन असते. सामूहिक कृती ते अभावानेच करतात. त्यांच्यात श्रमविभागणी फारशी नसतेच. अत्यंत पृथक पृथक म्हणता येईल किंवा विकीर्ण किंवा विस्कळीत म्हणता येईल अशा प्रकारचे त्यांचे समाजजीवन असते. त्यांच्या कुटुंबाचा आकार हा २-३ माणसांपेक्षा अधिक नसतो. त्यापेक्षा जास्त मोठ्या संख्येने माणसे त्यांना परवडतच नाहीत. म्हणजे तंत्रज्ञानाचा परिणाम त्यांच्या कुटुंबरचनेवर, त्यांच्या समाजरचनेवर होतो.

दुसरं टोकाचं उदाहरण आहे ते टोब्रियंड बेटावरच्या बगांडा लोकांचं. ही माणसं गेंडयाची शिकार करतात. आता गेंडयाची शिकार करायची म्हणजे जीवाशी गाठ असते. शिकारीच्या मोहिमेत एकावेळी १००-१०० माणसांना भाग घ्यावा लागतो. स्वाभाविकच १०० माणसांनी एकत्रितपणे काही करायचं म्हणजे कामाची वाटणी करावीच लागते. कोणी काय करायचं, कोणी कुठं उभं राहावयाचं, कोणत्या प्रकारची भूमिका पार पाडायची, कोणी आरोळ्या मारायच्या, कोणी वार करायचा, कुणी आणखी काय काम करायचं याची तपशीलवार आखणी करावी लागते. अशा प्रकारची परिपूर्ण आखणी अत्यंत काळजीपूर्वक केल्याशिवाय कोणीही गेंडयाची शिकार करूच शकत नाही. गेंडयांची शिकार

करण्याचं जे त्यांचं तंत्रज्ञान आहे त्यामुळे त्यां समाजाची रचना ही प्रभावित झाली आहे. एस्किमोपेक्षा अगदीच वेगळ्याप्रकारची ती झालेली आहे. हा समाज आकाराने मोठा आहे. या समाजात जास्त शिस्तबद्धता आहे. या समाजामध्ये नेतृत्व आणि अनुयायी संबंध स्पष्टपणे निर्माण झाले आहेत. कारण मोहिमेची कोणतीही आखणी जेव्हा करावी लागते तेव्हा कोणीतरी हुकूम करावे लागतात व ते हुकूम अंतिम मानून कुणालातरी बिनतक्रार ऐकावेच लागतात, कुणाचा तरी अधिकार इतरांना मान्य करावा लागतो. कारण त्याशिवाय शिकार करता येत नाही. गेंड्याची शिकार हा या माणसांच्या आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचा एक महत्वाचा प्रसंग असतो आणि त्यातील त्यांच्या तंत्रज्ञानाचा परिणाम त्यांच्या समाजरचनेंवर झालेला असतो.

तेव्हा तंत्रज्ञान कुठल्याहीं काळातले असो आणि कुठलेही असो, ते मूल्यमुक्त असत नाही. त्याचे सामाजिक, सांस्कृतिक परिणाम झाल्यावाचून कधीच राहत नाहीत आणि आपण स्वीकारलेले जे तंत्रज्ञान आहे त्याचेही अशाप्रकारे सामाजिक सांस्कृतिक परिणाम झालेले आहेत. समाजजीवनामध्ये परिवर्तनाच्या प्रक्रिया सुरू होतात. तंत्रज्ञानाचा परिणाम सर्वच घटकांवर सारखाच होत नाही. लक्षात घ्या. तो काही घटकांना अनुकूल होतो व काही घटकांना प्रतिकूल होतो. हे सगळ्या काळामध्ये घडत आलेले आहे.

तंत्रज्ञान हे तटस्थ नसतं. तर ते विशिष्ट मूल्यव्यवस्थेशी निगडीत असतं, तिला बळकट करीत असतं हें एकदा मान्य केल्यानंतर आपण आता आपल्या आजच्या तंत्रज्ञानाची चिकित्सा

त्याच्याशी संलग्न असलेल्या तत्वज्ञानाच्या संदर्भात करू. पाश्चात्य तंत्रज्ञान कोणत्या काळात निर्माण झालं ? याचं स्वरूप काय होतं ? आणि मग याचे संभाव्य परिणाम काय होतील याचा विचार आपण करूया. मी असं जेव्हा म्हणतो तेव्हा मला आवर्जून एक मुद्दा सांगायचा असतो की आपण जेव्हा म्हणतो की सहकारामध्ये भ्रष्टाचार आहे, आपण असं जेव्हा म्हणतो सहकारी क्षेत्रामध्ये मक्तेदारी आहे, त्यामध्ये अजूनही घराणेशाही चाललेली आहे, त्यामध्ये सामान्य माणसाचा आवाज ऐकला जात नाही, वगैरे वगैरे. तेव्हा इथे आपण व्यक्तींना दोषी धरतो. खरं म्हणजे यात व्यक्तीचा दोष फारसा नसतो. ज्या व्यवस्थेत व्यक्ती वावरत असते त्या व्यवस्थेचा, त्यातील तंत्रज्ञान-विज्ञानाचा हा परिणाम असतो. हे समजावून घेतल्याशिवाय आपल्यास त्यावरला उपाय योजता येणार नाही. 'सहकारातल्या भ्रष्टाचारावर उपाय सांगा ' असं जर कोणी म्हणालं तर पटकन आपण त्यावर डॉक्टरप्रमाणे प्रिस्क्रिप्शन लिहून देऊ शकणार नाही. कारण हा तितका सोपा किंवा सहजसाध्य रोग नाही तर याचं जे मूळ आहे हे कुठेतरी अशा व्यवस्थेत आहे, विज्ञानात आहे, तंत्रज्ञानामध्ये आहे असे आपल्याला दिसेल.

हे जे तंत्रज्ञान मी म्हणतो आहे सारखं ज्याचा अंगिकार आपण केला, पाश्चात्य आधुनिक तंत्रज्ञान आपण ज्याला म्हणतो हे केव्हा निर्माण झाले ? साधारणत: हे औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झाले असं आपण मानतो, औद्योगिक क्रांतीनंतर जेव्हा उत्पादनात प्रचंड वाढ झाली, यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला आणि माणसांना असा एक विश्वास मात्र आला की आपण निसर्गावर नियंत्रण मिळविण्यात यशस्वी झालो, " जितं मया " मी जिंकलो

अशी भावना माणसाच्या मनात निर्माण झाली त्या क्षणापासून या विज्ञान - तंत्रज्ञानाची सुरुवात झाली आहे हे लक्षात घ्या. म्हणजे तंत्रज्ञानाचा पाया हा मानवाच्या मनात अहंकाराकडे झुकणारा, आत्मविश्वास निर्माण करणारा आहे की माणूस हा या विश्वाचा केंद्रबिंदू आहे, माणूस या विश्वाचा कर्ता आणि धर्ता आहे, माणूस जे मनात आणील ते करू शकतो आणि जे केले आहे ते नष्ट करू शकतो, माणसाला पाहिजे त्या पद्धतीने तो नैसर्गिक शक्तींना वळवू शकतो, वाकवू शकतो, वेठीला धरू शकतो, आणि शेवटी माणसाचं कल्याण हेच संपूर्ण चराचराचं उद्दिष्ट आहे. जंगलं आहेत ती माणसासाठी, नद्या आहेत त्या माणसासाठी, पर्वत आहेत ते माणसासाठी, ही सबंध सृष्टी आहे ती माणसासाठी आणि माणूस त्यांचा हवा तसा वापर करू शकतो ही धारणा या विज्ञान–तंत्रज्ञानाच्या पाठीशी उभी आहे आणि एकदा हे आपण गृहीत धरलं की पुढं एक अनिष्ट परंपरा अटळ होऊन बसते.

तंत्रज्ञानाचा वापर माणूस फार पूर्वापार करीत होता. पण त्याला तंत्रज्ञानामागचं विज्ञान ठाऊक नव्हतं. म्हणजे जेव्हा दगडाला धार लावणारा तो अश्मयुगातला माणूस होता तेव्हा त्याला त्या धारेमागचं तत्त्व माहीत नव्हतं, तरफ म्हणजे काय ते माहीत नव्हतं, लिव्हरेज म्हणजे काय हे माहित नव्हतं. तंत्रज्ञानाच्या मागचं विज्ञान माहीत नसतानादेखील तंत्रज्ञानाचा वापर माणूस करीत होता. जेव्हा त्याला असं कळलं की तंत्रज्ञानाच्या मुळाशी हे विज्ञान आहे आणि विज्ञानाचा बोध त्याला झाला तेव्हापासून माणसाच्या ठिकाणी हा आत्मविश्वास निर्माण झाला आहे असं आपणास म्हणता येईल. पण या तंत्रज्ञानाचं

स्वरूप मुळात माणसाला स्वार्थी बनवणारं आहे, आत्मकेंद्री बनवणारं आहे, स्वतः पुरता विचार करायला लावणारं, बनवणारं आहे. मुक्तस्पर्धा हे याचं सूत्र आहे.

आपण आज मुक्तस्पर्धेच्या दिशेने झपाट्याने चाललो आहोत म्हणून हे आवर्जून सांगणं आवश्यक झालेलं आहे की मुक्तस्पर्धेचा मार्ग हा कधीच सामाजिक न्यायाचा असू शकत नाही. मुक्त स्पर्धेचा मार्ग हा एकमेकांच्या गळ्याचा घोट घ्यायला प्रवृत्त करणारा मार्ग असतो. कारण सूक्तासुक्त कुठलेही मार्ग वापरायचे, कसलाही विधिनिषेध बाळगायचा नाही हे त्या मार्गात सहज बसतं. यश आणि यश हेच तिथे अचूकतेचं गमक असतं. एखादी गोष्ट चूक की बरोबर ? यशात ती जर परिवर्तित होत असेल तर बरोबर, तिच्यामुळे अपयश येत असेल तर चूक असंच समीकरण होऊन बसतं आणि त्यामुळे ज्या मूल्यांच्याबद्दल आपण बोलतो, आपण असं म्हणतो की चारित्र्यवान असायला पाहिजे, माणसांनी सदाचारी असायला पाहिजे, माणसांनी निस्वार्थ बुद्धीने काम केले पाहिजे, समाजसेवा केली पाहिजे, या सगळ्या गोष्टी आपण आदर्श चारित्र्याच्या म्हणून मानतो. या स्पर्धेमध्ये जर यशस्वी व्हायचं असेल तर मात्र वागण्याचे हे संकेत हे गुण न ठरता दोष ठरतात. मला जर निवडणूक लढवून जिंकून यायचं असेल तर मोकळ्या मनाने मला काळ्या पैशाचा स्वीकार केला पाहिजे. मी काळ्या पैशाचा विधिनिषेध करतो, मला तो घ्यायचा नाही, मला तो वर्ज्य आहे असं म्हणून मला निवडणूक लढविता येणार नाही, मला जर लोकशाहीच्या स्पर्धेत टिकून राहायचं असेल तर मला दहशतीचा वापर केला पाहिजे, गुंडगिरीचा वापर केला पाहिजे, कारण त्याखेरीज मला या क्षेत्रात आज

वावरता येणार नाही, टिकून राहता येणार नाही. म्हणजे ज्याला आपण चारित्र्याचे सद्गुण म्हणतो, ते व्यावहारीक यशाच्या दृष्टीने जर दोष ठरत असतील आणि ज्यांना आपण दोष म्हणतो ते जर गुण ठरत असतील तर याला आता काय म्हणायचं ? आणि ज्या पद्धतीचा वापर आपण अवलंब केलेला आहे तिच्यामध्ये हे गुण ठरतात ही वस्तुस्थिती आहे.

तुम्ही किती मोठे पुढारी आहात हे तुमचं भ्रष्टाचार करण्याचं सामर्थ्य किती मोठं आहे यावर अवलंबून असतं. तुम्ही किती मोठे कारखानदार आहात हे शासनाची मर्जी विकत घेण्याची तुमची किती ताकद आहे यावरुन ठरत असतं. बाकी कोणत्या गुणवत्तेची गरज नाही. इथे उदाहरणार्थ कोणाचंही नाव घ्यायची गरज नाही. कुठल्याही उद्योगपतीचं नाव तुम्ही मनात आणा आणि तुम्हाला असे आढळेल की त्यांनी ते केलेलंच आहे. त्या उद्योगपतींच्या ठिकाणी उद्योगपती होण्यासाठी लागणारे इतर गुण असले नसले तरीही तो यशस्वी होतो कारण सरकारवर दडपण आणण्याचे मार्ग त्याला नेमके माहित आहेत, सरकारच्या निवडणूक फंडाला देणगी देण्याची ताकद त्याच्यामध्ये आहे. सरकारचे अधिकारी तो विकत घेऊ शकतो आणि या बळावरच तो यशस्वी उद्योगपती होऊ शकतो. म्हणजे एकदा या उत्पादन पद्धतीच्या मागे असलेल्या या विज्ञान-तंत्रज्ञानाचं हे सूत्र तुम्ही मान्य केलं की मग उगीच चारित्र्य कमी होतंय आणि भ्रष्टाचार वाढतोय, गुन्हेगारी-गुंडगिरी वाढतेय, या तक्रारींना फारसा अर्थच राहात नाही.

मग हे आपण सारं निमूटपणे स्वीकारायचं का ? मी तसं

मुळीच म्हणत नाही. मी तसं सुचवतही नाही. हे जे काही चाललंय ते रास्त चाललं आहे, चांगलं चाललं आहे असं मी अजिबात सुचवत नाही. मी फक्त असं म्हणतोय की ज्या विज्ञान-तंत्रज्ञानाची कास धरून आम्ही मोठमोठाली धरणं निर्माण केली, मोठमोठाली शहरं वसवली आणि मोठमोठे कारखाने तयार केले आणि ही धरणे, शहरे, कारखाने हीच आमच्या प्रगतीची लक्षणं आहेत असं आम्ही सांगितलं. आम्ही सांगितलं की भाक्रा-नानगल ही आमची नवीन तीर्थस्थानं आहेत. या सगळ्या विकास-प्रक्रियेचा खोलात जाऊन आपल्याला विचार करावा लागतो. भव्य इस्पितळे बांधणे हे प्रगतीचं लक्षण आहे ? की लोकांनी आजारी पडूच नये आशाप्रकारचा बंदोबस्त करणं हे प्रगतीचं लक्षण आहे ? आपण पहिला पर्याय हाच विकासाचा आदर्श म्हणून मानला. मोठमोठाले दवाखाने निघाले पाहिजेत, मोठ-मोठाल्या इमारती बांधल्या गेल्या पाहिजेत, अहो पण शक्यतो लोकांनी आजारी पडूच नये असा प्रयत्न केला पाहिजे ना, पण ते नाही. कारण विकासाचा जो नमुना आम्ही बाजूला सारला आहे, विकासाचा जो नमुना आम्ही स्वीकारलेला आहे तो असा की तुम्ही वाटेल ते करा, आणि वाटेल तसं खा, आणि आजारी पडल्यावर दवाखान्यात जा. हिंदस्वराज्यमध्ये गांधींनी म्हटलं होतं की डॉक्टर हा समाजाचा शत्रू आहे. कारण काय तर डॉक्टर असं म्हणतो की तुम्ही वाटेल तितकं खा, कांही विचार करू नका, अगदी जे वर्ज्य आहे तेही खा, तुम्हाला काही झाल्यास मी आहेच. मी पाहीन. मी असताना तुमच्या तब्येतीची काळजी घ्यायला तुम्ही कशाला काळजी करता ? समाजातल्या अनैतिकतेचे प्रवर्तक म्हणून गांधींनी डॉक्टर आणि वकील या दोन व्यावसायिकांचा

उल्लेख केला होता. आम्ही मात्र हे मान्यच केलं आहे की, नाही त्यांच्याच आधाराने आम्हाला राहायचंय. डॉक्टर आहे ना मग आपण कशाला काळजी करायची ? आपण खुशाल खाऊ या ! वाटेल तितकं खाऊया ! वाटेल तसं राहू. निष्काळजीपणे राहू या ! डॉक्टर काय ती काळजी घेतील. आम्ही खून करू, वकील आपल्याला वाचवतील ! शेवटी वाचणं महत्वाचं ना. मग कोर्टात कसं वाचायचं, शिक्षा कशी टाळायची, गुन्हेगार असूनसुद्धा कसं राजरोसपणे मोकळं सुटायचं, याचं तंत्र जर मला अवगत झालं तर मग मी गुन्हा करताना का म्हणून विचार करायचा ? असं ते तर्कशास्त्र आहे. हे सारं मला मान्य आहे म्हणून मी हे बोलतोय असं नाही. तर मी असं सांगतोय की आपण स्वीकारलेल्या व्यवस्थेचा हा सारा भाग आहे. आपल्याला जर आज प्रगतीची आपण करीत असलेली व्याख्या मान्य असेल तर तिच्या बरोबर येणाऱ्या ह्या गोष्टी आपल्याला स्वीकारल्याच पाहिजेत. पर्याय नाही त्याला.

म्हणजे ज्या तंत्रज्ञानाचा - विज्ञानाचा हेतू हा अनिर्बंध सत्ता आणि मत्ता गोळा करणं हाच आहे, की अगदी वाटेल त्या मार्गाने तुम्ही श्रीमंत व्हा, वाटेल त्या मार्गाने तुम्ही सत्तेची पदं बळकवा. कुठल्याही प्रकारचा विधिनिषेध बाळगू नका, मागचा पुढचा विचार करू नका, नीतिमत्ता हा शब्द अगदी फेकून द्या त्याची काही गरज नाही. यशस्वी व्हा आणि यशस्वी होण्यासारखं दुसरं काहीही महत्वाचं नाही (नथिंग सक्सीडस् लाईक सक्सेस) हे लक्षात ठेवा. अशाप्रकारच्या विकासामुळे सामान्य माणसाला न्याय मिळेल ही शक्यता मुळात नाहीच. मी काय म्हणालो की आपण जणू हे मान्य केलंय की मुंबईमध्ये भांडवलदार आहेत आणि मुंबईचे

भांडवलदार सबध राज्याची सत्ता नियंत्रित करतात. आम्ही असं म्हणायला तयारच नाही की आपला हा देश खेड्यांचा आहे शेतकऱ्यांचा देश आहे ! शेतकऱ्यांमधून अशी ताकद, अशी आर्थिक ताकद निर्माण केली पाहिजे की जी त्या मुंबईच्या भांडवलदारांच्या तोडीसतोड राहील. केली आम्ही. उभी केली ना ताकद. परंतु जी ताकद उभी केलीय ती ताकद शेवटी मुंबईच्या भांडवलदारांच्या हातात हात मिळवून या राज्यसत्तेची सूत्रं आपल्या हाती घेऊन बसली. पण शेवटी सामान्य माणसाच्या दृष्टीने, जिराईत शेतकऱ्याच्या दृष्टीने, फाटक्या दोनतीन एकरवाल्या शेतकऱ्यांच्या दृष्टीनें या परिवर्तनातून काही इष्ट निष्पन्न होण्याची सुतराम शक्यता उरली नाही. आमच्या सहकारी चळवळीची शोकांतिका कुठं झाली असेल तर ती ह्या इथं झालेली आहे. या चळवळीतून मुंबईला तुल्यबळ अशाप्रकारची आर्थिक सत्ता ग्रामीण भागात जरुर उभी राहिली. पण त्या आर्थिक सत्तेचे गुणधर्म आणि मुंबईच्या भांडवलशाहीचे गुणधर्म यांच्यामध्ये काडीचाही फरक नाही. उलट आमचे एक मित्र दुपारी म्हणाले त्याप्रमाणे मुंबईच्या भांडवलदारांना संघटित कामगारशक्तीची तरी भीती आहे, ग्रामीण भागात निर्माण झालेल्या या सत्ताकेंद्राना तर अशा सुसंघटित कामगारशक्तीचीसुद्धा भीती नाही. त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचा वचक राहिलेला नाही. आणि त्यामुळे ते जास्त आक्रमक होतात. जास्त उद्दाम होतात. ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने विकासाचा हा नमुना लोकशाहीच्या दिशेने घेऊन जाणारा आहे की लोकशाहीच्यापासून दूर नेणारा आहे, याचा विचार आपण करायला पाहिजे. आपल्याला खरोखरीच लोकशाही विषयी काही आस्था असेल तर

संविधानात वा कायद्यांत थातूर मातूर दुरुस्त्या करून काही होणार नाही. मागण्या मान्य केल्या जातात. प्रतिनिधित्व कायदा बदलला पाहिजे, मतदानाचं वय २१ सोडून १८ केलं पाहिजे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नियमित घेतल्या पाहिजेत, हे व्हावं. त्यात काहीच वावगं नाही पण केवळ अशा सुधारणा करून लोकशाही आणता येणार नाही हे लक्षात ठेवलंच पाहिजे.

लोकशाहीच्या संदर्भात गेल्या ४०-४५ वर्षांमध्ये आम्हाला मुळीच यश मिळालेले नाही किंवा काहीच पदरात पडलेलं नाही असं मी मुळीच म्हणणार नाही. आधुनिकीकरण झाले हे कोणीच नाकारणार नाही. ही जी सुबत्ता आपल्याला दिसते, हिरवी झालेली शेतं आपल्याला दिसतात, ट्रॅक्टर, मोटार-सायकल चालताना जिकडेतिकडे आपल्याला दिसतात, सुबत्ता आलेली नाही असं म्हणणार कसं ? आधुनिकीकरण झालेलं आहे. कारखान्यांची जी काही संख्या स्वातंत्र्य मिळताना असेल त्याच्यापेक्षा आज ती कितीतरी जास्त झालेली आहे. शहरीकरण झालं आहे. वर्तमानपत्रांची संख्या वाढली आहे. शाळांची, महाविद्यालयांचीही संख्या वाढली आहे. प्रगतीचे काही आकडे आपल्यासमोर ठेवून हे सिद्ध करणे शक्य आहे की देशाच्या एकूण व दरडोई उत्पन्नात आणि सर्वंच वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली आहे. अर्थात दरडोई हिशेब करण्याची अर्थशास्त्राची नेहमीची जी पद्धत आहे ती बहुधा दिशाभूल करणारीच असते हे खरं असलं तरी वाढ झाली आहे, हे नाकारण्यात हशील नाही. दर माणशी उत्पादन वाढलंय, सगळ्या पदार्थांचं उत्पादन वाढलेलं आहे, असं आपण म्हणू या.

लोकशाही आपल्या देशात सुरळीत चाललीय की नाही ? पाकिस्तानच्या तुलनेत म्हणाल तर लोकशाही भारतात निश्चितपणे चाललीय. या देशामध्ये इतकी वर्षेपर्यंत मतदानाचा प्रयोग अव्याहतपणे सुरु आहे. येथे जी काही सत्तांतरे झाली ती सगळी मतपेटयांमधून झाली आहेत बुलेटच्या नव्हे तर बॅलेटच्या मार्गाने झालेली आहे. इथल्या लोकशाहीचंच हे निदर्शक आहे. आणीबाणीच्या काळामध्ये ज्यांनी आमचे मूलभूत हक्कच हिरावले होते आणि संविधान जवळपास संपूर्णपणे रद्दबातल ठरवलं होतं ते सुद्धा प्रतिनिधी आम्हीच निवडून दिलेले होते. कोणी बाहेरुन आमच्यावर लादलेले नव्हते. लोकशाहीच्या मार्गाने येथील लोक मतदान करतात, प्रतिनिधी निवडून येतात, ते प्रतिनिधी देशाचा राज्यकारभार करतात. विधिमंडळामध्ये जाऊन बहुधा ते गोंधळच घालत असले तरी लोकांचे प्रतिनिधी म्हणून ते वावरतात. अजूनपर्यंत तरी येथे गोळीबाराने काही सत्तांतर झालेलं नाही. याचा अर्थ येथे लोकशाही यशस्वी झालेली आहे असाचा निघतो. पाकिस्तानमध्ये काय दिसतं ? कधी तिथे लष्करशाही येते, तर कधी अन्य प्रकारची हुकूमशाही येते, कधी अध्यक्षीय पद्धती येते तर कधी संसदीय लोकशाही अंमलात येते. संविधानं धडाधड कोसळत असतात. पाकिस्तान बांगलादेश, इंडोनेशिया, श्रीलंका या भारताच्या सर्व शेजारी राष्ट्रांत कमीअधिक प्रमाणात हीच परिस्थिती आढळते. या तुलनेत भारतामध्ये मात्र लोकशाहीचा प्रयोग अखंडपणे चालू राहतो ही जमेची बाजू नाही असे कोण म्हणेल ? भारताचे हे यश निर्विवादपणे फार मोठे आहे.

पण हे यश मान्य करुन सुद्धा एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागते की भारताला ज्यात यश मिळाले त्या या तिन्हीही गोष्टी

साधनरुप आहेत. साध्यरुप नाहीत. आधुनिकीकरण हे साधन आहे. लोकशाही हे साधन आहे. उत्पादनवृद्धी हे साधन आहे. तर मग साध्य काय आहे ? साध्यांचा उल्लेख आम्ही आमच्या संविधानाच्या सरनाम्यात करुन ठेवलेला आहे. या देशातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळावा, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य लाभावे, दर्जाची व संधीची समानता प्राप्त व्हावी, व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता साध्य व्हावी यासाठी कृतसंकल्प होऊन निर्धारपूर्वक आम्ही हे संविधान स्वत:प्रति अर्पण केले आहे. हे आमचं साध्य आहे. माणसाला माणसासारखे जीवन जगता यावं अशी समाजरचना निर्माण करणं हे ते साध्य आहे. माणसासारखं जीवन म्हणजे केवळ भौतिक गरजांची पूर्तता नाही तर सुसंस्कृत जीवन, परिपूर्ण जीवन, सान्या ज्या सुप्त शक्ती माणसाच्या अंगी असतील त्या सगळयांचा विकास - आविष्कार करता येईल असं अर्थपूर्ण जीवन प्रत्येकाच्या वाटयाला यावं - हे ते साध्य आहे. प्रत्येकाला रोजगार मिळावा, दारिद्रयाचं संपूर्ण निर्मूलन व्हावं - हे ते साध्य आहे. प्रत्येकाला माणसासारखं जगता यावं, त्याला शिक्षण मिळावं, त्याला आरोग्य मिळावं, त्याला आराम मिळावा हे सगळं त्यात आलं. ही सगळीच आपली साध्ये आहेत. आणि साध्याचा पाठपुरावा करण्यातून येथे समताधिष्ठित समाज उभा राहणे अपेक्षित आहे.

समतेचा अर्थ केवळ ' कायद्यासमोर समानता ' नाही. म्हणजे तो आहेच, कायद्यासमोर समानता हवीच, प्रत्येकाच्या मताला सारखीच किंमत असावी हा तर समानतेचा अर्थ आहेच, त्याचप्रमाणे कायद्याचं सर्वांना समान संरक्षण असावं हाही समानतेचा

अर्थ आहेच. पण समतेचा याहून व्यापक आणि भरीव असा भावात्मक अर्थही असून तो अधिक महत्वाचा आहे. आपण असं पहा की आपल्या देशात तत्वत: सर्वांना विकासाची समान संधी आहे, सर्वांना मुलभूत हक्क आहेत, सर्वांना भाषण - स्वातंत्र्य आहे, पण प्रत्यक्षात किती लोकांना भाषणस्वातंत्र्य आहे हो ? तुम्हाला जे वाटतं, जें पटतं ते तुम्ही खरोखरच निर्भयपणे बोलू शकता ? तळागाळातल्या किती लोकांना त्यांना जे वाटतं ते बोलता येतं ? मुळात त्यांना विचार करायला फुरसत कधी असते ? वर्तमानपत्र वाचता येईल अशा लोकांची संख्या या देशात किती आहे ? ज्याना वाचता येतं त्यांच्यापैकी किती लोक ते वाचतात ? जे वाचतात त्यांच्यापैकी किती लोक विचार करतात ? आणि जे विचार करतात त्यांच्यापैकी किती लोक बोलू शकतात ? आणि त्यांच्यापैकी किती लोक बोलतात ? हे जर आपण लक्षात घेतलं तर आपोआपच आपल्या ध्यानात येईल की भाषणस्वातंत्र्य हा येथे फारच थोडया लोकांचा हक्क आहे. म्हणजे भावात्मक अर्थानं स्वातंत्र्य, समता व बंधुता या साध्यांचं काय झालं ? माणसासारखं जगता यावं असा समाज निर्माण व्हावा, सर्वांच्या प्राथमिक गरजांची परिपूर्ती व्हावी अशी अर्थव्यवस्था निर्माण व्हावी आणि भावात्मक आशय असलेली समानता या समाजाचा पाया व्हावी, त्याच्यावर आधारित अशी निकोप समाजव्यवस्था येथे उभी रहावी, या साध्याचं काय झालं ? आपल्याला असं दिसेल की ही साध्ये आजही कागदोपत्रीच राहिली आहेत. केवळ आदर्शच राहिलेली आहेत. आपण जेव्हा प्रगतीबद्दल चिकित्सकपणे बोलतो, आपण जेव्हा विकासाबद्दल परखडपणे बोलतो तेव्हा वस्तुतः आपण या साध्याच्या दृष्टीनेच आजवरच्या सगळ्या



RAO CH

विकासाचं मूल्यमापन करीत असतो. या विकासाच्या क्रमात आम्ही जे काही मिळविले त्यातून आम्ही या साध्यांच्या किती जवळ गेलो? किंवा किती दूर गेलो ? हे आपणास बघावं लागतं. कारण लोकशाहीचं भवितव्य यावरच अवलंबून आहे.

आजच्या या विकासाच्या नमुन्यामध्ये लोकशाहीच्या दृष्टीने जे गंभीर धोके आहेत ते फक्त मी अधोरेखित करणार आहे. जर या राज्यव्यवस्थेमध्ये अशाप्रकारे संतुलित विकासाद्वारे नवसमाज रचनेची उभारणी होत नसेल तर मग इथल्या लोकशाहीचं खरंच भवितव्य आहे काय ? लोक म्हणतील इतके दिवस चालू राहिली तशीच ती पुढं चालू राहील. असं नाही होऊ शकत. काळ झपाटयानं बदलतो आहे, आणि विकासाच्या लाभांपासून वंचित राहिलेली माणसं आता जागी होतायत, संघटित होतायत. १९७० नंतरच्या काळामध्ये फार मोठ्या प्रमाणावर लोकांनी या विकास-प्रक्रियेच्या विरोधात आवाज उठवायला सुरुवात केलेली आहे आणि दिवसेंदिवस त्यांचं सामर्थ्य, त्यांचं बळ वाढत जाणार असून त्यांचा आवाज अधिकअधिक बुलंद होत जाणार आहे हे आपल्या लक्षात घेतलं पाहिजे. आजपर्यंत चाललं, हजारो वर्षे चाललं, कर्मसिद्धांताच्या बळावर आम्ही विषम समाजरचना आणि अर्थरचना खुशाल खपवीत राहिलो, टिकवीत राहिलो, हे कल्पांता-पर्यंत असंच चालेल असं जर कोण मानत असेल तर ती चूक आहे. तसं होऊ शकत नाही हे निश्चित बदलणार आहे. परिस्थिती वेगाने बदलते आहे आणि म्हणूनच तुम्हाला आम्हाला सगळयां-नाच याचा गंभीरपणे विचार करावाच लागणार आहे. तशीच वेळ अगदी येऊन ठेपली आहे. आम्ही ज्याला विकास विकास म्हणतो तो खऱ्या अर्थाने विकास आहे काय ? याचे उत्तर यापुढे फार काळ टाळता येणार नाही.

काही लोक असे म्हणतात की ठीक आहे, विकासप्रक्रियेत काही चुका असतील, दुरुस्ती करता येतील. पण या काही किरकोळ चुका नाहीयेत. मूलभूतच गफलती आहेत. काही जणांना मात्र अजूनही असं वाटतं की शहरांच्या अफाट वाढीचा प्रश्न आहे, प्रदूषणाचा प्रश्न आहे, झोपडपट्ट्यांचा प्रश्न आहे, पण हे काही यक्ष प्रश्न नव्हेत. जरा काळजी घेतली – विषारी वायू हवेत सोडले नाहीत किंवा विषारी द्रव्ये पाण्यात सोडली नाहीत किंवा हवा – पाण्याचे शुद्धीकरण कटाक्षाने केलं तर कारखानदारीला तशी काही हरकत नाही. असं नाही होऊ शकत. कितीही काळजी घेतली, कितीही प्रदुषण टाळण्याचे उपाय केले किंवा काहीही केलं तरी मुख्य प्रश्न मिटणार नाहीत. एकतर या तंत्रज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या मुळातच जी नफेखोरी दडलेली आहे ती त्या उपायांचा अवलंब करूच देणार नाही. नफा हेच ज्याचं प्रमुख उद्दिष्ट आहे असा कुठलाही उद्योग, प्रदूषण नियंत्रित करण्याच्या उपायांकरता पैसा म्हणजे वाया जाणारा पैसा आहे असे मानणार हे उघडच आहे. त्याला काय करायचं हो. कष्टकरी व गरीबबापड्या माणसांच्या जीवनांशी त्याला काय करायचं? जे मरतात ते मरु देत लोक, दम्याचं प्रमाण वाढतंय मुंबईत, तर वाढेना का? त्याला काय फरक पडतोय? ज्या विज्ञान-तंत्रज्ञानाचा हेतू हा अमर्याद सत्ता-मत्ता गोळा करणे हा आहे, नफेखोरी हाच आहे, ते कधीही अशा समाजहिताच्या गोष्टी करण्यावर पैसे खर्च करणार नाहीत. केल्यावाचून गत्यंतर नाही तेवढेच केले जाईल. कामगारांनी संप केल्यानंतर पगारवाढ देतील, परंतु बाकी काही नाही करायचे.

तात्पर्य असे की किरकोळ दुरुस्त्या करून सध्याचा प्रगतीचा

डोलारा टिकवणं हे शक्य होणार नाही. आपल्याला मुळापासून विचार करावा लागेल. हरित क्रांतीचा सबंध प्रयोग आपल्या समोर आहे. हरितक्रांतीचं फलित काय ?आपल्या अनेक राजकीय आर्थिक समस्यांचं मूळ हे या हरित क्रांतीमध्ये आहे हे आपल्याला नाकारून चालणार नाही. हरितक्रांती झाली, धवलक्रांती येऊ घातली, ना जाणो आणखी कोणत्या कोणत्या प्रकारच्या क्रांती होतायेत ! या सगळ्या क्रांतींच्यामधून मघाशी ज्या साध्यांचा उल्लेख मी केला त्या साध्यांच्या आपण किती जवळ गेलो असं मात्र कोणी विचारु नये. मात्र कोणी शोध घेतलाच तर आपण त्या साध्यांच्या उलटयाच दिशेने गेलो असाच पुरावा जास्त प्रमाणावर मिळेल. हरितक्रांतीमधून प्रादेशिक असंतुलन वाढलंय हे आकडेवारीनेसुद्धा सिद्ध करता येंऊ शकेल. सगळ्या अर्थ-शास्त्रज्ञांना मान्य आहे. सगळ्यांनाच हे दिसतंय. पंजाब, हरयाणा इतका गहू पिकवतात की दुसरीकडे कुठेही तेवढा पिकत नाही. ऊसाची जमीन नसतानासुद्धा कोल्हापूर सांगली सातारा या भागात जेवढा ऊस होतो तेवढा महाराष्ट्रात अन्यत्र कुठेही होत नाही. पुढाऱ्यांचं राजकीय वजन जर पुरेसं असेल तर परिसरात ऊस नसतानासुद्धा साखरेचे कारखाने निघतात, असेही चमत्कार घडलेले आपण पाहतो. म्हणजे हरितक्रांतीने कोणाला काय दिलं? प्रादेशिक असंतुलन वाढवलं, सामाजिक ताणतणाव वाढले, समृद्धता आली म्हणजे ताणतणाव कमी होतील हे समीकरण खोटं ठरलं. कारण समृद्धता समाजाच्या सगळ्या घटकांमध्ये आलेली नाही, सगळ्या वर्गामध्ये आलेली नाही. श्रीमंतांना त्या हरित-क्रांतीने अधिक श्रीमंत केलं आणि गरिबांना अधिक गरीब केलं, किंवा फारतर असं म्हणू की जिथल्या तिथच ठेवलं. दारिद्र्य-

निर्मूलनाच्या दृष्टीने हरितक्रांती फारशी उपयोगी पडू शकली नाही. अनुसूचित जाती-जमातीच्या आयुक्तांचे वार्षिक अहवाल असे सांगतात की हरितक्रांतीनंतर अनुसूचित जाती-जमातींवर खेड्यापाड्यांत होणारे अत्याचार वाढले आहेत, कमी झालेले नाहीत. कारण हरितक्रांतीतून स्थानिक पातळीवर मग्रुर सत्ता-केंद्रे निर्माण झालीत. अमर्याद सत्ता हाती असलेली केंद्रं. त्या त्या पातळीवरची अमर्याद सत्ता असे मला म्हणायचय. वरपर्यंत संधान असलेली माणसं खालपर्यंत निर्माण झालीत. जसं प्रत्येक कायदा पोलिसांच्या भ्रष्टाचाराच्या क्षेत्रांमध्ये व क्षमतेमध्यें भर घालतो त्याप्रमाणे हरितक्रांतीने या स्थानिक पातळीवरच्या माणसांच्या सत्तेमध्ये अमर्याद भर घातलेली आहे आणि त्यामुळे शोषणाचं आणि छळाचं प्रमाण वाढलं आणि स्वरूप अधिक भीषण झालं आहे. मी काल असं म्हणालो की अत्यंत आधुनिक तंत्रज्ञान आपल्या कारखान्यात वापरणारी माणसं मजुरांशी वागताना मात्र थेट पारंपारिक पद्धतीनेच वागतात. ही जी जातीयता आहे ती विकासातही कायम राहिलेली आहे.

हरितक्रांतीनें ती नष्ट झालेली नाही उलट बळकट झालेली आहे. हे हरितक्रांती जवळचं उदाहरण मी देतोय आपल्याला. इतर क्षेत्रातील प्रगतीचेही अंतरंग असेच काळेंकुट्ट आहे. विकासाच्या या नमुन्यामधून लोकशाहीच्या दृष्टीने जी काही इष्ट परिवर्तनं समाजामध्ये होण्याची अपेक्षा होती, प्रत्यक्षात ती घडलेली नाहीत, घडत नाहीत, आणि आपण वेळीच जर सावध झालो नाही तर ती घडून येण्याची शक्यताही शिल्लक राहणार नाही. तंत्रज्ञानावरचा विश्वास आमचा प्रचंड वाढत चाललेला आहे. विशेषतः राज्यकर्त्यांचा. राजीव गांधींच्या काळामध्ये तर तंत्रज्ञान

हा राजकारणाचा पर्याय म्हणूनच वापरला गेलाय. राजकीय प्रश्नांची तंत्रज्ञानात्मक उत्तरं शोधण्याचा प्रयत्न राजीव गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी फार मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. तंत्रज्ञानात्मक उत्तरं ही राजकीय प्रश्न कधीच सोडवू शकत नाहीत. उलट अयोग्य तंत्रज्ञानाचे दुष्परिणाम मात्र विषमता वाढविण्यास कारणीभूत होतात असं अनेक पुराव्यांनी सांगता येतं.

कोणतं तंत्रज्ञान तुम्ही वापरता, कोणासाठी वापरता यावर सारं काही ठरतं. तंत्रज्ञानातून तुम्ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारता की खाजगी विलासी गाड्या निर्माण करता ? सार्वजनिक वाहतूक सुधारण्यासाठी वापरलेलं तंत्रज्ञान हे समताकारक ठरतं, समाजामध्ये समतेला चालना देतं. उदाहरणार्थ, आगगाड्यांची इंजिनं कोळशाच्या ऐवजी जर डिझेलवर धावायला लागली तर समाजातल्या सगळ्याच स्तरातल्या माणसांना त्याचा फायदा होईल. परंतु सार्वजनिक वाहतुकीच्या ऐवजी तंत्रज्ञानात्मक संशोधन आणि नवीन नवीन अद्ययावतीकरण हे जर श्रीमंतांसाठी महागड्या मारुती गाड्या निर्माण करण्यासाठीच केले गेलं तर ते विषमताकारकच ठरणार हे उघड आहे. तंत्रज्ञानाचे हे सामाजिक परिणाम आपल्याला नाकारता येणारच नाहीत. राजीव गांधींच्या तंत्रप्राधान्यामध्ये एकूण सर्व समाजापेक्षा काही व्यक्तींच्या सुखासाठी, व्यक्तींच्या हितासाठी, स्वार्थासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानावर जास्त भर होता, हे आपल्याला आज लक्षात घेतलं पाहिजे. त्यांचा सबंध दृष्टिकोनच एकूण अभिजनवादी होता.

समाजजीवनाच्या सर्वच अंगावर तंत्रज्ञानाचे फार दूरगामी परिणाम होतात. कोण काम करणार, कोण करणार नाही, ते

काम कुठे चालेल, कुठे चालणार नाही हेही तंत्रज्ञान निर्धारित करतं, तंत्रज्ञानानुसार ठरतं. उद्योगधंदे शहरात निघणार की खेड्यात ? शहरे व खेडी यांचं अंतर वाढणार की कमी होणार, कोण कोणतं काम करणार, कोणतं उत्पादन अग्रक्रमानं करणार, कोणासाठी उत्पादन करणार हे सगळं तंत्रज्ञानच ठरवणार. एकदा तुम्ही इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाच्या आहारी गेलात की मग इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान जे तयार करतात ते देश तुम्हाला सांगणार की तुम्ही हे तयार करा, ते करू नका. जगात कॉम्प्युटरची मागणी आहे, कॅलक्युलेटरची मागणी आहे तेच तयार करा. या गोष्टींची कृत्रिम गरजही निर्माण केली जाऊ शकते. देशात सर्वात जास्त कॉम्प्युटर्स, रंगीत टी. व्ही. ही जीवनावश्यक गरज आहे असं भासवलं जाऊ शकतं. राजीव गांधींच्या काळात असं भासविणारे मंत्री गावोगाव फिरत होते. ते असं म्हणत होते की रेशनच्या दुकानासमोर रांगा नसतात पण टी. व्ही. च्या दुकानासमोर रांगा असतात. कोणी लावलेल्या असतात या रांगा ? कोणाची ऐपत असते रंगीत टी. व्ही. घेण्याची ? रंगीत टी. व्ही. ही गरज कोणाची आहे ? म्हणजे तुम्ही असं पहा की तंत्रज्ञानाच्या बडेजावाचं प्रमाण इतकं वाढतय की सामान्य माणसाचा, त्याच्या गरजांचा साफ विसर त्यात पडतो.

जेव्हा तंत्रज्ञान हे भांडवलप्रधान असतं. जेव्हा तंत्रज्ञानाची एक किट खरेदी करण्यासाठी काही हजारो रुपये लागतात. तेव्हा ती किट खेड्यातला दरिद्री शेतमजूर घेणार नाही हे उघडच असतं. म्हणजे तंत्रज्ञानाचं स्वरूप जर महागडं असेल तर ते तंत्रज्ञान सामान्य माणसाकडे दुर्लक्ष करणार ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी कुठल्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. सामान्य

माणसाच्या हिताचं ते तंत्रज्ञान असूच शकत नाही. सामान्य माणसाचा कैवार ते तंत्रज्ञान घेऊच शकत नाही.

उत्पादनाच्याच नव्हे तर राज्यकारभाराच्याही क्षेत्रात वरचष्मा तंत्रज्ञानाचाच निर्माण होतो. राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त मॅनेजर्स होते. मल्टी नॅशनल कंपन्यांच्या यशस्वी मॅनेजमेंट तज्ञांना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये घेतले होते. कारण त्यांना असं वाटलं की प्रत्येक गोष्टीचं उत्तर तंत्रज्ञानात्मक कार्यक्षमतेत आहे. जी माणसं कंपन्यांचा क्लिष्ट कारभार वाकबगारपणे सांभाळतात त्यांना गुंतागुंतीचे राजकीय-आर्थिक प्रश्नही चुटकीसरशी सोडवता येतील. समाजवाद आणायचा आहे ? बटन दाबा. समाजवाद हजर. अशा पद्धतीच्या काहीशा भ्रामक समजुतीने ही तरुण व राजकीयदृष्टया अननुभवी मंडळी त्या काळात राज्य करीत होती, असं आपल्याला दिसेल. आपण पंजाबचा प्रश्न व्यवस्थापनतंत्राने मिटवू शकू किंवा काश्मिरचा प्रश्न तंत्रज्ञानाने सोडवू शकू अशी त्यांची समजूत होती. वस्तुतः जे प्रश्न राजकीय आहेत त्यांची सोडवणूक ही फक्त राजकीयच असू शकते. विकासाच्या असंतुलनामधून जे प्रश्न निर्माण झाले ते त्या असंतुलनाचे निराकरण करूनच सोडवले जाऊ शकतात. वर्गावर्गाच्या विकासातील असंतुलन, प्रदेश-प्रदेशांच्या विकासातील असंतुलन, विकासाच्या चुकीच्या दिशा, उत्पादनाचे चुकीचे अग्रक्रम यातून निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे फक्त राजकीय निर्णयप्रक्रियांमधूनच मिळू शकतात. ती तंत्रज्ञानामधून मिळू शकत नाहीत.

या राजकीय प्रक्रियाच आज ठप्प झालेल्या आहेत. लोकशाहीच्या दृष्टीने जर सगळ्यात मोठं संकट जर कुठलं असेल तर

आमचा या देशातल्या राजकीय प्रक्रियांवरचा जनतेचा व नेत्यांचा विश्वास उडत चालला आहे. आम्ही या भ्रमात वावरतो की एकदा का आम्ही २१ व्या शतकात गेलो की मग बाकी सर्व प्रश्न आपोआपच मिटतील. आम्ही जर अद्ययावत यंत्रसामुग्री आणली तर मग सामाजिक न्याय हे स्वप्न राहणार नाही. आपोआपच ते प्रत्यक्ष वस्तुस्थिती होईल. आम्हाला हे कळत नाही आहे की अशाप्रकारे राजकारणविरहित झालेली राज्यसंस्था, जिला इंग्रजीत आम्ही ' डिपोलिटीसाईज ' म्हणतो, ही अत्यंत विनाशकारी, अमानुष आणि जुलमी होत असते. आज अशाप्रकारची विनाशक शक्ती आपल्या देशात राज्यसत्तेच्या स्वरूपात निर्माण झालेली आहे. ' डी-पोलिटीसाइज्‌ड स्टेट ' म्हणजे जी राज्यसंस्था लोकांच्या नियंत्रणाखाली नसते, जी लोकांच्या मागण्यांना प्रतिसाद देत नसते, जी लोकांना संवेदनक्षमपणे समजावून घेत नसते, जिथे यांत्रिकपणे निवडणुका होतात, त्यात यांत्रिकपणें मतदान होतं, रांगा लागतात, यांत्रिकपणे बहुमताचं राज्य येतं, कधीकधी पंजाबसारखं फक्त १० टक्के मतदानातूनही सत्तेवर येतं आणि कारभार करतं, पण हा जो काही कारभार आहे तो केवळ यांत्रिक देखावा उरतो. त्याला खरी लोकशाही म्हणता येणार नाही. कारण मतदार आणि प्रतिनिधी यांच्यामधला सततचा अखंड निरंतर संबंध हा लोकशाहीचा प्राण असतो. तोच डिपॉलिटी-साईज्‌ड स्टेटमध्ये नष्ट होतो. एक सहानुभूतिशून्य सत्ता अस्तित्वात येते आणि एखाद्या भस्मासुराप्रमाणे ती लोकशाहीचा घास घेते. या देशातील लोकशाही या प्रचंड मोठ्या संकटाला आज तोंड देत आहे.

समर्थांच्या चंगळवादी गरजांना आज येथे प्राधान्य मिळतं

आणि दुर्बलांच्या जीवनावश्यक गरजांचा चुराडा होतो. कुणाच्या गरजा महत्वाच्या ? जे कोणी बलवंत असतील, जे कोणी धनवंत असतील, जे कोणी राजकीय पक्षाच्या नेत्यांवर नियंत्रण गाजवीत असतील त्यांच्या मागण्यांना प्राधान्य मिळते आणि ज्याच्यापाशी हे काहीही नसेल त्यांच्या मागण्यांना कुणीही विचारीत नाही. या देशाच्या राजकीय उत्पन्नाचा फक्त २ ते ३ टक्के खर्च शिक्षणावर होतो ही लाजिरवाणी परिस्थिती आहे. कोणाचं शिक्षण ? एकीकडे शिक्षणाचा बाजार मांडलाय विनाअनुदान संस्था काढून. मी जर श्रीमंत असेल तर माझा मुलगा कितीही मठ्ठ असला तरी त्याला मी डॉक्टर करू शकतो, इंजिनिअर करू शकतो. ही सोय आज उपलब्ध झालेली आहे आणि गरिबाच्या खऱ्या हुशार मुलाला मात्र शिक्षणाच्या अभावी चौथीपर्यंतसुद्धा जाता येत नाही. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या १०० मुलांपैकी ७० मुलं इयत्ता सहावीच्या आधीच वर्गाच्याबाहेर-शालेय अभ्यासक्रमाच्या बाहेर फेकली गेलेली असतात. ७० टक्के मुलं. केवढं प्रमाण आहे हे. ही गळती, हे ड्रापआऊटस्. या ड्रापआऊटस्साठी काय तर मुक्त विद्यापीठ, या ड्रापआऊटस्साठी काय तर व्होकेशनल गायडन्स. आणि जे कसेबसे टिकून राहतील त्यांच्यासाठी काय तर इंजिनीयरींग कॉलेजेस, मेडिकल कॉलेजेस. त्यांची पात्रता नसताना सुद्धा. पैशाच्या बळावर. शिक्षणावर जो काही एकूण खर्च होतो तोसुद्धा प्रामुख्याने उच्च शिक्षणावर किंवा माध्यमिक शिक्षणावर चाललेला आहे. प्राथमिक शिक्षणाची अक्षम्य हेळसांड चालवली आहे. आणि तरीसुद्धा आम्ही लोकशाहीच्या बाता मारायच्या ? मग या शिक्षणातून तयार झालेला हा जो अभियंता वर्ग आहे किंवा हा जो डॉक्टरांचा वर्ग आहे हा काय करतो ? याची तत्त्वं

चीं मूल्यं कोणती ? हा समाजसेवा करण्यासाठी डॉक्टर वा इंजिनीयर झालेला असतो का ? आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर डोळा ठेवून तो पदवीधर होत असतो. आंतरराष्ट्रीय मल्टीनॅशनल कंपन्यांचे एजंट त्यांच्या कॉलेजवर जात असतात आणि त्याला पास होण्याच्या आधीच बुक करतात. त्यांच्यावर समाजाचा जो प्रचंड खर्च होतो तो कोणाच्या फायद्यासाठी होतो ? आणि ते या देशाच्या प्रगतीमध्ये, विकासामध्ये काय योगदान करतात ?

लोकशाहीच्या दृष्टीने पाहिलं तर हे सगळे अग्रक्रम उलटे सुलटे झालेले आहेत असं आपल्याला दिसेल. प्राथमिक शिक्षण मोठ्या प्रमाणावर व्हायला पाहिजे ते झालेलं नाही. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या पिढीलासुद्धा आज प्रौढ शिक्षण घ्यावं लागतंय ही शोकांतिका आहे. आज जे प्रौढ वयोगटात आहेत ते स्वातंत्र्या-नंतर जन्माला आलेले आहेत. इंग्रजी राजवटीमुळे ते निरक्षर राहिलेले नाहीयेत. त्यांना या गळतीमुळे प्रौढ शिक्षण घ्यावं लागतं. प्रौढ शिक्षणाची सुद्धा दुरवस्थाच आहे. तो स्वतंत्र विषय आहे बोलण्याचा. मुद्दा असा आहे की लोकशाहीच्या दृष्टीने जी पहिली आवश्यक गोष्ट आहे तीसुद्धा आम्ही या विकासक्रमातून देऊ शकलेलो नाही आणि त्यामुळे या विकासाची ही विपरीत फलश्रुती आपल्याला दिसते.

काल आपण फक्त महाराष्ट्रापुरतं बोललो पण सबंध देशभरच ही फलश्रुती आपल्याला पहायला मिळते. आपल्याला असं आढळतं की विकासातून या राष्ट्राची विभागणी दोन राष्ट्रांमध्ये झालेली आहे.बॅरिस्टर जीनांनी एक द्वि–राष्ट्र सिद्धांत स्वातंत्र्या-पूर्वी मांडला होता. तेव्हाची ती दोन राष्ट्रं वेगळी, आणि आता आपण पाहतोय ती दोन राष्ट्रं वेगळी. आता जी आपण पाहतोय

ती दोन राष्ट्रं एकाच राष्ट्रात नांदत आहेत. एक राष्ट्र आहे १/४ लोकांचं, ज्यांना विकासाचे सर्व लाभ मिळालेले आहेत, आणि दुसरं राष्ट्र आहे ३/४ लोकांचं की जे विकासाच्या लाभांपासून वंचित राहिलेले आहेत. 'टेल ऑफ टू सिटीज् ' नावाची एक जग-प्रसिद्ध कादंबरी आहे. इथेतर प्रत्येक शहर ही दोन शहरं, प्रत्येक खेडे ही दोन खेडी आहेत. प्रत्येक राज्य म्हणजे वस्तुत: दोन राज्यं आहेत. आपले भारत राष्ट्र हे प्रत्यक्षात दोन राष्ट्रं आहेत. कुठं कुठं जोडणार? आकाश फाटल्यासारखी ही अवस्था आहे, आणि आकाश फाटल्यानंतर ठिगळं कुठे कुठे लावायची अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

दोन टोकांची या दोन राष्ट्रांची अवस्था आहे. एकाला वाटेल तेवढं पाणी उपलब्ध आहे. सांडायला, बागा भिजवायला किंवा उधळायला, नुसतंच घर गार करायला, आणि दुसऱ्याला प्यायला पाणी नाही. ही शोकांतिका आहे. पण वस्तुस्थिती आहे. तेव्हा लाभान्वित झालेली आणि लाभवंचित असलेली दोन राष्ट्रे ही एकाच राष्ट्रामध्ये सामावलेली आहेत. त्यात जे लाभापासून वंचित राहिलेलं आहेत, ते संख्येने प्रचंड प्रमाणात आहेत. त्यांच्या नावानंच या लोकशाहीचा कारभार चालतो. त्यांच्या नांवाने आमची ही संसदीय लोकशाही अबाधित आहे, त्यांच्या नावानंच आमची सार्वभौम संसद कारभार करत असते आणि तिथे आमचे प्रतिनिधी मारामाऱ्या करत असतात. मात्र ही सामान्य माणसं विधिमंडळातल्या चिंतनाचा कधी विषय होत नाहीत. बोलण्याचा कधी विषय होत नाहीत. विधिमंडळाचं कामकाज टेलिव्हीजनवर दाखवतात तेव्हा आम्ही पाहतो की सामान्य माणूस तिथे कुठेच नसतो. या वंचितांच्या राष्ट्राबद्दल

तिथे कोणीही बोलत नाही. आणि तरीही आपण लोकशाही टिकवण्याचा टेंभा मिरवतो.

विपरीत विकासप्रक्रियेचा दुसरा परिणाम आपल्याला असा दिसतोय की समाजातले ताणतणाव आज प्रचंड वाढलेले आहेत. काही अंशी असं होणे स्वाभाविक आहे मी मघाशी म्हटल्याप्रमाणे वंचितानाही आज जाग येत आहे. ते संघटित होतायेत. नवजागृत झालेल्या या वंचितांची दिशाभूल करण्यासाठी समाजाचे अनेक शत्रू टपून बसलेले आहेत. कोणी त्यांना सांगतात की अरे तुम्ही मराठी माणसं आहात आणि मराठी माणसांना त्यांच्याच प्रांतात विकासाच्या वाटा बंद होतात कारण दाक्षिणात्य लोक इथं येऊन बसलेले आहेत, हाकला त्यांना बाहेर. की लगेच त्यांच्यामागें त्यांची लुंगी ओढायला आपण धावतो. नंतर कोणी सांगतं की, नाही, दाक्षिणात्य नाही, मुसलमानच खरे गुन्हेगार आहेत. ते हिरवे साप चेचून टाकले पाहिजेत आणि मग आम्ही मुसलमानांचा द्वेष करायला लागतो. दलितांना असं वाटतं की आणखी काहीकाळ आरक्षण पाहिजे म्हणून ते आरक्षणासाठी आंदोलन करतात. तर सवर्ण लोक असं म्हणतात की या आरक्षणांमुळें आमच्या मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. आरक्षणामुळे आमच्या मुलांना मेडिकलला प्रवेश मिळत नाही. संघर्ष सुरू होतो. मंडल आयोगाच्या निमित्ताने मुडदे पडतात.

म्हणजे विकासाच्या प्रक्रियेमध्ये ज्या त्रुटी – विकृती निर्माण झाल्यात त्या नीट समजावून न घेता आपण दरवेळी कोणीतरी काल्पनिक खलपुरुष निर्माण करतो. आणि त्यावरच शरसंधान करीत सुटतो. आपण समजतो की अमूक आमचा हितशत्रू आहे. हा आमचा दुष्मन आहे, हा मुस्लिम हा आमचा दुष्मन आहे.

हा आमचा दुष्मन, तो आमचा दुष्मन आहे आणि मग त्यांच द्वेष मत्सर सुरू होतो, दंगली पेटतात आणि दंगलींच्या त्या तापल्या तव्यावर राजकीय पुढारी आपला स्वार्थ साधून घेत असतात. हिंदुत्वाचं राजकारण करणारे जे कोणी आहेत किंवा इस्लामचं राजकारण करणारे जे कोणी आहेत किंवा जातीयतेचं राजकारण करणारे जे कोणी आहेत ते विकासाचे प्रश्न खऱ्या दृष्टीने समजावून सांगत नाहीत, लोकांना समजावून घेऊ देत नाहीत. लोकांची मनं भडकावतात आणि स्वतःचा स्वार्थच साधतात. त्यासाठी कधी ते गायीची शेपटी धरतील तर कधी गंगेचं पाणी आणतील तर कधी रामाची शपथ घेतील तर कधी एकता रथ काढतील ! बहुसंख्याकाना असं आक्रमक होतांना पाहिल्यावर अल्पसंख्याक आपल्या संकुचित विश्वात सुरक्षितता शोधू लागतात असं काहीतरी सुरू असतं. आणि या देशाच्या राजकारणामध्ये पेट्रोल ओतण्याचे काम आमच्या विकास-प्रक्रियेतल्या विकृती व त्रुटी करीत असतात, हे लक्षात घ्यायला पाहिजे. आता आपल्या विकासाच्या क्रमामध्ये अधिक रोजगार निर्माण होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. या देशातले सगळे मुसलमान जरी आपण हाकलून दिले, सगळे दलित हद्दपार केले आणि या देशातले सगळे दाक्षिणात्य आपआपल्या प्रांतात परत पाठविले तरीसुद्धा उरलेल्या लोकांनाही रोजगार देण्याची ताकद आपल्या विकासप्रक्रियेत नाही हे आपण लक्षात घेतलं पाहिजे, आणि द्वेषाचं भ्रममूलक राजकारण थांबवलं पाहिजे.

आम्हाला बेकारीचा प्रश्न म्हणजे फक्त सुशिक्षित बेकारांचा वाटतो. हा तर फारच किरकोळ भाग आहे बेकारीचा. खरे बेकार खेड्यातील निरक्षर आहेत, शेतमजूर आहेत किंवा अत्यंत अल्प-

भूधारक आहेत. ज्यांची बेकारी नोंदवलीच जात नाही. एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमध्ये त्यांची नांवे नसतात, त्यामुळे ते बेकार नसतात असं थोडंच आहे. याचप्रमाणे पांच एकरांचा तुकडा धारण करणारा शेतकरीसुद्धा अर्धबेकार असतो तेव्हा अर्धबेकारी, छुपी बेकारी असे कितीतरी प्रकार आहेत आणि या विकास प्रतिमानामध्ये पूर्ण रोजगार, सन्माननीय रोजगार निर्माण होण्याची शक्यता नाही हे सत्य आपण स्वीकारलं पाहिजे. कितीही कारखाने निघाले किंवा उद्योगधंदे निघाले तरीसुद्धा ग्रामीण भागातल्या बेरोजगारांना सन्माननीय रोजगार त्यातून उपलब्ध होऊ शकत नाही. प्रश्न केवळ लोकसंख्या वाढीचाही नाही. इथली निम्मी लोकसंख्या जरी भूकंपात गाडली गेली तरीसुद्धा उरलेली निम्मे याच प्रमाणात उपाशी राहील हे लक्षात घ्या. कारण आपल्या विकासाची चुकलेली दिशा या दुर्दशेला कारणीभूत आहे हे आपण समजावून घेतलं पाहिजे.

शहरीकरण या देशात झपाट्यानं चाललेलं आहे. लोक खेड्यातून शहरांत येतात. कशासाठी शहरात येतात लोक? केवळ आकर्षण म्हणून येत नाहीत. शहरी जीवनाचं त्यांना आकर्षण वाटतं असा एक भ्रम आमचे लेखक निर्माण करतात. वस्तुत: त्यांना शहरी जीवनाचं आकर्षण नसतं. पण खेड्यात त्यांना पोट भरणं अशक्य झालेलं असतं म्हणून ते शहराकडे धाव घेतात. खेड्याने नाकारलेले लोक, खेड्यानें धिक्कारलेले लोक, खेड्याने बाहेर हुसकलेले लोक शहरात येतात. खेड्यामध्ये त्यांना ओळखणारे लोक असतात, म्हणून ते कुठलेही व्यवसाय तिथे करू शकत नाहीत. हमाली करू शकत नाहीत, बुटपॉलिश करू शकत नाहीत. शहरात आल्यानंतर त्यांना कोणी ओळखत नाहीत. तिथे ते

अनामिक होतात, ॲनानिमस होतात. ॲनानिमस झाल्यानंतर ते वाटेल तो व्यवसाय करू शकतात, म्हणून ते शहरात येतात. शहरात येणाऱ्यांना शहरामध्ये प्रतिष्ठापूर्ण रोजगाराची हमी असते म्हणून ते येत नाहीत, तर कसं बसं जगता येतं म्हणून येतात. यातून झोपडपट्टया वाढतात. आणि या गलिच्छ झोपडपट्ट्यांची राज्यकर्त्यांना लाज वाटल्यामुळे त्या उद्ध्वस्त केल्या जातात, राजकारणी लोकांच्या लहरीखातर. शहरांची विकृत होणारी वाढ, त्याच्यामुळे नागरी सुविधांवर पडणारा. प्रचंड ताण आणि अक्षरश: मोडकळीला आलेली ती व्यवस्था हे आज चित्र आपल्याला शहरोशहरी दिसतंय. लोकशाहीच्या दृष्टीने हे भयानक आहे हे वेगळं सांगायला नकोच. जोपर्यंत खऱ्या अर्थाने खेडी ही राहण्याच्या योग्यतेची होत नाहीत तोपर्यंत हे असंच चालणार आहे.

विकासाच्या नावाखाली एकापरीनें आपण एक नवा वसाहतवाद या देशात सुरु केलेला आहे इंग्रजांच्या काळामध्ये ते राज्यकर्ते असे म्हणायचे की भारतीय लोकांना काही अक्कल नाही, ते काही स्वत: राज्य करु शकत नाहीत. आज आपले शहरी लोक हेच म्हणतात, की खेड्यातल्या लोकांना काय अक्कल नाही. खेड्यातले सधन लोक म्हणतात की निर्धन लोकांना काही अक्कल नाही. यांना असंच बैलासारखं वापरावं लागतं. यातूनच हा देशी वसाहतवाद निष्पन्न झाला आहे. शोषकही देशीच आणि शोषितही देशीच. या देशी वसाहतवादाला फार मोठ्या प्रमाणावर विकास कार्यक्रमातून चालना मिळाली आहे. चाळीसपंचेचाळीस वर्षांच्या विकासाच्या वाटचालीनंतरही जनसामान्यांच्या वाट्याला आजही दारिद्र्य आहे, निरक्षरता आहे, बालमृत्यू आहे, कुपोषणामुळे ४०

टक्के बालकांचे डोळे दरवर्षी जातात. आणि आपण आरोग्याच्या काय गोष्टीं करतो ? तेव्हा ही जी एक अवस्था आहे ही अक्षरशः वासाहतिक अवस्थेसारखीच आहे. अभिजनांना सामान्यांच्या जीवनपद्धतीबद्दल काहीही देणघेणं नाहीय, ते या गुर्मीत आहेत की आम्ही २० टक्के, आम्ही राज्य करतो, कारण आम्ही श्रेष्ठी आहोत, आम्ही अभिजन आहोत. आम्ही डॉमिनन्ट क्लास आहोत, आम्ही डॉमिनन्ट कास्ट आहोत, म्हणून आम्ही राज्य करु. आणि ते तुम्ही बिनतक्रार सहन केले पाहिजे. अशाप्रकारची भूमिका ही नववसाहतवादाची भूमिका याच्यामध्ये आहे, असे आपल्याला दिसून येईल.

चंगळवादी जीवनपद्धतीचा प्रसार हा राजरोस सुरु आहे. टेलिव्हीजन आलं. रंगीत टेलिव्हीजन येतो, अँन्टेना टी. व्ही. येतो, स्टार टी. व्ही येतो आणि या सगळयांचं प्रयोजन एकच असतं की या विलासी जीवनाची चटक लावून माणसाला विचारांपासून परावृत्त करायचं. देशीविदेशी भांडवलदारांनी आधी कारखान्यातनं माल तयार करायचा आणि मग मालासाठी बाजारपेठ निर्माण करण्यासाठी जाहिरातीचं तंत्र वापरायचं. मग नुसते अंगाला लावायचे साबणच किती प्रकारचे ? त्या तयार करणाऱ्या कंपन्या किती मोठमोठ्या व मल्टीनॅशनल ? १०–१० आंतरराष्ट्रीय कंपन्या एकत्र येऊन काय तयार करतात, तर साबण ! एक ब्लेड ! या गरजा आम्ही भागवू शकत नाही ? स्थानिक पातळीवर ? परंतु नाही. या स्पर्धेमध्ये तुम्हाला गरज असो वा नसो, तुम्हाला नटीसारखं सुंदर दिसायचं तर हे क्रीम लावलं पाहिजे आणि तो साबण लावलाच पाहिजे ! अशा पद्धतीनें गरजांची कृत्रिम निर्मिती केली जाते. सतत एक अतृप्तता माणसांच्या मनांमध्यें टिकवून

ठेवली जाते. माणूस कधीही संपूर्ण सुखी होऊ नये, त्याला सतत असोशी वाटली पाहिजे, एक गरज संपली की दुसरी, दुसरी संपली की तिसरी, तिसरी संपली की चौथी. टेलिव्हीजन झालं की वॉशिंग मशिन, वॉशिंग मशिन झालं की घरझाडणी यंत्र - नव - नविन काहीतरी देत राहायचं आणि ही निरंतर भूक निर्माण करीत राहायचं. एकेक वस्तु घेतली की त्या माणसाला खोटं समाधान त्या त्या वेळी मिळू द्यायचं. पण खरं समाधान कधीही मिळवू द्यायचे नाही ! हेच या विकास प्रतिमानाचं उद्दिष्ट आहे, हा एक सापळा आहे. माणसाला विचारापासून परावृत्त करणारा हा सापळा आहे. स्वतः खेरीज इतर कोणाचाही विचार करु न देणं हा त्याचा हेतू आहे आणि हा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरु आहे हे लक्षात घ्या.

टेलिव्हीजनमुळे समाजहिताचं दुसरं तिसरं काही झालेलं नाही, पण हे मात्र नक्कीच झालेलं आहे की आपण गाफील होत चाललेलो आहोत. आपण आत्मकेंद्रित होत चाललो आहोत. आज आपला मध्यम वर्ग इतका बथ्थड झालेला आहे, इतका संवेदनाशून्य झालेला आहे, इतका आत्मकेंद्रित झालेला आहे की त्याला देशात घडणाऱ्या घडामोडींबद्दल काहीही वाटत नाही. आज पंजाबमध्ये अमूक इतकी माणसं मेली हे रोज बातम्यांमध्ये ऐकल्यानंतर आपल्या घशात चहाचा घोटसुद्धा अडत नाही. आपल्याला काहीच वाटत नाही, काहीच होत नाही. बिहारमध्ये इतके इतके भूकबळी पडले हे ऐकून आपल्याला काही वाटतच नाही. बिहारमधल्या ९० टक्के स्त्रिया या निरक्षर आहेत हे सत्य आपण ऐकतो, ठीक आहे, असतील त्याला काय ? इतका स्वतः पुरता विचार करणारा निगरगट्ट मध्यम वर्ग यांनी तयार केलेला

आहे. आणि या २० टक्के मध्यम वर्गाच्याच भोवती इथली सबंध विकासप्रक्रिया फिरते.

लोकशाहीच्या दृष्टीने निम्म्या असलेल्या स्त्रिया, त्यांची अवस्था काय आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरातून स्त्रियांच्या पदरात कोणते लाभ पडले ? स्त्रियांच्या चळवळींना आता याची जाणीव यायला लागलेली आहे. चळवळीत नसलेल्या स्त्रियांना तर अजूनही ती नाही. त्यांना आपल्या चार गोष्टी नुसत्या मिळाल्या, फुला-सारख्या अलगद कोणी आणून दिल्या की त्या संतुष्ट होतात. पण चळवळीतल्या स्त्रियासुद्धा कालपरवापर्यंत स्त्री पुरुष समतेबद्दल भांडायच्या, घरात पुरुषानी कामे केली पाहिजेत वगैरे वगैरे अशा स्वरुपाची आंदोलनं करायच्या. आज त्यांच्या लक्षात आलं आहे की हा प्रश्न केवळ पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळविण्याचा नाहीये तर हा या सबंध विज्ञान-तंत्रज्ञानाशी आणि विकासप्रक्रियेशी जोडला गेलेला प्रश्न आहे. जसं जसं नवं तंत्रज्ञान आलं तसतशा स्त्रिया त्या त्या क्षेत्रातून बाहेर फेकल्या गेल्या हा आलेख आता त्यांच्यासमोर आला. कुठलीही गोष्ट जोपर्यंत काबाडकष्टाची होती तोपर्यंत ते स्त्रीचं काम होतं. कडब्याची कटनी करायचं कष्टाचं काम, घाम गाळायचं काम स्त्रिया करायच्या. कटनी यंत्र आल्या-वर ते पुरुषाचं काम झालं. कारण आता विजेचं बटन दाबावं लागतं, बेल्ट चढवावा लागतो, हे पुरुषी काम. तंत्रज्ञानाचं काम हे पुरुषाचं आणि हे तुम्हाला सांगतो थेट इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत खरं आहे. कॉम्प्युटर तयार करण्याच्या कारखान्यामध्ये स्त्रियांना दिली जाणारी कामं आणि पुरुषांना दिली जाणारी कामं यामध्ये गुणात्मक फरक आहे. स्त्रियांना फक्त असेंब्लींगचे काम मिळतं. चार स्पेअरपार्ट घ्यायचे, ते जुळवायचे, त्याची काय असेल ती

बांधणी करायची. रिपीटिटिव असं हे काम मानलं जातं. आणि काय फारसं डोकं लागत नाही, त्याला फक्त सवय लागते. त्याला फक्त सराव लागतो. तो केला की बायका ते काम करू शकतात. मग बायका जे काम करू शकतात त्याला बुद्धीची गरज नसते हा समज यातून दृढ होतो. इलेक्ट्रॉनिक्सच्या विविध यंत्रांचा वापर करणाऱ्या बायकांनी याचा विचार करावा की नव्या यंत्रतंत्रांचा प्रसार करण्याच्या या प्रक्रियेमध्ये एक कारस्थान अंतर्भूत आहे. स्त्रियांना उत्पादन प्रक्रियेतून वगळण्याचं. कॉम्प्युटरसंबंधी धोरणात्मक निर्णय घेताना किती स्त्रिया तिथं हजर होत्या. आपल्याला या या प्रकारची टेक्नॉलॉजी पाहिजे, या या प्रकारची नको, असं म्हणायला किती स्त्रिया हजर होत्या ? आज स्त्रीवादी चळवळींनी ज्या इको-फेमिनिझम – पर्यावरणनिष्ट स्त्रीवाद – असं म्हणतात, ती भूमिका घ्यायला सुरूवात केलेली आहे. त्यांच्या हे लक्षात आलंय की जोपर्यंत आपण या विकासक्रमाच्या विरोधात बोलत नाही आणि विकासक्रमाच्या विरोधात भूमिका घेत नाही, तोपर्यंत आपल्या समस्या आपण खऱ्या अर्थानें सोडवू शकत नाही.

निसर्ग आणि स्त्रिया या दोघांवरही पुरुषांनी स्वामित्व गाजवलेलं आहे. स्वामित्व गाजवलंय याचा अर्थ त्यांच्यावर वाटेल तसे बलात्कार केलेले आहेत. त्यांना मन मानेल तसं वापरलेलं आहे. कुठल्याही परिणामांची तमा न करता वापरलेलं आहे. आणि या भोगवृत्तीला निसर्ग आणि स्त्रिया दोघांनाही बळी पडावं लागलेलं आहे. आणि आपल्याला एकत्रितपणे स्त्रियांचे हक्क आणि निसर्गाचे संरक्षण या चळवळी चालवाव्या लागतील हे भान स्त्रीवादी चळवळीला आज आलेलं आहे.

लोकशाहीच्या दृष्टीने निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांना आजच्या विकासाच्या प्रक्रियेतून काय मिळालेलं आहे किंवा त्यांच्या पदरात काय पडलेलं आहे याचा ताळेबंद आपल्याला घ्यावा लागेल. मग आपल्या लक्षात येईल की या विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीला तिचं योग्य ते स्थान, तिचा दर्जा, तिची प्रतिष्ठा आणि नागरिक म्हणून असलेली तिची स्वायत्तता या गोष्टी स्त्रियांना कधीही लाभू शकणार नाहीत. जोपर्यंत मूलतःच वेगळा विचार केला जात नाही तोपर्यंत.

शेवटचा एक मुद्दा राहिला तो सांगतो आणि आवरतो. एकूण मांडणीच्या दृष्टीने तो आवश्यक आहे. पर्यावरणाचा मुद्दा. पर्यावरणाचा मुद्दा हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. आजच्या विकासाच्या संदर्भात तो कळीचा मुद्दा ठरलेला आहे. मी सुरुवातीला असं म्हणालो की माणसाला जेव्हा असा अहंकारवजा आत्मविश्वास निर्माण झाला की मी कर्ता आहे, मी मध्यबिंदू आहे आणि सबंध पृथ्वी फक्त माझ्यासाठी आहे. मी हे विश्व हवं तसं वापरू शकेन, तेव्हापासून या संकटाची सुरुवात झाली आहे. माणसानं पाण्याचा वाटेल तसा वापर केला. आजही तो ७० टक्के पाणी ऊसावर वाया घालवीत आहे. आजही मोठमोठी धरणं तो बांधतोय. मोठमोठी धरणं बांधून निसर्गाचा समतोल ढळवतोय. आजही त्या ओझोनचा थर एका ठिकाणी फुटतोय, याच्या धोक्याची कल्पना येत नाही. कारखानदारीमुळे औद्योगीकरणामुळे पर्यावरण प्रदूषित झालं आहे. हा प्रश्न केवळ भारतापुरता मर्यादित नाही हा प्रश्न सबंध मानवाच्या अस्तित्वाशी जोडला गेला आहे. ओझोनचा जो थर पृथ्वीभोवती आहे तो थर जर एका ठिकाणी फुटला तर सूर्याच्या उष्णतेने सबंध पृथ्वी भाजून निघेल.

मनुष्यजीवन तिथं शिल्लक राहणार नाही, प्राणीजीवन शिल्लक राहणार नाही. निसर्ग शिल्लक राहणार नाही, हा धोका निकटच्या भवितव्यात येऊ घातलेला आहे. केवळ माणसाच्या गाढवपणामुळे तो येऊ घातलेला आहे. तो निसर्गाशी अशी बलात्कारी भूमिका घेऊन वागल्यामुळे हे होत आहे.

निसर्ग आणि माणूस यांच्यात एक सहजीवन असलं पाहिजे. निसर्ग आणि माणूस यांचेमध्ये परस्परपोषक संबंध असले पाहिजेत. निसर्गातल्या शक्तींचा वापर करताना माणसाने अत्यंत जपून तो केला पाहिजे. आपल्याला मिळालेलं हे वरदान पुढच्या पिढ्यांना-सुद्धा लाभावं याचा विचार माणसाने केला पाहिजे. विकासाची प्रक्रिया ही निरंतर विकासाची प्रक्रिया असली पाहिजे. नाहीतर माझ्या काळामध्ये मी वाट्टेल तेवढा विकास करीन आणि पुढच्या पिढ्या खड्ड्यात का जाईनात, मला काय त्याचं करायचं अशी भूमिका घेऊन चालणार नाही. निसर्गातल्या ज्या ज्या उर्जा संपणाऱ्या आहेत, त्या जपून वापरल्या पाहिजेत. पेट्रोल संपणारे आहे. वापरून वापरून तुम्ही किती वापराल ? पेट्रोलला पर्याय तुम्ही शोधू शकता, पाण्याला पर्याय तुम्ही कुठला शोधणार? १९८३साली जेवढं पाणी दरमाणसी उपलब्ध होतं त्याच्या १/४ सुद्धा पाणी इ. स. २००० मध्ये उपलब्ध राहणार नाही असा शास्त्रज्ञांचा होरा आहे. किती भीषण संकट आहे? पाण्याला पर्याय कुठून आणणार ? आणि त्या पाण्याची जी उधळमाप आपण करतो त्याचा अत्यंत अनियोजित वापर आपण करतो. पिकांचा विचार करीत नाही, प्रदेशाचा विचार करीत नाही. भूमीचा विचार करीत नाही. एकूण राष्ट्रीय संकटाचा आपण विचार करीत नाही, वापरतो. फक्त मनःपूतपणे पाणी.

निसर्गाशी अत्यंत अमानुष, अत्यंत आत्मघातकी खेळ माणसानं केलेले आहेत. त्यामध्ये प्रदूषणाचाही भाग फार मोठा आहे. मी असं म्हणतो की भोपाळमध्ये जे घडलं तो अपघात नव्हता, चेर्नोबीलमध्ये जे घडलं तो अपघात नव्हता, हे या विकासक्रमाचं एक अपरिहार्य फलित आहे हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. भोपाळसारखा प्रसंग जर इतर कुठल्या देशात झाला असता तर वर्षानुवर्षे त्याच्यावर चर्चा लोकांनी केली असती. या देशामध्ये मात्र चार-दोन लोक वगळता त्याबद्दल कोणी काही बोललंच नाही. एक विषारी हत्याकांड होतं आणि हजारो माणसं मरतात आणि पिढ्या बरबाद होतात मरणारी हजारो असतील पण त्यांच्या पुढच्या चार पिढ्या बरबाद झालेल्या आहेत त्याचं काय? या मानवी नुकसानीचा आपण कधीतरी हिशेब करणार आहोत की नाही ? केवळ ग्रॉस नॅशनल इन्कम वाढलं, आयात वाढली, निर्यात वाढली, अमूक वाढली तमूक वाढली या आकडेवारीच्या भाषेत फक्त आपण बोलणार आहोत ? मानवी लॉस आणि पर्यावरणाच्या स्वरूपात होणारा हा लॉस भयानक मोठा आहे.

या सगळ्या विकासक्रमामध्ये जे वंचित राहतात ज्यांची संख्या ८० टक्के आहे, ते जेव्हा अस्वस्थ होतात, ते जेव्हा आंदोलन करतात तेव्हा त्यांच्याशी वागण्याची एकच भाषा फक्त आम्हाला माहीत असते ती म्हणजे दडपणे. आमचे गृहमंत्री आज म्हणाले की लष्कराला नाहीतरी काही उद्योग नाही युद्ध नसल्यामुळे, त्यामुळे आम्ही ते वापरणार आहोत, लष्कराच्या मदतीशिवाय यांना निवडणुका घेता येत नाहीत. काय लोकशाही आहे आपली ? निवडणूका होऊ शकत नाहीत कारण पुरेसं लष्कर उपलब्ध नाही म्हणून. जसं काही निवडणुकांसाठी मतपेट्याप्रमाणे

लष्करही लागतं. शांतता, सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून आम्ही टेररिस्टांच्या प्रश्नाला एकजात सरसकट सारखेच ठरवतो. जसे काही आसामचे टेररिस्ट, पंजाबचे टेररिस्ट, काश्मीरचे टेररिस्ट हे सगळे एकच आहेत. आणि मग आम्ही टेररिस्ट डिसरपटिव्ह ॲक्ट करतो व राज्याच्या ठिकाणी अमर्याद सत्ता देतो. आणि मग त्या सत्तेचा वापर करून आपल्या कुठल्याही विरोधकाला टेररिस्ट ठरवून मारता येते राज्यसंस्थेला. तो टेररिस्ट असलाच पाहिजे असे नाही. आणि कोणीही टेररिस्ट हा जन्मजात टेररिस्ट नसतो. नक्षलवाद्यांच्या विचाराचा मी नाही. हिंसाचारातून या समाजाचे प्रश्न मिटतील हे मी मानीत नाही. परंतु कोणीही जन्मजात नक्षलवादी नसतो हे माझं म्हणणं आहे. या विकासाच्या विपरीत प्रक्रियेने निर्माण केलेले हे नक्षलवादी आहेत. राज्यकर्त्यांना जर संविधानाची भाषा समजत नसेल तर संविधानबाह्य माध्यमांचा वापर केला पाहिजे असं त्यांना वाटतं. ते चुकीच्या दिशेने निघाले असतील पण ते प्रामाणिक आहेत. आणि तुम्हाला त्यांच्याशी बोलायला राजकीय मार्ग सापडत नाही, कारण तुमची राजकीय प्रतिभा संपलेली आहे. तुमची राजकीय विचारशक्ती संपलेली आहे. तुम्ही त्यांना फक्त वरवंटाखाली भरडून काढू पाहता. वरवंटाखाली भरडून कुठलाही टेररिस्ट कधी नष्ट होत नसतो. जगाच्या इतिहासामधील कोणतीही दहशतवादी चळवळ ही केवळ वरवंटाखाली भरडून नष्ट झालेली नाही. टेररिझमचासुद्धा निचरा राजकीय प्रक्रियेतूनच केला जाऊ शकतो. परंतु आम्ही आज फक्त हिंसाचाराची भाषा करतो. अतिरेक्यांच्या हिंसाचारापेक्षा राज्यसंस्थेने केलेला हिंसाचार याचे स्वरूप जास्त भीषण असते. कारण राज्यसंस्था ही कायदेशीरपणे हिंसाचार करू शकते.

राज्यसंस्थेचं हिंसाचार करण्याचं सामर्थ्यं मोठं असतं म्हणून ती जास्त हिंसाचार करू शकते.

या लोकशाहीत सर्वात मोठा धोका हा आहे की, राज्यसंस्थेचे स्वरूप हिंसक होत चाललेलं आहे. आक्रमक, क्रूर आणि पाशवी होत चाललेलं आहे. चुकीच्या विकासक्रमाची फलश्रुती म्हणून निर्माण झालेला लोकांच्या मनामधला असंतोष दडपण्यासाठी राज्यसंस्था हिंसाचार करते. संघटित शेतमजूर मोर्चा काढतात, आणि हे लाठीमार आणि गोळीबार करतात. विकासातला ते वाटा मागतायेत. तुम्हाला तो वाटा देणे शक्य नसेल, या विकासक्रमाला शक्य नसेल तर वेगळा विचार करा.

जेव्हा आंदोलन उभं राहतं एखाद्या सरदार सरोवराच्या विरोधात नर्मदा आंदोलन उभं राहतं तेव्हा सबंध ताकदीनिशी सरकार ते चिरडून टाकण्याचा प्रयत्न करतं. कारण ते आंदोलन हे एका धरणाशी संबंधित आंदोलन नसतं, हे आंदोलन केवळ तिथल्या विस्थापितांचं पुनर्वसन मागणारं आंदोलन नसतं तर या सबंध विकासक्रमाला आव्हानित करणारं ते आंदोलन असतं. ते हे सांगतं की तुम्ही जी विकासाची दिशा घेतली ती चुकीची आहे. आणि तिच्यामधून हे सगळे दुष्परिणाम निर्माण झालेले आहेत. तिच्यामधून या सगळ्या आपत्ती निर्माण झालेल्या आहेत. तुम्ही जोपर्यंत याचा पुन्हा विचार करीत नाही तोपर्यंत हे प्रश्न मिटणार नाहीत.

नर्मदा आंदोलनाच्या स्वरूपात आज उभ्या राहिलेल्या आव्हानाच्या मुद्द्यावरच मी आज थांबतो. आपण त्याच्यावरती विचार करावा असं मी आपल्याला आवाहन करतो. माझ्यापरीने पर्यायी विकासाचं प्रतिमान कुठलं असू शकतं याची मांडणी

करण्याचा उद्या मी प्रयत्न करीन. आजच्या व्याख्यांनाबद्दल मी आपले आभार मानतो आणि मी आपली रजा घेतो.

# आपल्या विकासाची दिशा
# आणि
# लोकशाहीचे भवितव्य

**१४ मार्च १९९२**

**' विकासाचे पर्यायी प्रतिमान '**

डॉ. भा. ल. भोळे,
नागपूर विद्यापीठ, नागपूर

काल आपण सध्याच्या विकास प्रतिमानाबद्दल आणि मुख्यत: त्यात मूलभूत असलेल्या लोकशाहीच्या धोक्यांबद्दल बोललो. मी असं म्हणालो की विषयाच्या क्रमात आजच्या आपल्या तीन व्याख्यानांच्या शेवटच्या टप्प्यावर आताच्या विकास प्रतिमानाला पर्यायी असे विकास प्रतिमान आपण सुचवू शकतो काय याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीन.

आताचं विकास प्रतिमान पूर्णपणे फसलेलं आहे याबद्दल माझ्या मनात शंका नाही. त्यातून निर्माण झालेल्या विकृती आणि अपप्रवृत्ती लोकशाहीला गिळंकृत करायला निघालेल्या आहेत याहीबद्दल मला शंका नाही. या विकासप्रतिमानामध्ये थातूर

मातूर बदल करून चालू शकेल यावर माझा विश्वास नाही आणि त्यामुळे मुळात जाऊन विचार केल्याशिवाय आणि एका वेगळ्या पर्यायी प्रतिमानाचा अवलंब केल्याशिवाय आपल्या राज्यव्यवस्थेला आपल्या अर्थव्यवस्थेला लागलेलं जे ग्रहण आहे ते दूर होऊ शकणार नाही आणि इथल्या लोकशाहीची वाट ही खऱ्या अर्थाने निर्वेध होणार नाही. केवळ औपचारिक पातळी-वरच्या लोकशाहीचा आनंद आपण किती दिवस साजरा करायचा? दरवर्षी २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिन आपण साजरा करतो आणि ही लोकशाही अशीच चालू राहो असं म्हणतो. पण खऱ्या अर्थानं ही लोकशाही २० टक्के लोकांची लोकशाही आहे, हे काल आपण पाहिलं. ती ८० टक्क्यांची व्हायची असेल तर काय केलं पाहिजे याचा विचार आपल्याला आता प्रस्तुत आहे.

काल जाता जाता मी असं म्हणालो की मेधा पाटकर ही सुविद्य युवती टाटा इन्स्टिटयूटमधला आपला अभ्यासक्रम सोडून नर्मदा बचावच्या आंदोलनाला जाते, त्या नर्मदेच्या खोऱ्यात जाऊन राहते. तिथल्या आदिवासींच्यामध्ये एकरूप होते, एकजीव होते. त्यांचे सगळे प्रश्न आपले प्रश्न मानते. त्याना संघटित करते आणि त्या सरदार सरोवराविरुद्ध एक आंदोलन उभे करते. ज्याची दखल गुजराथ व महाराष्ट्रालाच नव्हे तर सबंध जगाला घ्यावी लागते. हे जे घडलं आहे की एका व्यक्तीनं चिवटपणे केलेल्या प्रयत्नांना जो प्रतिसाद मिळाला आहे याचं रहस्य काय?

हे आंदोलन कशासाठी आहे? नर्मदेवरचे हे एक धरण होऊ नये एवढंच प्रयोजन या आंदोलनाचे आहे काय? एवढंच जर प्रयोजन असतं तर त्याला इतका प्रचंड प्रतिसाद मिळाला नसता, आणि आजच्या आपल्या व्याख्यानात त्याचा उल्लेख करण्याचंही

काहीच कारण नव्हतं. कारण अशी आंदोलनं पुष्कळ होतात, ठिकठिकाणी होतात. प्रत्येक धरणाच्यावेळी झालेली आहेत. मग नर्मदा बचाव या आंदोलनाचे वैशिष्टय काय ? याचं वैशिष्टय असं आहे की हा प्रश्न आता केवळ एका धरणापुरता मर्यादित राहिलेला नाही. हे धरण व्हावं की होऊ नये, या धरणाचे संभाव्य लाभ म्हणून जे सांगितले जातात ते खऱ्या अर्थानं होणार आहेत की नाहीत ? सरदार सरोवरामुळे सगळा समाज लाभान्वित होणार आहे काय ? हे प्रश्न तर आहेतच. परंतु केवळ या प्रश्नांपुरतं हे आंदोलन मर्यादित नाही. पुनर्वसनाचा प्रश्न पुढे आला आणि लोकांना, मेधा पाटकरांना असे विचारले की तुम्ही पुनर्वसनाच्या प्रश्नाचाच आग्रह धरता ना ? ज्या लोकांचं या धरणामुळे विस्थापन होणार आहे त्यांचं जर पुनर्वसन आम्ही केलं तर तुमची काही हरकत आहे का या धरणाला ? सकृतदर्शनी फार सोपा प्रश्न वाटला. याच्या आधी अनेकदा असं झालेले आहे की धरणग्रस्त जे लोक असतील त्यांना पुनर्वसनाची हमी द्यायची, त्यांना कुठेतरी जागा द्यायची, जमीन द्यायची, घरं बांधून द्यायची मग पुनर्वसन झालं म्हणून घोषित करायचं. हे घडलेलं आहे. पुनर्वसनाचा हा जर सोपा प्रश्न असता तर तो सोडवणं काही अवघड नव्हतं. केव्हाही तो सोडवता आला असता.

मेधा पाटकरांनी हे स्पष्ट केलं की आजपर्यंतच्या कुठल्याही मोठ्या धरणाच्या विस्थापितांचं पुनर्वसन धडपणे झालेलं नाही. खरतर झालेलंच नाही आणि होऊही शकत नाही. पुनर्वसनाची त्यांची मागणी म्हणजे काहीतरी जे असाध्य आहे ते साध्य करून दाखवा अशाप्रकारची मागणी आहे. एकाप्रकारे सरकारला खोड्यात पकडण्याची ती मागणी आहे. की तुम्ही पुनर्वसन करून

दाखवा, नंतर धरण बांधा. आम्ही नंतर पुनर्वसन करू, आम्ही यथावकाश पुनर्वसन करू. असं नाही चालायचं. समजा पुनर्वसन जर तुम्ही उद्या केलं नाही तर या विस्थापित आदिवासींनी काय करायचं? असा सवाल त्यांनी टाकला. तुमचं धरण बांधून होईल, तिथला सबंध प्रदेश, जंगल पाण्याखाली जाईल. ज्या जंगलावरती हे आदिवासी जगतात ते जंगल अस्तित्वात नसल्यासारखं होईल. तसं एकदा होऊन गेल्यानंतर यांचं पुनर्वसन जर तुम्ही केलं नाही तर मग काय करणार? घडून गेलेल्या घटनांचा क्रम उलटा करता येणार नाही. की आता पुनर्वसन झालं नाही ना, ठीक आहे, आम्ही धरण मोडून टाकतो आणि तुमचं जंगल तुम्हाला परत करतो. असं शक्य नाही. म्हणजे जे पाऊल आपण मागे घेऊ शकणार नाही ते पाऊल पुढे टाकण्यापूर्वीच तुम्ही यांचं पुनर्वसन करून दाखवा. आजच्या लोकसत्तेच्या उपाग्रलेखामध्ये त्यांच्यासंबंधीचा उल्लेख आहे की हे विस्थापित लोक न्यायालयात गेले. आम्हाला जी पुनर्वसनासाठी जागा दिली जाते ती सोयीची जागा नाही. तिथं आमची उपजीविका नाही चालू शकणार. आम्हाला ती सोयीची वाटत नाही. न्यायालयाने त्यांचं म्हणणं अमान्य केलं. आणि न्यायालयानं सांगितलं की सरकारनं तुम्हाला निवड करण्याचं स्वातंत्र्य दिलं होतं, तेव्हा तुम्हीच ती जागा निवडली होती. आता आम्ही काही करू शकत नाही. नर्मदा आंदोलनाच्या व्यासपीठावरून जे प्रश्न मांडले जातात ते प्रश्न न्यायाधीश समजून घेऊ शकत नाहीत. ते कायद्याचा कीस काढतील, कायद्याचे शब्द पाहतील, ते कायद्याच्या आधारे सांगतील की तुमच्या मागण्या आम्हाला काही रास्त वाटत नाहीत.

मेधा पाटकरांनी यावर अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की हे

अपेक्षितच होतं. न्यायालयाकडे आम्हाला न्याय मिळेल याच्यावरती आमचा विश्वास नाही. राज्यकर्ते आम्हाला न्याय देतील यावरही आमचा विश्वास नाही. आम्हाला लोकांची शक्ती उभी करून या आंदोलनाच्या निमित्ताने काही प्रश्नांकडे जगाचं लक्ष वेधायचं आहे. त्यामुळे विस्थापितांचा प्रश्न हा केवळ एका धरणाच्या विस्थापितांचा प्रश्न नाही. विस्थापित कोठे नाहीत ? औद्योगीकरणामुळे सुद्धा विस्थापित होतात. जंगल कटाईमुळे विस्थापित होतात. शहरीकरणामुळे विस्थापित होतात. खेडयामधून हुसकले गेलेले जे स्थानांतरित शहरांमध्ये येतात ते सगळे विस्थापितच असतात. तेव्हा विस्थापितांचा प्रश्न हा या विकास प्रतिमानाचा प्रश्न आहे. या विकासप्रतिमानातून ज्यांना आपल्या मुळांपासून उसकटलं जातं, दूर भिरकावलं जातं त्या सर्वांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे आणि एवढया सगळ्या मोठया संख्येत असलेल्या विस्थापितांचं पुनर्वसन करणं हे शासनाच्या ताकतीच्या पलीकडचं आहे. त्यामुळे हा प्रश्न पुनर्वसनाचा नाहीच तर एका पर्यायी विकासनीतीची मागणी करणारा लढा आहे. हा लढा प्रतिकात्मक आहे. सरदार सरोवराचा निकाल काय लागायचा तो लागू देत. परंतु कोणत्याही विकासप्रकल्पाला आम्ही लाभ आणि नुकसान यांचे निकष काय लावायचे ?

एखाद्या धरणापासून होणारे लाभ आणि एखाद्या धरणापासून होणारे तोटे याचे जे निकष आहेत, आतापर्यंत जे वापरले गेलेत तंत्रज्ञांनी जे वापरले, विश्व बँकेने जे वापरले, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जे वापरले, तेच निकष आम्ही प्रमाण मानायचे का? जंगल जेव्हा बुडतं तेव्हा होणारे नुकसान हे आम्ही कोणत्या मोजमापांनी मोजायचं ? तेव्हा आपले आजचे लाभाचे आणि

नुकसानीचे सगळे अंदाज हे आपमतलबी आहेत, चुकीचे आहेत. आम्ही लाभाची व नुकसानीची ती मोजमापंच आव्हानित करतो आहोत. की अमुक फायदा होणार आहे, इतकी हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे, इतकी वीज तयार होणार आहे याबद्दलचे सगळे आकडे ज्या कशाच्या आधारे सांगितले जातात त्याची दुसरीही बाजू असते आणि ती कधीच सांगितली जात नाही. लाभाची ही बाजू आकर्षकपणे मांडल्यानंतर, नुकसानीची बाजू कधी परिपूर्ण सांगितली जात नाही. तसाच ताळेबंद समोर ठेवतात आणि निर्णय घेतात. उदाहरणार्थ एका झाडाची किंमत लावताना ते झाड जन्मभर देणारा ऑक्सिजनसुद्धा धरायचा, माणसाला मिळणारे एकूण एक लाभ मोजायचे, त्या झाडातून मिळणारे सगळे उत्पादन धरायचे, त्याने केलेल्या मृद्संधारणाचे मूल्य लावायचे आणि अशा पद्धतीनें सगळ्या जंगलाचा हिशेब लावायचा असं केलं पाहिजे. पण हे केलं जात नाही. अशा प्रकारचे हिशेब प्रसिद्ध केले जात नाहीत. फक्त किती झाडे जाणार एवढेच सांगितले जाते. त्या बदल्यात तितकी झाडं लावू असं आश्वासन दिलं जातं. वर्षानुवर्षाच्या निसर्गक्रमात तयार झालेलं जंगल मानवी प्रयत्नांनी कृत्रिमरीत्या कधीच निर्माण केलं जाऊ शकत नाही हे सत्य सांगितलं जात नाही. राज्याला इतकी वीज मिळणार, इतकं पाणी मिळणार आहे, इतकी हेक्टर जमीन भिजणार आहे एवढंच सांगितलं जातं.

लाभ कोणाचा होणार आणि नुकसान कोणाचं होणार हे सहसा कधीच सांगितलं जात नाही. त्यागाची भाषा केली जाते की विकास करायचा म्हटल्यावर काही लोकांना त्याग हा करावाच लागेल. विकास करायचं म्हटल्यावर मोठं धरण बांधायचं म्हटल्या-

नंतर काही लोकांना तिथून बाहेर पडावंच लागेल, काही संसारांचे विस्थापन होते म्हणून काय आपण विकासाची प्रक्रिया अडवून ठेवायची काय ? असे भंपक प्रश्नही विचारले जातात. अगदी सुबुद्ध म्हणवणारे लोकही अशी तक्रार करताना दिसतात, की विकासाच्या प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळेस काही नतद्रष्ट लोक उगाच नाकं मुरडतात, गालबोट लावतात. प्रश्न नाकं मुरडण्याचा किंवा विकासाला अपशकून करण्याचा नाही. प्रश्न आहे तो असा की विकासाचा लाभ घेणारे कोण आहेत ? आणि विकासासाठी ज्यांना आयुष्याची, संसाराची होळी करून घ्यावी लागते ते कोण आहेत ? याची एकदा आपण ओळख करून घेऊ या. आदिवासींना जगण्याचा हक्क आहे की नाही ? खेडूतांना जगण्याचा हक्क आहे की नाही ? भूमिहीन मजुरांना जगण्याचा हक्क आहे की नाही ? त्यांच्या हिताला काही महत्व आहे की नाही ? मग, धरणाच्या पाण्याने ओलिताखाली ज्यांच्या जमिनी येणार आहेत किंवा जे अन्यप्रकारे लाभान्वित होणार आहेत त्यांच्या लाभांसाठी धरणाचा ज्यांना मुळीच लाभ होणार नाही उलट नुकसानच होणार आहे त्यांनी त्याग का करायचा ? दुसरी गोष्ट अशी की त्याग हा स्वेच्छेने करायचा असतो. त्यागाची व्याख्याच मुळी अशी आहे की जो स्वेच्छेने केला जातो. माझ्यावर तुम्ही त्याग करण्याची सक्ती नाही करू शकत. मला जर मनापासून त्याग करावासा वाटला तर त्यालाच त्याग म्हणता येईल. नाहीतर सक्तीने जे होते त्याला बलिदान म्हणतात. जो त्याग स्वेच्छेने केलेला नसतो त्याला बलिदान म्हणतात आणि आजपर्यंतच्या विकासक्रमामध्ये अशा प्रकारचं बलिदान दुर्बल माणसाचं दुर्बल घटकांचं, आदिवासींचं, गिरीजनांचं, देण्यात आलेलं आहे हे यापुढं

चालणार नाही. हा नर्मदा आंदोलनानें उभा केलेला दुसरा सवाल आहे.

न्याय अन्यायाची व्याख्या काय ? कोणाला न्याय द्यायचा ? कोणावरती अन्याय करायचा ? आणि कोणावर तरी अन्याय करून कोणालातरी न्याय द्यायचा याला काय म्हणायचं ? मूठभरांच्या हितसंबंधासाठी आणि श्रेष्ठींच्या स्वार्थासाठी, अभिजनांच्या हितासाठी जेव्हा जनसामान्यांचा बळी दिला जातो, याला आपण न्याय–अन्यायाच्या काय कसोटया लावणार आहोत ? तेव्हा विकासाच्या क्रमामध्ये आपल्याला न्याय–अन्यायाचीसुद्धा परिभाषा पुन्हा एकदा करून घ्यावी लागेल. विकासाचं असं प्रतिमान आम्हाला पाहिजें की ज्याच्यामध्ये सर्वांना न्याय मिळाला पाहिजे, ज्याच्यामुळे सर्वांना लाभ मिळाला पाहिजे. मूठभरांच्या लाभासाठी बहुसंख्यांचा बळी देणं आता बस झालं. योग्य जीवन-प्रणाली म्हणजे काय हे आपल्याला ठरवावं लागेल. त्यात कोणकोणत्या गोष्टी समाविष्ट होतात ? त्या कोणाकोणाला मिळणार आहेत ? म्हणजे आम्हाला जी विकासनीती पाहिजे ती अशी असावी की योग्य जीवनप्रणाली सगळयांना शक्य व्हावी, प्राप्त व्हावी.

त्यामुळे एकापरीने सरदार सरोवराचा लढा सत्तामत्ता-धारकांच्या विरोधात सामाजिक न्यायासाठी उठलेल्या लोक-शक्तीचा लढा आहे. या लढयाची मी जी आवर्जून भलावण करतोय ती केवळ आकडेवारीच्या हिशेबाने, त्यांनी सांगितलेले लाभांचे आणि नुकसानीचे आकडे आम्हाला पटले म्हणून नाहीं तर यासाठी की या लढयाने आमच्या सगळया विकासक्रमाला आव्हानित केलेलं आहे. तुम्ही ज्याला विकास, विकास किंवा

प्रगती म्हणता आहात ती खऱ्या अर्थाने प्रगती आहे काय ? विचार करा. १९७० नंतर या देशामध्ये फार मोठ्या प्रमाणावर आजच्या विकासप्रतिमानाला आव्हानित करणारे लढे ठिकठिकाणी सुरू झालेले आहेत. युवकांचे अनेक लढे आहेत. बेकारांचे अनेक लढे आहेत. भूमिहीन मजुरांचे अनेक लढे आहेत. आणि काल सांगितल्याप्रमाणे त्यांच्याशी वागताना एकच भाषा राज्यकर्त्यांना समजते ती म्हणजे दडपशाहीची ! हे लढे असे दडपशाहीनें दाबले जाणार नाहीत, कारण हे लढे लोकांचे लढें आहेत. लोकांच्या मागण्यांभोवती उभे राहिलेले लढे आहेत. आणि या लोकांच्या मागण्या म्हणजे अमुक आमच्या पदरात घाला असं दाता-याचक संबंधातून निर्माण होणाऱ्या मागण्या नाहीत, त्यात भिकारचोटपणा नाही. तर लोक असं म्हणतात की आमच्या हक्कांसाठी आम्ही उभे राहिलेले आहोत. आणि आमचे हक्क पूर्ण करण्याची ताकद तुमच्या या विकास प्रतिमानामध्ये नाही. ते बदला. आजपर्यंत तुम्ही जी स्वतःची आणि इतरांचीसुद्धा फसवणूक करून घेतली आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी आमची फसवणूक केलेली आहे, ती आम्ही यापुढे सहन करणार नाही.

अशा पद्धतीने पाश्चात्य विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारित असलेला विकासाचा नमुना, पाश्चिमात्य भांडवलशाही, भांडवलप्रधान विकास–प्रतिमानावर आधारित असलेला विकास हा लोकांनी आज नाकारलेला आहे किंवा आव्हानित केलेला आहे. या विज्ञान-तंत्रज्ञानावर अंधश्रद्धा नको. नेहरूंची ती होती. मी काल सांगितल्याप्रमाणे यशवंतरावांची होती, किंवा त्या संपूर्ण पिढीचीच होती. राजीव गांधींची तर भयानक अंधश्रद्धा होती. विज्ञान तंत्रज्ञानातून प्रश्न मिटतील, विज्ञान-तंत्रज्ञानातून समाजवाद येईल असं त्यांना

वाटत होतं. या सगळ्यांना हा लढा आव्हानित करतो आहे. विज्ञान-तंत्रज्ञानावरती अशी अंधश्रद्धा ठेवून चालणार नाही. नियोजन मंडळाला या देशाच्या साधनसामुग्रीचा वाटेल तसा उपयोग करण्याचा अधिकार कोणीही बहाल केलेला नाही. किंबहुना नियोजन मंडळाने दिल्लीत बसून संपूर्ण नियोजन करायचं ही जी केंद्रीभूत नियोजनाची पद्धत आहे. तीच मुळात आव्हानित केली गेलेली आहे. काय अधिकार आहे नियोजन मंडळाला एका चंद्रपूर जिल्ह्यातल्या आदिवासींच्यासंबंधीचे, त्यांच्या साधनसामग्रीच्या वापर करण्यासंबंधीचे निर्णय घेण्याचा ? तो तिथे बसून घेतला जाऊ शकत नाही. याच्यासाठी विकेंद्रितच नियोजन लागेल. तिथल्या माणसांना हे ठरवावं लागेल. केंद्रीय नियोजन मंडळाला नैसर्गिक साधनसंपत्ती ओरबडून घेण्याचा, ती हवी तशी वापरण्याचा, तिचा स्वार्थी विध्वंस करण्याचा कोणीही मक्ता दिलेला नाही आणि आम जनतेला या निसर्ग साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा. निसर्ग आणि मानव यांच्यामधलं संतुलन कायम टिकवून तो करता यावा. जी साधनसामग्री नूतनीकरण केली जाऊ शकत नाही तिचा वापर अत्यंत जपून केला जावा. पर्यायी अशा नवीन साधन सामुग्रीचा शोध घेतला जावा. या सगळ्या मागण्या या एका आंदोलनातून समोर आलेल्या आहेत. मी या लढ्याला या सर्व मागण्यांचं प्रतीक मानतो, प्रातिनिधिक मानतो. एका पर्यायी विकासनीतीची मागणी हा लढा करीत आहे. तसं ते केल्याशिवाय दुसरा उपायच नाही. सध्या आहे त्या व्यवस्थेमध्ये पुरेसा रोजगार मिळणार नाही, सन्माननीय रोजगार मिळणार नाही. सामान्य माणसाचा विकास होणार नाही. सामान्य माणसाच्या दृष्टीने अर्थव्यवस्था राबविली

जाणार नाही. हे सगळं व्हायचं असेल तर एका वेगळ्या दिशेनंच आपल्याला विकासाचा गाडा न्यावा लागेल.

काल मी असं सांगितलं की तंत्रज्ञान मूल्यमुक्त नसतं. तंत्रज्ञान तटस्थ नसतं. प्रत्येक तंत्रज्ञानाचे बरेवाईट परिणाम समाजावर होतच असतात. तंत्रज्ञानामधून समाजामध्ये काही सांस्कृतिक – सामाजिक–आर्थिक बदल सुरू होतच असतात. तंत्रज्ञानाचे वेग-वेगळ्या प्रकारचे परिणाम वेगवेगळ्या समाजघटकांवर होत असतात. पुरुषांवर वेगळे होतात – स्त्रियांवर वेगळे होतात, स्पृश्यांवर वेगळे होतात, अस्पृश्यांवर वेगळे होतात. कोणालातरी ते लाभदायक होतात तर कोणालातरी हानिकारक होतात. तेव्हा कुठल्याही तंत्रज्ञानाबद्दल बोलताना हे आपण लक्षात घेतलंच पाहिजे. मग पुढचा प्रश्न असा येतो की तंत्रज्ञानाची निवड आपण कशी करायची ? पर्यायी विकासनीती ठरवत असताना आपण कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर करायचा ? तंत्रज्ञानाची निवड ही अभियांत्रिकी कार्यक्षमतेच्या निकषावर केली जाऊ शकत नाही. अभि-यांत्रिकी कार्यक्षमता (मेकॅनिकल इफिशियन्सी) इंजिनिअरींग इफि-शियन्सी म्हणजे कोणतीही गोष्ट किती कार्यक्षम आहे एवढ्यावरच तिची ग्राह्याग्राह्यता ठरवायची. आताच्या आपल्या विकास प्रति-मानाची निवड बव्हंशी याच एका निकषावर झालेली आहे. यशस्वी होण्यासाठी कुठल्याही मार्गाचा वापर केला तरी आजच्या विकास प्रतिमानामध्ये तो क्षम्य ठरतो. सूक्तासूक्त कुठलाही मार्ग वापरा आणि यशस्वी व्हा. कारण यशासारखी यशस्वी होणारी दुसरी कुठलीही गोष्ट नाही हे आजच्या विकास प्रतिमानाचं गृहीत आहे. हे गृहीतच आपल्याला सर्वात पहिल्यांदा नाकारावं लागेल. एखादी

गोष्ट केवळ यशस्वी होते म्हणून चांगली आहे असं नाही तर नैतिक निकष लावावे लागतील.

तंत्रज्ञानाची निवड करणे हा अभियांत्रिकीच्या क्षेत्रातला विषय नसून हा मानवी क्षेत्रातला, सामाजिक क्षेत्रातला विषय आहे, मानवी संदर्भात घेतला जाणारा निर्णय. आहे कोणतं तंत्रज्ञान घ्यायचं ? याचं उत्तर मानवी जीवनाला पोषक होईल असं तंत्रज्ञान घ्यायचं असेच असू शकते. जे तिथल्या सांस्कृतिक चौकटीमध्ये हुबेहूब बसत असेल ते तंत्रज्ञान घ्यायचं. केवळ कार्यक्षमतेचा निकष लावून चालणार नाही. अमुक एक यंत्र दहा माणसांचं काम करतं, अमुक एक यंत्रणा काही मिनिटांमध्ये प्रश्न, गणित वगैरे सोडवतं ही कार्यक्षमता झाली, पण एवढ्या आधारावरती आपण ते तंत्रज्ञान घ्यायचं का ? ते जर १० माणसांना बेकार करीत असेल, ते जर १० माणसांना कुठल्यातरी धनिक माणसावर अवलंबून ठेवीत असेल तर, हे तंत्रज्ञान आपण घ्यायचं का ?

तंत्रज्ञानाची निवड ही मानवी निकषांवर करावी लागेल आणि सांस्कृतिक चौकटीच्या संदर्भात करावी लागेल. पश्चिमी देशांच्यामध्ये जिथे मनुष्यबळ कमी आहे अशा देशांच्यामध्ये उप-युक्त ठरलेलं तंत्रज्ञान मनुष्यबळ विपुल असलेल्या आपल्यासारख्या देशामध्ये कदाचित गैरलागू ठरु शकेल. आपल्याला हे ठरवावं लागेल. तंत्रज्ञानाची निवड कशाच्या आधाराने करायची ? गांधींनी हे सांगितलंय. तंत्रज्ञानाची निवड कशाच्या आधारे करायची ? कोणतं तंत्रज्ञान चांगलं ? जे तंत्रज्ञान मानवी अवयवांचा विस्तार असतं, पर्याय नव्हे, ते तंत्रज्ञान चांगलं. माणसाचा हात जिथपर्यंत पोचत नाही तिथं थोडं आणखीन पुढं जाण्याची मदत त्या तंत्रज्ञानानं

झाली पाहिजे. मानवी अवयवांचा ते पर्याय होता कामा नये, तर मानवी अवयवांचा विस्तार असं स्वरूप त्या तंत्रज्ञानाचं असलं पाहिजे. विनोबा भावे असे म्हणतात की, तंत्रज्ञान कोणतं चांगलं ? जे पाच बोटांनी वापरलं जातं ते तंत्रज्ञान चांगलं. तीन बोटांनी वापरलं जातं ते नव्हे. "पुश बटन टेक्नॉलॉजी" ही या देशाच्या कामाची नाही. पाच बोटांनी ज्याची पकड घेता येईल अशाप्रकारचं तंत्रज्ञान म्हणजे जे सर्वांसाठी, सर्वांचा सहभाग ज्याच्यामध्ये होऊ शकेल ते तंत्रज्ञान इष्ट, ही पहिली कसोटी.

दुसरी कसोटी अशी की तंत्रज्ञानाने मानवी जीवन समृद्ध झालं पाहिजे, तंत्रज्ञानाने मानवी जीवन कंगाल होता कामा नये. जे तंत्रज्ञान मानवी जीवनाच्या कंगालीकरणाला, मानवी जीवनाच्या दास्याला कारणीभूत असेल ते तंत्रज्ञान ग्राह्य नाही. स्टॅलिनने असं सांगितलं की आमचा देश गरीब आहे. आम्हाला एक बलाढच जागतिक सत्ता व्हायचं आहे. त्याच्यामुळे आमची वाटेल तितकी आयुष्यं बेचिराख झाली तरी चालतील, मातीत गेली तरी चालतील, शेकडो माणसे मेली तरी चालतील, आमचा देश मोठा झाला पाहिजे. आणि त्यानं हजारोंचा बळी घेतलाय. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला, यातून त्याचा देश अल्पावधीत मोठा झाला, एक जागतिक सत्ता म्हणून बरीच वर्षे मिरवला. पण या तंत्रज्ञानाचा अंतिम परिणाम काय झाला ? जे तंत्रज्ञान मानवी जीवनाला गौण लेखतं, जे तंत्रज्ञान मानवी जीवनाला कवडीमोल देतं ते तंत्रज्ञान अंतिमतः कधीही उपयुक्त ठरु शकत नाही. मानवी जीवन उन्नत करणारं तंत्रज्ञान, मानवी जीवन समृद्ध करणारं तंत्रज्ञान, मानवी जीवन परिपूर्ण करणारं तत्रज्ञान हेच सर्वतोपरी ग्राह्य ठरतं.

गांधीजींनी जेव्हा हिंदस्वराज्य नावाचं पुस्तक १९०४ साली लिहिलं तेव्हा गजहब झाला होता. लोक तुटून पडले होते की हा माणूस काय प्रतिगामी आहे ! या देशातल्या सगळ्या डाव्या विचारवंतांना गांधी हे प्रतिगामी वाटले होते. त्या काळात कारण त्यांनी असं सांगितलं होतं की, खऱ्या स्वराज्यातील समाजात वकील नकोत, डॉक्टर नकोत, रेल्वे नको. का सांगितलं होतं असं त्यांनी ? कारण त्यांच्या मते स्वराज्याचा काहीएक अर्थ होता. ते म्हणतात या देशातले गोरे लोक निघून गेले आणि त्यांची, त्यांनी येथे निर्माण केलेली सभ्यता जर जशीच्या तशी त्यांच्या पश्चात इथं कायम राहिली तर मिळणारं स्वातंत्र्य हे स्वराज्य असणार नाही, राज्यकर्ते फक्त बदलतील. त्यांची सभ्यता, त्यांचं तंत्रज्ञान, त्यांची राज्यपद्धती सारं काही तसंच राहील आणि असं जर असेल तर आताची ही गुलामीही कायम राहील. ही गुलामी जर खऱ्या अर्थाने नष्ट व्हायची असेल तर सर्वच बाबतीतील पर्यायांचा विचार केला पाहिजे. संसदीय लोकशाहीवर गांधीजींचा विश्वास तेव्हाही नव्हता, कधीच नव्हता. गांधींनी सांगितलं होतं, संसद ही काय आहे ? संसदेला त्यांनी वेश्येची उपमा दिली होती. अनेक लोक चिडले होते. त्यांच्या मते चवचाल असते संसद, विकली जाते संसद ! इकडचं बहुमत तिकडं व्हायला काय लागत नाही. आज आपण संसदेचं / विधिमंडळाचं प्रत्यक्ष कामकाज पाहिल्यानंतर गांधींचे ते शब्द आपल्याला कल्पनाशक्तीचे भीषण भयंकर प्रलाप तर वाटतच नाहीत, उलट अल्पोक्ती वाटते. कारण वेश्यांपेक्षाही वाईट अवस्था त्याची आहे. गुंडांचे ते अड्डे झालेले आहेत. मारामारी करतात तेथे लोकप्रतिनिधी ! खुल्या चर्चेतून निर्णय घेण्याचं व्यासपीठ असं गोंडस व सौजन्यशील शब्दांत

आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना संसदेची व्याख्या सांगतो आणि प्रत्यक्षात टी. व्ही. वर ते पाहतात तर संसदेत मासळी बाजारापेक्षा घाणेरडा झालेला प्रकार त्यांना दिसतो. तिथे कोणी मारामारी करतात, कोणी माईक उचलून घेतात, कोणीच कोणाला बोलू देत नाहीत. म्हणजे शक्ती प्रदर्शनाची जागा, कुस्तीचा अड्डा असं स्वरूप संसदेला आलेलं आहे. जिथं लोक लोकांच्या, मतदारांच्या-वतीनें बोलत नाहीत, मतदारांचा खरा आवाज बुलंद करीत नाहीत, जिथं लोक खोटं बोलतात अशी संसद कामाची नाही असं गांधींनी तेव्हा सांगितलं होतं. या सबंध व्यवस्थेलाच गांधीजींचा विरोध होता. त्यातल्या तंत्रज्ञानालासुद्धा विरोध होता. कारण त्यांच्या मते यंत्रांचा उपयोग करायला हरकत नाही, पण माणूस यंत्रांचा गुलाम होता कामा नये.

यंत्रांचं स्थान हे माणसाला दुय्यमच राहिलं पाहिजे, माणसाला पूरकच राहिलं पाहिजे. माणसाच्या सुखात यंत्राने भर घालायला काही हरकत नाही. पण माणसाचं माणूसपण हिरावून घेणारं यंत्र मात्र येता कामा नये. माणसाच्या डोक्याचा ताबा घेणारं यंत्र येता कामा नये. आज आपण जी यंत्रसामग्री इलेक्ट्रॉनिक्सच्या नावाने आणि तंत्रक्रांतीच्या नावाने आणलेली आहे ती माणसाच्या डोक्याचं खोकं करून टाकणारी आहे. हे आपल्याला नाकारता येणार नाही. काल मी सांगितल्याप्रमाणे जिथे विचारशक्ती संपते तिथे स्वार्थ येतो, मतलब येतो, निगरगट्टपणा येतो. अशाप्रकारची संस्कृती माणसाचं माणूसपण नष्ट करणारी संस्कृती आहे. तीच येथे या यंत्रसामग्रीने निर्माण केलेली आहे, नव्या तंत्रज्ञानाने निर्माण केलेली आहे.

तंत्रज्ञानाची निवड करताना आपल्याला हाही नैतिक निकष

लावावा लागेल की या तंत्रज्ञानातून मानवी जीवन समृद्ध होतं, उन्नत होतं, की अधोगतीला लागतं. माणसाचं माणूसपण टिकवणारं तंत्रज्ञान असावं असं म्हणत असताना माणूसपणा कशात आहे ? आहार–निद्रा–भय–मैथून यात माणूसपणा आहे का ? केवळ प्रजोत्पादनामध्ये माणूसपणा आहे का ? किडामुंगीसुद्धा प्रजोत्पादन करतात प्राणीसुद्धा कळपाने राहतात. माणसाचं माणूसपण कशात आहे ? जाणीवपूर्वक निर्मितीक्षमता अंगी बाळगणे यातच माणसाचं माणूसपण आहे. माणूस जाणीवपूर्वक निर्मिती करतो. आपणं ते सुगरणीचं घरटं पाहिलं असेल. तीसुद्धा निर्मिती असते. सुंदर असते, आकर्षक असते. परंतु जाणीवपूर्वक केलेली नसते, नैसर्गिकपणे केलेली असते. सुगरण हजारो वर्षे ती तशीच करीत आलेली आहे. जोतिराव फुल्यांनी शंभरदीडशे वर्षापूर्वी माणसाचं माणूसपण कशात आहे हे सांगताना माणसाची सुगरणीशी तुलना करून हे दाखवलं की माणसाच्या घरांची रचना पर्यावरणाप्रमाणे बदलते, वातावरणाप्रमाणे बदलते. काळाप्रमाणे बदलते आणि त्याच्यामुळे माणसाचं माणूसपण हे जाणीवपूर्वक निर्मिती करण्यामध्ये आहे. एखादा कलावंत कलाकृती निर्माण करतो. एखादा माणूस एखादी वस्तू निर्माण करतो. या वस्तू निर्माण करण्यामध्ये त्याची प्रतिभा, त्याची कल्पनाशक्ती, त्याचं वेगळंपण तो ओतत असतो. प्रत्येक माणसाच्या निर्मितीक्षमतेला वाव मिळणं हे आदर्श समाजाचं लक्षण आहे. तेव्हा तंत्रज्ञान असं असावं की जे माणसाच्या या माणूसपणाला बाधा आणीत नाही.

स्टॅलिनच्या काळातल्या एका कामगाराचे विडंबनपर वर्णन चार्ली चॅप्लिनने आपल्या एका सिनेमात फार चांगलं दाखवलं आहे. एका कामगाराला एका व्यक्तीने विचारलं, ' तू काय काम

करतोस?' तो म्हणाला, मी फक्त एक बोल्ट बसवतो.' 'मग तुझ्या कामाबद्दल तुला काय वाटतं ? तो ' म्हणाला, ' काही नाही, मला फक्त एक गोष्ट माहिती की मी जे बोल्ट बसवतो त्याला बरोबर नऊ आटे आहेत, ते आठही नाहीत आणि दहाही नाहीत.' यांत्रिक पद्धतीने एक गोष्ट जन्मभर करीत राहणे किती कंटाळवाणं असतं. ! त्याचं काम तेवढंच, पगार मिळतो त्याला पोट भरतं त्याचं. त्याच्या कुटुंबियांचं सुद्धा. रोजगार मिळालाय त्याला. तक्रारीला जागा नाही. परंतु हा जो रोजगार त्याला• मिळालेला आहे तो माणसाला लायक असलेला रोजगार नाही. खड्डे खोदा, परत भरा. परत खोदा असासुद्धा रोजगार असू शकतो. तुम्हास रोजगारच पाहिजे ना ? मग रोजगार हमी योजनेवर जा, खड्डे खोदा परत बुजवा, कारण रोजगार मिळाला पाहिजे. परत खोदा परत बूजवा. रोजगार आहे पैसा मिळतो. संध्याकाळी पोट भरतं तुमचं, मग तुम्हाला काय हवय ? तुमची काय तक्रार आहे ? तक्रार ही आहे की हा रोजगार माणसाला साजेसा रोजगार नाही. कारण माणसाच्या प्रतिभेला त्यात वाव नाही. कल्पनाशक्तीला त्यात वाव नाही. काय मानतो आपण की माझ्या ठिकाणी बुद्धिमत्ता आहे. मी घराचा नकाशा काढणार आणि बांधकामासाठी लेबर लावणार त्यांना मात्र बुद्धीचा काही संबंधच नाही ती जणू माणसं नव्हेत. ती जनावरं आहेत ती विचार करू शकत नाहीत. त्यामुळे विचार करण्याचा मक्ता माझ्याकडे आणि राबण्याचं काम मात्र शेकडो मजुरांचं, त्यांनी डोक्याचा वापर करायचा नाही. अशी वाटणी एखादं तंत्रज्ञान करतं तेव्हा हे तंत्रज्ञान माणसासाठी अनुरूप तंत्रज्ञान असत नाही.

तंत्रज्ञानाची निवड करताना माणसाला निर्मितीचा आनंद

होईल असेच तंत्रज्ञान निवडले पाहिजे. आपण काहीतरी वेगळं नवीन करतोय. मडकं घडवणाऱ्या कुंभारालासुद्धा प्रत्येक मडकं वेगळ्या आकाराचं करायचा आनंद मिळाला पाहिजे. त्याच्यावर डिझाईन करण्याचा आनंद मिळाला पाहिजे. ठोकळेबाजपणा जेव्हा निर्मितीमध्ये येतो तेव्हा ही सर्जनशीलता संपते, एकाच छापाचे गणपती जेव्हा एखादा कुंभार तयार करतो तेव्हा त्याची कला संपते, आणि व्यवसाय सुरू होतो तेव्हा त्याला कलेचा आनंद मिळू शकत नाही. निर्मितीचा आनंद मिळू शकत नाही. कारण छापाचे गणपती फक्त यांत्रिक पद्धतीनं तयार करायचे असतात. वेगाने तयार करायचे असतात. आयुष्याचं यांत्रिकीकरण करणारं तंत्रज्ञान हे माणसाला शोभेसं तंत्रज्ञान नाही असं थोडक्यात सांगता येईल. कुठलंही आणि ते जर जबरदस्तीने लादलं जात असेल तर ते अधिकच त्याज्य ठरतं.

माणसाचं माणूसपण अशाप्रकारे त्याला जाणीवपूर्वक निर्मिती करता येण्यात आहे. दुसरं असं आहे की ते त्याला इतर माणसांच्याबद्दल वाटणाऱ्या सौहार्दामध्ये आहे. माणसाला माणसा-विषयी सौहार्द वाटणं, माणसाला माणसाविषयी ज्याला इंग्रजीमध्ये 'एम्पथी' असे म्हणतात ती वाटणं, जवळीक वाटणं, जिव्हाळा वाटणं, एक नातेसंबंध वाटणं ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. जे तंत्रज्ञान माणसा माणसातील या जिव्हाळ्याचा ओलावा नष्ट करतं, ज्या तंत्रज्ञानामधून माणसा माणसांचे संबंध कोरडे होत जातात, ते मुळीच ग्राह्य म्हणता येणार नाही. आपल्या विका–सातून निष्पन्न झालेल्या संस्कृतीचे चित्र शहरीजीवनात स्पष्टपणे दिसू लागले आहे. तिला फ्लॅट संस्कृती असे आपण म्हणतो. शेजारी राहतोय कोण ? करतोय काय? मेला की जिवंत आहे

काही कोणाला माहीत नसतं. माणूस माणसाला ओळखत नाही, माणसं बिनचेहऱ्याची होतात, माणसं बिनचेहऱ्याची जिथं होतात तिथे ते तंत्रज्ञान आणि तो विकास हा खऱ्या अर्थाने मानवी चेहऱ्याचा विकास राहात नाही, तर तो यंत्रमानव निर्माण करण्याचा कारखाना होऊन बसतो. आपण आपल्या आजच्या विकासाच्या क्रमात यंत्रमानव निर्माण करतो. समाजातल्या काही लोकांना असं वाटतं की आपल्या ठिकाणी प्रतिभा आहे, कारण आपल्या हाती पैसा आहे. पैसेवाले स्वतःला प्रतिभावंत समजतात आणि ज्यांच्याजवळ पैसे नाहीत, ज्यांना त्यांच्यावरती अवलंबून रहावं लागतं त्यांना मात्र ते फक्त जेवणारे - खाणारे आणि पोरावळा निर्माण करणारे यंत्रमानव एवढाच फक्त दर्जा देतात. अशा पद्धतीने माणसा-माणसातला जिव्हाळा नष्ट करणारे तंत्रज्ञान त्याज्य ठरतें.

तंत्रज्ञानाची निवड करताना हाही निकष आपल्याला लावला पाहिजे की ज्या तंत्रज्ञानामधून आणि विज्ञानामधून माणूस माणसाला दुरावणार नाही, माणसातला जिव्हाळा करपणार नाही अशाप्रकारचं तंत्रज्ञान घेणं आवश्यक आहे. कोणी असं म्हणेल की या सगळ्या गप्पा आहेत, आधी जोपर्यंत वैपुल्य येत नाही तोपर्यंत हे काहीच शक्य नाही. कुठलीही गोष्ट भरपूर पाहिजे. भरपूर अन्नधान्य पाहिजे, भरपूर वस्त्र निर्माण झाली पाहिजेत, आणि मग आपोआप या सगळ्या गोष्टी साध्य होतील. तोपर्यंत याची काळजी करण्याची काही गरज नाही. उच्च तंत्रज्ञान वापरायचं आणि उच्च तंत्रज्ञान वापरल्यानंतर जेव्हा वैपुल्य निर्माण होईल, जेव्हा भरपूर साठा होईल, प्रत्येक गोष्टींचा तेव्हा आपण रोजगाराचं बघू, तेव्हा आपण ह्या निर्मितीक्षमतेचं

बघू, तेव्हा आपण ह्या मानवी संबंधांचं बघू. नाही. असं करताच येत नाही. गांधीजींनी सांगितलं होतं स्वराज्य मिळण्याची प्रक्रिया हेच स्वराज्य असायला पाहिजे. त्यातूनच माणूस स्वतंत्र झाला पाहिजे, मुक्त झाला पाहिजे. माणसाच्या मुक्तीची प्रक्रिया हे त्याच्या मुक्तीचं साध्य असतं. म्हणूनच साधने आणि साध्ये अविभाज्य असतात हा जो गांधींचा सिद्धांत होता तो इथे लागू पडतो. तंत्रज्ञानाची निवड करताना हे आपल्याला लक्षात घेतलं पाहिजे की साध्ये आणि साधने वेगळाली असू शकत नाहीत. आम्हाला भरपूर विकास करावयाचा आहे. आम्हाला भरपूर अन्नधान्य पिकवायचं आहे. म्हणून हायब्रीड वापरू. हायब्रीड वापरून एकदा भरपूर अन्नधान्य झालं की मग उपासमारीचे व दारिद्रयाचे सगळयांचे प्रश्न मिटतील. असं होत नाही. सहकारामधून आम्ही आधी साखर निर्माण करू. नंतर ती निर्यात करू. त्यातून जे पैसे येतील त्यातून अन्नधान्य विकत घेऊ आणि लोकांना ते देऊ. असं होत नसतं. विकासाची प्रक्रिया हाच विकास असला पाहिजें. आधी विकासाची प्रक्रिया पूर्ण करू, नंतर मग रोजगाराचं बघू. असं होत नसतं. असं होऊ शकत नाही. स्वराज्य मिळण्याची प्रक्रिया हेच स्वराज्य असलं पाहिजे. आपण शस्त्राच्या बळावर स्वराज्य मिळवू आणि नंतर लोकशाही आणू हे शक्य नाही. त्यातून हुकूमशाही, लष्करशाहीच येणार ! कामाची सक्ती करू माणसांचे हक्क सगळे तुडवून टाकू आणि काही काळ माणसांचे स्वातंत्र्य तुडवल्यानंतर पुढे कधीतरी आपलं राष्ट्र मोठं होईल तेव्हा परत मग त्यांना त्यांचे हक्क देऊ असं स्टॅलिनचं म्हणणं होतं. पण काय झालं ते जगानं पाहिलेच आहे. त्याशिवाय वेगळं काहीही होणं शक्यच नव्हतं. कारण

गुलामी ही अशी नंतर कधीही नष्ट होत नसते. ती त्या क्रमातच नष्ट करायला पाहिजे. स्वराज्य मिळण्याची जी प्रक्रिया आहे तीच मुळात स्वराज्याचे साधन असली पाहिजे. स्वराज्य मिळाल्या-नंतर आपण सदाचारी होऊ, तोपर्यंत कुठल्याही सूक्तासूक्त मार्गाचा वापर केला तरी चालेल असा एकदा जर आपण निर्णय घेतला तर मग सन्मार्गावर येण्याची कुठलीही शक्यता शिल्लक रहात नाही. तंत्रज्ञानाची निवड करतानासुद्धा आधी आपण वाटेल ते तंत्रज्ञान वापरू, हायब्रीड वापरू, खूप उत्पादन करू. नंतर मग शेतीची व्यवस्था पुन्हा आपण नीट करू असं आपण मानत असू तर हे स्पष्ट सांगायलाच हवं की तसं ते होऊ शकत नाही.

शेतीचा प्रश्न हा केवळ आर्थिक प्रश्न नसतो हेही इथं आपल्याला जाता जाता सांगितलं पाहिजे. शेतीचे प्रश्न आपण केवळ आर्थिक जे मानतो त्यामुळे शेतकऱ्यांना सबसिडी देणं, कर्जमाफी देणं, हा केवळ आर्थिक प्रश्न नाही तर या सर्व तंत्र-ज्ञानाचा शेतीवर होणारा बहुपदरी व दूरगामी परिणाम आहे, ते देखील लक्षात घेतलं पाहिजे. काल मी हरित क्रांतीबद्दल बोललो. हरित क्रांतीमध्ये वापरली गेलेली हायब्रीड बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, कीटकनाशके या सर्वांचा जो काही बरावाईट परिणाम पिकांवर, शेतीजमिनीवर, गुराढोरांवर होतो तो लक्षात घेण्याची फार आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींमुळे माणसांना निःसत्व अन्न मिळते. गुरांना चारा मिळत नाही. विषबाधा होऊन गुरंढोरं मरतात. जमीन निकस, नापीक होते. कालांतरानं जमिनीचं वाळवंटीकरण होतं. आपण सारे शेतीजीवनाशी संबधित असल्यामुळे हे सर्व प्रश्न फार तपशीलात सांगावेत असं काही मला वाटत नाही. मुद्दा असा की शेतीचा विकास करीत असताना

संपूर्ण समाजव्यवस्थेच्या अंगाने, परंपरेच्या अंगाने विचार करावा. मघाशी मी असं म्हणालो होतो की कुठल्याही तंत्रज्ञानाची निवड ही एका सांस्कृतिक चौकटीत करायची असते. तेव्हा इतर शेती-प्रधान देशांच्यामध्ये यशस्वी झालेलं तंत्रज्ञान आपल्या येथे सुद्धा यशस्वी होईलच असे नाही. पर्यायाची निवड आपल्याला इथली विशिष्ट सामाजिक – सांस्कृतिक – आर्थिक संदर्भ लक्षात घेऊन करावी लागेल. या देशाचे जे सामाजिक – सांस्कृतिक संदर्भ आहेत, जी परंपरा आहे तिचाही विचार आपल्याला करावा लागेल. जुनं जे सगळं काही आहे ते गाडून टाकावं आणि सगळं काही नव्याने सुरू करावं असं ठरवून होणार नाही. नवीन गोष्टींचा आंधळेपणाने स्वीकार करणं, विश्वास ठेवणे, नवीन तंत्रज्ञानावर आंधळेपणाने विश्वास ठेवणे आपल्याला आत्मघातक ठरलेलं आहे हे आतापर्यंतच्या विकासाच्या क्रमात आपल्या लक्षात यायला हरकत नाही. तंत्रज्ञानाची निवड ही नैतिक निवड आहे. उपलब्ध पर्यायांपैकी कोणत्याची निवड करायची आहे हे आपल्याला नैतिक निकषांवर ठरवावे लागेल. नवीन तंत्रज्ञान जे निवडायचं ते नैतिकदृष्टया चांगलं असलं पाहिजे.

आता नैतिकदृष्टया चांगलं पाहिजे म्हणजे काय ? मी म्हटल्याप्रमाणे एकतर ते सर्वांच्या लाभाचं असलं पाहिजे. सर्वांच्या लाभाचं जे तंत्रज्ञान नसेल ते कितीही कार्यक्षम असलं तरी आपल्याला ते सोडावं लागेल. नैतिक निकषांवर निवड करायची म्हणजे माणूस हाच फक्त या सबंध सृष्टीचा नायक आहे हे गृहीत आपल्याला सोडून द्यावे लागेल. आजपर्यंत विकासाचं जे चिंतन पश्चिमी देशांच्यामध्ये – विशेषतः या उदारमतवादी लोकशाही भांडवलशाही देशांमध्ये झालेलं आहे ते माणूसकेंद्री

दृष्टीनं झालेलं आहे. माणसाचा विकास होतोय ना ? मग प्राणीसृष्टी नष्ट झाली तरी चालेल, जंगलं नष्ट झाली तरी चालतील. माणूस हा मध्यबिंदू आहे असं मानून आजच्या सबंध विकास प्रतिमानाची उभारणी करण्यात आलेली आहे. माणूस हा मध्यवर्ती आहे म्हटल्यानंतर त्यातही मग जो माणूस धनवान असेल, बलवान असेल तो माणूस अधिकच मध्यवर्ती ठरतो. म्हणजे माणसासाठी सृष्टीतल्या कशाचाही बळी द्यायचं एकदा पत्करलं की मग बलवंत माणसांसाठी कमकुवत माणसांचा बळी देणंसुद्धा क्षम्य ठरतं, तर्कसंगतच ठरतं. नैतिकतेची निवड करायची ती इथे. नैतिकतेनें निवड करायची असेल तर मग माणूस हाच केवळ विकासाचं लक्ष्य असू शकत नाही. विकास हा समग्र सृष्टीचा एकत्रितपणे, समन्वितपणे करावा लागेल. हा विकास समन्वित व्हावा लागेल ही गोष्ट महत्वाची आहे. जमीन, पाणी, जंगलं यावर केवळ पिढीची मालकी नाही. कायमस्वरूपी अर्थ-सिस्टिमची ती अंगं आहेत आणि त्यामुळे त्यांच्यावर जेवढा माणसाचा हक्क आहे तेवढाच इतरही जीवांचा हक्क आहे. इतरही जीवांना या पृथ्वीवर जगण्याचा हक्क आहे. आणि तो जेवढा आजच्या माणसाला आहे तेवढा उद्याच्याही माणसाला आहे. येणाऱ्या सर्व पिढ्यांचा तो हक्क आहे. आपण जर या संसाधनांचा उपयोग निष्काळजी-पणे केला, स्वार्थीपणे केला, ओरबाडून घेतल्यासारखा केला तर मग नंतरच्या पिढ्यांना संसाधनसंपत्तीपैकी कुठल्याच गोष्टी शिल्लक राहणार नाहीत. अशा परिस्थितीत हा विकास चिरंतन विकास होऊ शकणार नाही. मग तंत्रज्ञानाची निवड करताना विकास चिरंतन व्हावा, कायम स्वरुपाचा विकास व्हावा आणि त्यातून स्थिर समाजाची उभारणी व्हावी हे आपल्याला

करावं लागेल. तेव्हा तंत्रज्ञान असं असावं की जे स्वामित्वावर आधारित नसेल. सृष्टीच्या कायम अस्तित्वाचा विचार करणारं असावं, आज चराचरसृष्टीसह माणसाचं अस्तित्व धोक्यात आलेलं आहे. विषारी वायू सगळीकडे पसरताहेत, अॅसिडचा पाऊस पडतोय आणि ओझोनचा थर फाटतोय या सगळ्यांच्यामागे आम्ही स्वीकारलेली विनाशकारी विकासाची वाट आहे. आपण वेळीच सावरलो नाही तर सृष्टीचा अंत अपरिहार्य ठरणार आहे.

आज माणसाचं अस्तित्व त्याच्या विकासक्रमामुळे धोक्यात आलेलं आहे ही वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही. आपण कितीही तिच्याकडे दुर्लक्ष करायचं म्हटलं तरी करू शकणार नाही अशी आजची परिस्थिती आहे. तेव्हा विकासाचा पर्यायी नमुना निवडत असताना याची आपल्याला काळजी घ्यावी लागेल. स्वामित्वाच्या आधारे निसर्गाकडे पाहणं माणसाला सोडून द्यावं लागेल. काल मीं असं म्हणालो की नारी आणि निसर्ग यांच्याकडे स्वामित्वाच्या भावनेतून पाहिल्यामुळे ही अराजकी संस्कृती इथे निर्माण झालेली आहे. उन्मत्त माणसाला वाटतं दूरचा विचार आपण कशाला करायचा ? काय करायचं आपल्या पुढच्या पिढ्यांचं काय होतय आणि काय नाही या गोष्टीशी ? आज आपण खावं प्यावं मजा करावी. ही जी चंगळवादी व आप्पलपोटी संस्कृती आहे ही आपल्याला पहिल्यांदा सोडून द्यावी लागेल. समग्र सृष्टीच्या अस्तित्वाच्या संदर्भात या सगळ्या गोष्टींचा विचार करावा लागेल. मग आपल्याला असं दिसेल की ज्याला आपण अनुरूप तंत्रज्ञान म्हणतो ते त्या अनुरूप तंत्रज्ञानाचा अंगीकार आपल्याला करावाच लागेल. अनुरूप तंत्रज्ञान हा शब्द आज मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. अनुरूप तंत्रज्ञान या

शब्दाचं साहचर्य हे गांधींच्या विचारांशी आहे. या देशामध्येच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये महात्मा गांधी या व्यक्तीनें जेवढा विकासाचा समग्रपणे विचार केलेला आहे. तेवढा दुसऱ्या कोणीही केलेला नाही. आणि अनुरूप तंत्रज्ञानाबद्दल त्यांच्या एका शिष्याने जे. सी. कुमारप्पा यांनी – जशी स्पष्ट मांडणी केली आहे तशीही अन्यत्र कुठे आढळत नाही. जे. सी. कुमारप्पा या माणसाची या वर्षी जन्मशताब्दी आहे हेसुद्धा आपल्यापैकी काही जणांना कदाचित माहीत नसेल. जे. सी. कुमारप्पा हे गांधीवादी अर्थशास्त्रज्ञ होते. या माणसाने अर्थशास्त्रावर २५ पुस्तकं लिहिली आहेत आणि ती आजच्या काळात अत्यंत प्रस्तुत आहेत, अभ्यसनीय आहेत. पण दुर्दैवाने ती सगळी आज उपलब्ध नाहीत, जी उपलब्ध आहेत. तीही वाचली जात नाहीत. जी वाचली जातात त्यांची कोणी दखल घेत नाहीत. खरं तर गांधीवादालाच मुळात आपण आश्रमवासी करून टाकलं असल्यामुळे जे. सी. कुमारप्पा सुद्धा आश्रमवासी झालेले आहेत. आश्रमवासी असलेले गांधीवादी काही कामाचे नसतात हे उघडच आहे.

तेव्हा जे. सी. कुमारप्पा यांचं 'व्हाय व्हिलेज मुव्हमेंट' नांवाचं एक पुस्तक आहे. ज्यांनी ते वाचलं नसेल त्यांना ते वाचायची मी खरोखरच विनंती करेन. व्हाय व्हिलेज मुव्हमेंट या पुस्तकाला गांधीजींनी प्रस्तावना लिहिली आहे. आणि गांधीजींनी प्रस्तावना लिहीत असताना असं लिहीलय की हे पुस्तक अत्यंत महत्वाचं आहे. त्यानी जे. सी. कुमारप्पा यांना डॉक्टर ऑफ व्हिलेजेस् अशी पदवी दिलेली आहे. खेड्यात जायची गरज काय आहे, यांची मांडणी करताना जे सी. कुमारप्पा यांनी अत्यंत सविस्तर, प्रयोगांवर आधारित उपाय सांगितले. केवळ काल्पनिक

कथा किंवा केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर प्रत्यक्ष प्रयोग केले आणि प्रयोगांतून काही निष्कर्ष काढले, त्या निष्कर्षांच्या आधाराने त्यांनी अनुरूप तंत्रज्ञानाची मांडणी केलेली आहे. ती अत्यंत महत्वाची आहे.. हे अनुरूप तंत्रज्ञान काय आहे ? काहींना असं वाटतं की अनुरूप तंत्रज्ञान म्हणजे साधं सोपं परंपरेनं चालत आलेलं कालबाह्य तंत्रज्ञान. टवाळीसाठी म्हणून काही लोक चरख्याचा उल्लेख करतात, की गांधी आम्हाला पुन्हा मध्ययुगात न्यायला पाहताहेत. ते मध्ययुगीन तंत्रज्ञानाचा पुरस्कार करताहेत. नाही. अनुरूप तंत्रज्ञानाचा तो अर्थ नाही. अनुरूप तंत्रज्ञान म्हणजे आधुनिकता व पारंपरिकता यांचा योग्य समन्वय घालणारं तंत्रज्ञान ते इथल्या पर्यावरणाशी जुळणारं असलं पाहिजे ते स्वस्त असलं पाहिजे, ते सुलभ असलं पाहिजे ते शिकणं प्रत्येकाला सहजशक्य असलं पाहिजे. काल मी आपल्याला असं म्हणालो, जे तंत्रज्ञान सर्वांना सहज अवगत होऊ शकतं ते तंत्रज्ञान समताकारी असतं, जे तंत्रज्ञान विशेषतज्ञाना फक्त उपलब्ध होत असतं किंवा धनिकांनाच फक्त उपलब्ध असतं ते विषमताकारी असतं. कॉम्प्यूटर खरेदी करणं किंवा वापरणं ही फक्त या समाजातल्या जेमतेम १०टक्के लोकांची मिरासदारी असू शकते. असं तंत्रज्ञान सामान्यांसाठी काही कामाचं नसतं. सामान्य माणसांना निरक्षर करणारं ते तंत्रज्ञान आहे माझ्यासारखा दोन पदव्या धारण करणारा माणूससुद्धा कॉम्प्यूटरपुढे निरक्षर असतो, म्हणजे आधीच या देशातली निरक्षरता ७० टक्के आहे. त्यामध्ये ही नवीन निरक्षरता जर मोजली तर किती प्रमाण होईल ? तुमच्यापैकी अनेकजण कॉम्प्यूटरसमोर निरक्षर असतील. तंत्रज्ञानामुळे अशी नवी निरक्षरता निर्माण होता कामा नये. तंत्रज्ञान असं असलं

पाहिजे की ज्याचं प्रशिक्षण, ज्याच्यामधला सहभाग आणि ज्याचा वापर हा समाजातल्या जास्तीत जास्त माणसांना सहज करता आला पाहिजे. अनुरूप तंत्रज्ञान म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान नको असा अर्थ नाही. अनुरूप तंत्रज्ञान हे अत्यंत आधुनिक असू शकतं.

आधुनिकतेचा अर्थ काय ? आधुनिकतेचा अर्थ कॉम्प्यूटर नव्हे. आधुनिकतेचा अर्थ म्हणजे असंच कुणीतरी आपल्याला मस्तकी मारलेलं तंत्रज्ञान नव्हे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अर्थ असा की ज्याचा वापर करताना आजच्या काळाच्या संदर्भात परिष्कृत करून घेतलेलं पारंपारिक तंत्रज्ञान. समजा चरख्याला वीज वापरून त्याची गती वाढवली, तर गांधींचा त्याला काही विरोध असण्याचं कारण नाही. मानवी हाताची ताकद वाढवण्याचं ते तंत्रज्ञान ठरेल. त्यामुळे ते तंत्रज्ञान आधुनिकच आहे. समुचित तंत्रज्ञान हे आधुनिक तंत्रज्ञान असतं. ते मागासलेलं, जुनाट किंवा कालबाह्य झालेलं तंत्रज्ञान नसतं हे आपण लक्षात ठेवा. त्या तंत्रज्ञानाचा आजच्या सामाजिक जीवनामध्ये व आजच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी वापर केला जाऊ शकतो आणि त्यादृष्टीने ते योग्य आहे की नाही हा निकष महत्वाचा आहे. त्याची ती योग्यता कशाच्या आधाराने ठरवावयाची ? एकतर ते स्थानिक असावं. स्थानिक असणारं तंत्रज्ञान सगळ्यांना सहज उपलब्ध असतं, स्थानिक गरजांची परिपूर्ती करू शकतं, स्थानिक साधन–सामग्रीवरती अवलंबून असतं. त्यामुळे ते अनुरूप असं ठरतं. आयात केलेलं नव्हे. जपानच्या व इस्राइलच्या मोठेपणाबद्दल बोलणारे हे लक्षात घेत नाहीत की त्यांचं तंत्रज्ञान हे समुचित तंत्रज्ञानाच्या व्याख्येत बसत नाही. ते लोक मोठे झाले असतील, तात्पुरतं मोठं होणं किंवा तात्कालिक लाभ मिळवणं हे विकासाचं

गमक नाही हे लक्षात ठेवा. म्हणजे एखादा देश आपलं सत्वं गहाण टाकून काहीकाळ मोठा होऊ शकतो आणि आकारानं जर लहान असेल तर भरभराटीलासुद्धा येऊ शकतो. जपानचा गुराखी घड्याळे तयार करतो असं आपल्याला सांगितलं जातं. फार कौतुकानं लोक सांगतात की जपानचा गुराखी हा तिथं घड्याळं तयार करतो. पण घड्याळ तयार करणारा गुराखी हा अनुरूप तंत्रज्ञानाचा नमुना ठरू शकणार नाही. आपण वर केलेल्या त्याच्या तंत्रज्ञानाला अनुरूप तंत्रज्ञान म्हणता येणार नाही. आर्यविन टॉफ्लर नावाच्या माणसानं एक पुस्तक लिहिलंय " थर्ड वेव्ह " नावाचं आणि त्यात स्वतंत्र प्रकरण आहे, त्याचं शीर्षक आहे " गांधी वुइथ सॅटेलाईट " ! गांधी वुइथ सॅटेलाईट हे समुचित तंत्रज्ञानाचं उदाहरण असू शकत नाही. लेखकाला असं म्हणायचं की आपण विकेंद्रीकरण घ्यावं, कुटीर उद्योग घ्यावेत, प्रत्येक झोपडीत उद्योग सुरू करावेत, खेड्यापाड्यामध्ये औद्योगीकरण करावं. इथं आम्ही गांधी विचार अंशतः घेतो. पण उद्योग कोणते सुरू करतो ? कॉम्प्युटर जुळवण्याचे, इलेक्ट्रॉनिक यंत्रे तयार करण्याचे, तिकडून परदेशातून किटस् आणायच्या आणि त्यावरून असेंब्लिग करायचं. वस्तू तयार करायच्या. गांधींच्या भाषेत याला कुटिरोद्योग म्हणता येणार नाही. " गांधी वुइथ सॅटेलाईट "चा हा जो अर्थ की आम्ही इलेक्ट्रॉनिक्सही आणायचं आणि कुटिरोद्योग म्हणून स्थानिक पातळीवर उत्पादनही करायचं. अमूक एक उद्योग केवळ तो खेड्यात सुरू होतो म्हणून त्याला कुटिरोद्योग म्हणायचं. गांधी वुइथ सॅटेलाईट हे काही अनुरूप तंत्रज्ञानाचं उदाहरण होऊ शकत नाही. स्थानिक साधनसामग्रीचा वापर करून स्थानिक माणसाच्या गरजांची परिपूर्ती ज्यात होते

आणि ज्या उत्पादन प्रक्रियेमध्ये प्रत्येकजण सहभागी होऊ शकतो, ज्याचं प्रशिक्षण प्रत्येक घेऊ शकतो, हे निकष आहेत समुचित तंत्रज्ञानाचे.

समुचित तंत्रज्ञान हे उत्क्रांत करण्यासाठी सर्वात पहिली आवश्यक जर कुठली गोष्ट असेल तर ती ही आहे की "आर अ‍ॅण्ड डी" रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट नावाचा जो विभाग असतो प्रत्येक कारखान्यामध्ये, त्याला पहिल्यांदा आपण अभिजनांच्या स्वार्थापासून सोडवला पाहिजे. आज आर. अ‍ॅण्ड डी. मध्ये काय चालतं ? मल्टिनॅशनल्सचा जास्तीत जास्त फायदा कसा होईल ? नफा जास्तीत जास्त कसा वाढविता येईल ? जास्तीत जास्त श्रमिकांना कसं काढून टाकता येईल ? अल्पावधीमध्ये व कमी कष्टानं आणि माणसांऐवजी यंत्रांच्या द्वारे जास्तीत जास्त माल कसा उत्पन्न केला जाईल ? कार्यक्षमता कशी वाढविली जाईल ? आर. अ‍ॅण्ड डी. चे जे प्रयोजन आहे, संशोधन आणि विकास ह्या नावानं केलं जाणारं हे जे सबंध संशोधन आहे ते आपल्याला अभिजन स्वार्थापासून सोडवलं पाहिजे. विपुल लोकसंख्येच्या देशातील समुचित तंत्रज्ञान मजुरांची बचत करीत नसतं ही पहिली गोष्ट या देशाच्या संदर्भात महत्वाची आहे. इथे जर समुचित तंत्रज्ञानाचा विचार करायचा असेल तर मनुष्यबळ हे इथलं महत्वाचं संसाधन आहे. तेव्हा माणसांची बचत करणारे तंत्रज्ञान हे इथलं समुचित तंत्रज्ञान असू शकणार नाही, हे लक्षात घ्यावं लागेल. जास्तीत जास्त माणसांना रोजगार देणारं तंत्रज्ञान हेच इथलं समुचित तंत्रज्ञान असू शकेल. आणि तोसुद्धा पूर्ण रोजगार, आनंददायी रोजगार. मघाशी सांगितल्याप्रमाणे त्या रोजगारापासून निर्मितीचा आनंद मिळाला पाहिजे.

काहीतरी करतोय याचा आनंद मिळाला पाहिजे, माणूस समाजाशी जोडला जायला पाहिजे. समुचित तंत्रज्ञानाची ही पूर्वअट आहे की ते तंत्रज्ञान प्रत्येकाला अवगत करता आलं पाहिजे. जास्तीत जास्त लोकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजें. यातून मागणी आणि पुरवठा यामध्ये एक संतुलन आपोआप निर्माण होईल. आज दुष्टचक्र असं झालंय की कारखान्यात जो माल होतो तो फक्त २० टक्के लोकांच्या गरजांच्या पूर्तीसाठी असतो. तो खपविण्यासाठी कृत्रिमरीत्या गरजा निर्माण कराव्या लागतात. त्यासाठी जाहिरातबाजी करावी लागते. मध्यस्थ, दलाल, एजंट नेमावे लागतात. त्यामुळे कितीतरी अनुत्पादक माणसं उत्पादक व उपभोक्ता यांच्यामध्ये येतात. अशा अनुत्पादक लोकांची फौजच्या फौज निर्माण होते. त्या सगळ्यांचा खर्च उपभोक्त्यांच्या डोक्यावर बसतो. मी जेव्हा एक 'सेव्हन ओ क्लॉक' ब्लेड विकत घेत असतो तेव्हा मी किती लोकांना पैसे देतो ? डॉक्टरीणबाई इथं बसल्यात, त्या सांगतील की औषधांच्या किंमती भडकतात त्या कशामुळे भडकतात ? आज उत्पादनमूल्याच्या दोनशे तीनशे पटींनी औषधांच्या किंमती वाढलेल्या आहेत. हे असं का होतं ? कारण तो एजंट आहे, त्या महागड्या जाहिराती आहेत, हें अनुचित तंत्रज्ञान आहे, तो पोषाखी मॅनेजरवर्ग आहे. या सगळ्या अनुत्पादक वर्गाच्या पांढऱ्या हत्तीला सध्याच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये आम्ही पोसतो आहोत. या सगळ्यांचा खर्च तुमच्या आमच्या सर्व ग्राहकांच्या बोकांडी बसतो. अनुरूप तंत्रज्ञान ते या मधल्या अनुत्पादक घटकांना फाटा देतं. त्यांची तिथे काही गरजच नसते. लोकांची ज्या गोष्टींची मागणी आहे त्याच गोष्टी तिथं तयार होतील. म्हणजे मागणी आधीच असल्यामुळे त्या मालासाठी

मागण्या निर्माण करीत फिरावं लागणार नाही. जाहिरातबाजीची गरज पडणारच नाही. मोठमोठाले होर्डर्स लावायची, मोठमोठ्या वर्तमानपत्रात पान-पानभर जाहिराती करायची गरज पडणारच नाही.

मागण्यांची आधीच तरतूद असलेलं हे तंत्रज्ञान असल्यामुळे वितरण हे तिथं अत्यंत सुलभ होऊ शकेल. फार लांबून गोष्टी आणायची गरज नाही. मग त्याबाबतींत जर्मनीमधून मागणी करा, विमानाने ते पाठवा, लाईफ-सेव्हींग ड्रग्ज आणण्यासाठी लाइटनिंग कॉल करा, विमानाने औषधं आणा अशा पद्धतीने वाहतूक दळणवळण याच्यावरती होणारा प्रचंड खर्च व मनुष्य-शक्तीचा अपव्यय हासुद्धा अनुरूप तंत्रज्ञानामध्ये वाचतो. अनुरूप तंत्रज्ञानाची भलावण मी करतो आहे ती या दृष्टींने की काम आणि श्रम या गोष्टी प्रत्येकाला करायला लावणारं हे तंत्रज्ञान राहील. त्या दृष्टीनं गांधी असं म्हणत होते की अनुरूप तंत्रज्ञान ही काय फक्त मागासलेल्या देशांची गरज आहे असं नाही. मागासलेल्या देशांना तथाकथित आधुनिक तंत्रज्ञान परवडत नाही म्हणून अनुरूप तंत्रज्ञान घ्यावे असेही नाही. इथं परवडण्याचा प्रश्नच येत नाही. आज जगातील प्रत्येक राष्ट्राला सर्वात प्रगत व सधन राष्ट्रांनासुद्धा अनुरूप तंत्रज्ञानाची गरज भासू लागली आहे. अमेरिकेसारख्या राष्ट्रात जिथे प्रत्येक गोष्टीचे वैपुल्य आहे पण हे सगळं असूनही समाजजीवनात एक पोकळी आहे. तिथेही आज हे जाणवू लागलंय की आपलं हे तंत्रज्ञान अनुरूप नाही. हे तंत्रज्ञान वैपुल्य निर्माण करतं, पण समाधान देऊ शकत नाही. हे तंत्रज्ञान नवीन नवीन गरजा निर्माण करायला भाग पाडतं पण वाढत्या गरजा कधीच पूर्ण होत नाहीत. ' इट क्रिएटस्

अनसॅटियेबल डिमांडस् !' तृप्त न होऊ शकणारी तृष्णा निर्माण करणं हे या उत्पादनतंत्राचं, या विकासतंत्राचं मुळात गृहीतच आहे. तेव्हा ते तसंच राहणं अटळ आहे. तेव्हा लोकांच्या सर्व किमान गरजा चांगल्यारीतीने पूर्ण होणं, सर्वांना पोटभर व सकस अन्न मिळणं, आरोग्याला हानिकारक ठरणार नाहीत अशी औषधं मिळणं ही या तंत्रज्ञानाची उद्दिष्टंच नव्हेत. साध्या डोकेदुखीवर आपण गोळी घेतो ती गरजेपेक्षा अकारणच शंभरपट अधिक स्ट्राँग असते. अंतिमत: ती शरीराला अपायकारक असली तरी त्वरित आराम देण्याच्या स्पर्धेपायी कंपन्या तसं करतात. आपल्याला पर्याय नसतो. या वस्तुस्थितीची जाणीवही नसते. अनेक अॅलोपॅथिक औषधांचे असे विलक्षण हानिकारक परिणाम आज पुढे आले आहेत. नैसर्गिक पद्धतीने संयत जिणं जगल्यास ते टाळता येतात असं गांधी म्हणाले होते. आरोग्याबद्दलचा त्यांचा दृष्टिकोनच असा होता की मोठमोठाली इस्पितळं काढणं ही काही आरोग्याची हमी असू शकत नाही. उलट इस्पितळं वाढणं हे वाढत्या अनारोग्याचं लक्षण आहे. समाजामध्ये जास्तीत जास्त दवाखान्यांची मागणी निर्माण होते याचा अर्थच तिथं आरोग्याची हेळसांड होते. तेव्हा शक्यतो अनारोग्य होऊ नये असं सकस अन्न प्रत्येकाला मिळालं पाहिजे. ते अनुरूप तंत्रज्ञानातून होऊ शकेल. अनुरूप तंत्रज्ञानामधून लोकांच्या गरजा भागतील. गरजा म्हणजे खऱ्या अर्थाने असलेल्या गरजा भागतील. प्रत्येकाला पूर्ण रोजगार मिळेल, प्रत्येकाला पुरेसा कपडा मिळेल, निवारा मिळेल, आणि माणसासारखं अर्थपूर्ण जीवन जगता येईल. आणखी काय पाहिजे ?

दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीने अनुरूप तंत्रज्ञानाशिवाय दुसरा

कुठलाही मार्ग अवलंबता येणार नाही. आणि हे जे अनुरूप तंत्रज्ञान आहे त्याच्यामधून तीन गोष्टी प्रामुख्याने साध्य होतील. जसं गरजांची उत्तमप्रकारे परिपूर्ती होणं, दुसरी गोष्ट माणसाच्या ठिकाणी असलेल्या गुणांना जास्तीत जास्त वाव मिळणं, जे आपण मघाशी पाहिलं, की जाणीवपूर्वक निर्मितीतूनच माणसाच्या गुणांचा विकास होऊ शकेल. यंत्राचा एक भाग यादृष्टीने जेव्हा माणूस काम करतो तेव्हा त्याच्या गुणांचा विकास होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. यंत्राचा निर्जीव भाग, बदलता येण्या-सारखा, एवढंच महत्व माणसाला उरतं. तो अनस्किल्ड लेबर होतो. खरंतर आपण सगळेच आता अनस्किल्ड लेबर बनत चाललो आहोत, कारखानदाराला वाटलं तर हाताखालची १०० ची १०० माणसं एकावेळी टर्मिनेट करून दुसरी भरता येतात, हजारो माणसं काढता येतात पुन्हा भरता येतात. काही फरकच पडत नाही. कारण कामात फारसं कौशल्य लागतच नाही. अशी अवस्था त्या सामान्य श्रमिकांची झालेली आहे. म्हणजेच कष्टकरी माणूस हा यंत्राचा सुटा भाग झालेला आहे. त्याची निर्मितीक्षमता संपलेली आहे. हे जर टाळायचं असेल, त्याच्या गुणांचा विकास जर व्हायचा असेल, तर ते केवळ अनुरूप तंत्रज्ञानानेच होऊ शकतं.

सर्वात महत्वाची गोष्ट माझ्या मते माणसाला माणसांशी जोडणं ही असते. आज मानवी संबंधामध्ये एक कोरडेपणा येत चाललेला आहे. परात्मभाव येत चाललेला आहे. परात्मभाव 'ॲलीनीएशन' असा शब्द मार्क्स वापरतो. त्याचा अर्थ माणसा-पासून, समाजापासून, कामापासून तुटून पडणे. मुलं आईबापा-पासून तुटतात, भाऊ भावांपासून तुटतो, स्पर्धा, मुक्तस्पर्धा, फक्त

स्पर्धा हेच मानवी प्रयत्नांचं प्रेरक ठरतं, सर्वस्व ठरतं. दिवसेंदिवस आपण अधिकाधिक मुक्त स्पर्धेकडं चाललो आहोत. मुक्त स्पर्धेकडं जाण्याचा अपरिहार्य परिणाम माणूस माणसापासून तोडण्यात होतो. माणूस माणसाच्या गळयाचा घोट घेण्याकडे प्रवृत्त होण्याकडे होतो. ही गोष्ट आपल्याला वेगळी सांगण्याची आवश्यकता नाही. यशस्वी होण्याकरता वाटेल त्या मार्गाचा वापर करायचा म्हटल्यावर बुडणारी बकरी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी आपल्या पिलाला खाली दाबून वर उभी राहते तसे सर्वत्र होणार हे अगदी उघड आहे. इथं माणसाचं माणूसपण संपतं. माणसाच्या कल्पकतेला वाव मिळणं, गुणाच्या वाढीला वाव मिळणं, माणूस माणसाशी जोडला जाणं हे ज्या तंत्रज्ञानातून साध्य होतं अशा अनुरूप तंत्रज्ञानाचीच निवड त्यामुळे आपल्याला करावी लागेल.

अनुरूप तंत्रज्ञान विकेंद्रितच असू शकते. हे तंत्रज्ञान केंद्रित असूच शकत नाही. याउलट आता आपण जे तंत्रज्ञान स्वीकारलंय ते विकेंद्रित असू शकत नाही. हे आपण ध्यानात ठेवलं पाहिजे. आपण कितीही विकेंद्रीकरणाच्या बाता मारल्या तरी खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण आताच्या अर्थव्यवस्थेमध्ये होऊच शकत नाही. नियोजन जिथे मध्यवर्ती आहे, अर्थसत्ता जिथे मध्यवर्ती आहे, केंद्रसत्ता जिथे अत्यंत बलवत्तर आहे, आणि एकाच पक्षाची राजवट जेव्हा अनेक वर्षेपर्यंत एखाद्या राज्यात टिकते तिथे आर्थिक सत्तेचं व राजकीय सत्तेचं अमाप केंद्रीकरण झालेलं असतं आणि हे अपरिहार्यच आहे. आता तुम्ही जर म्हणाला की आता कायदा करून या व्यवस्थेचं अंमळ विकेंद्रीकरण करून टाकू या तर ते होऊ शकत नाही. जे होतं ते आताच्या सारखं रोगट विकेंद्रीकरण होणं क्रमप्राप्त आहे. हे खरं विकेंद्रीकरण नाही. केवळ केंद्राच्या

वतीने काम करणाऱ्या ह्या एजंट संस्था आहेत. केंद्राच्या अनुदानां-शिवाय या संस्था कामचं करू शकत नाहीत. स्थानिक साधन-सामग्री उभी करणं, इथल्या मनुष्यबळाचा वापर करून घेणं, स्थानिक लोकांची कृतिप्रवणता जागी करणं, लोकांची उपक्रम-शीलता जागवणं अशा ज्या काही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रिया व कार्यपद्धती असतात त्यांना आताच्या विकेंद्रीकरणात मुळीच वाव नाही. आपल्या संविधानानं जेव्हा विकेंद्रीकरणाची तरतूद केली तेव्हाच हे स्पष्ट झालं की हे संविधान गांधीवादी संविधान नाही. त्यामुळे गांधींना ज्या अर्थानं सत्तेचं विकेंद्रीकरण अभिप्रेत होतं त्या अर्थाने या संविधानात तरतूदच झालेली नाही. आणि या संविधानाच्या आधाराने जे काही कायदे तयार केले गेले आहेत आणि जे काय विकेंद्रीकरण केलं गेलेलं आहे त्याचे उफराटे परिणाम होत आहेत. हा केवळ अपघात नाही हे मी कालही सांगितलं आणि आपणा सर्वांना प्रत्यक्ष अनुभवानेसुद्धा माहीत आहे. आताच्या विकेंद्रीकरणातून असेच परिणाम अपरिहार्यत: होणार होते, हा अपघात नाही किंवा हा विकेंद्रीकरण राबवणाऱ्या काही व्यक्तींचा दोष नाही. जेव्हा कुणी असं म्हणतात की आमचा सरपंच हा फार करप्ट आहे, त्याला आता जोड्यानच हाणलं पाहिजे, तेव्हा हे सांगायला हवं की त्या सरपंचाला जोड्यानं मारून काहीं उपयोग होणार नाही, कारण हा एका सरपंचाचा किंवा एका सभापतीचा किंवा एका जिल्हा परिषद अध्यक्षाचा दोष नाही, हा सर्वस्वी या विकेंद्रीकरणाच्या सदोष संकल्पनेचा दोष आहे. आजच्या विकेंद्रीकरणाच्या कायद्यामध्ये ग्रामसभेची तरतूद आहे पण ग्रामसभा ही प्रत्यक्षात कुठेही अस्तित्वात नाही. याचं कारण हे आहे की ग्रामसभा अस्तित्वात येणं हे आजच्या

विकेंद्रीकरणाच्या चौकटीत बसतच नाही. गावाच्या लोकांच्या सामान्य माणसांच्या हाती खऱ्या अर्थानं निर्णयाची सत्ता येणं त्यात अपेक्षितच नाही. समजा एखादी गोष्ट व्हावी किंवा होऊ नये याचा निर्णय जर खरोखर गावातली गरीब माणसं घेणार असतील तर गावातल्या धनिकांचं, गावातल्या वरचढ लोकांचं फावणारच नाही! म्हणजे सध्याची जी विकेंद्रीकरणाची व्यवस्था आहे ती वरचढांना अधिक वरचढ करणारी आहे आणि आताच्या विकासप्रक्रियेशी अनुरूपच आहे.

परंतु समुचित तंत्रज्ञानावर आधारित असलेली विकेंद्रीत सत्ता जेव्हा निर्माण होईल तेव्हा ती खरीखुरी विकेंद्रीत सत्ता असेल. केंद्रसत्ता ही आपोआपच दुय्यम होत जाईल. राज्यसत्तेवरचा एक आंधळा विश्वास आताच्या विकासप्रक्रियेच्या मुळाशी आहे तो असा की राज्यसत्ता ही कल्याणकारी असते, राज्यसत्ता ही सर्वांचं कल्याण करते, राज्यसत्तेकरवी समाजाचा समग्रतेनं विकास होऊ शकतो, समाजात, विकासात कुठेही उजवं-डावं असं होणार नाही, कारण राज्यसत्ता ही नि:पक्षपाती आहे. राज्यसत्ता ही तटस्थ असते हा जो विश्वास आहे तोच मुळात चुकीचा आहे. राज्यसत्ता ही नेहमीच बलवत्तर वर्गाची बटीक असते. आणि केवळ मार्क्सनं हे सांगितलं म्हणून नव्हे तर ही सर्वत्र वस्तुस्थिती आढळते. वर्गीय समाजात राज्यसत्ता ही बलवत्तर वर्गाची दासी असते. बलवत्तर वर्गांचे हितसंबंध ती सदैव सांभाळत असते. त्यामुळे ती राज्यसत्ता जर सर्वेसर्वा असेल तर ती विकासकार्यक्रमसुद्धा त्या वरचढ वर्गाच्या हितांसाठीच राबवेल हें उघडच आहे. गांधींनी सांगितलेला जो मार्ग आहे त्याखेरीज यातून सुटका नाही. ते म्हणतात, व्यक्तीचं राज्यसत्तेवरचं अवलंबन हे कमीत कमी

असलं पाहिजे, आणि व्यक्तीला राज्यसत्तेपासून स्वायत्तपणे जगता आलं पाहिजे. राज्यसत्तेवरचं अवलंबन कमी होणं आणि स्थानिक पातळीवरच्या सत्ताकेंद्रांना खऱ्या अर्थानं निर्णय-सत्ता प्राप्त होणं व स्वावलंबी होता येणं हे खऱ्या विकेंद्रीकरणाचं लक्षण असतं. या स्थानिक स्वराज्य संस्था खऱ्या अर्थानं स्वावलंबी केव्हा होतील? जेव्हा त्यांना आपल्या सबंध परिसराचा आणि लोकांचा स्वतंत्रपणे विचार करण्याची मुभा राहील तेव्हा. आपली जी साधन-सामुग्री आहे त्यामध्यें आपण अमूक असा विकास करू शकतो, असं स्वातंत्र्य स्थानिक लोकांना लाभेल. विकासाच्या योजनांचा पुढाकार स्थानिकांच्या हाती राहील तेव्हा साहजिकच पर्यावरणाचं नैसर्गिक संतुलन हे आपोआप टिकून राहिल. अशा प्रकारच्या विकेंद्रित व्यवस्थेमध्ये स्वाभाविकच मग वरचढ लोकांच्या मागण्यांना अग्रक्रम राहणार नाही, तसा वावच राहणार नाही. काल आपण पाहिल्याप्रमाणे मागण्या कुणाच्या ? २० टक्के लोकांच्या. कशाच्या ? चंगळवादी जीवनाच्या. उत्पादन कशासाठी करणार ? तर त्यांच्यासाठी करणार असं चित्र तेथे उद्भवू शकत नाही.

आजच्या आपल्या विकास प्रतिमानाच्या मुळाशी जिला इंग्रजीमध्ये आम्ही थिअरी ऑफ डिस्पेन्सिबिलिटी असं म्हणतो ती आहे. थोडासा स्पष्ट करण्याचा मुद्दा आहे. डिस्पेन्सिबिलिटी म्हणजे असं की काही माणसं ही नगण्य असतात, डिस्पेन्सिबल असतात. त्यांच्यावाचून काही अडत नाही. राजीव गांधींच्या काळामध्ये जेव्हा २१ व्या शतकाची भाषा फार जोरात चालली होती तेव्हा विशेषत: हा दृष्टिकोण झपाट्यानं पुढे आला. राजीव गांधी असं म्हणाले होते की " द एक्सलन्स शुड नॉट बी

सॅक्रिफाईसड् फॉर द सेक ऑफ युनिव्हर्सालिटी." एखादी गोष्ट सार्वत्रिक करण्याच्या अट्टाहासापायी काही लोकांच्या विशेष गुणवत्तांचा बळी पडता कामा नये. "एक्सलन्स मस्ट बी एनकरेजड्." आपण शिक्षणाचं उदाहरण घेऊ. सगळयांना शिक्षण देण्यासाठी जर आपणाला काही लोकांना आवर घालावा लागला किंवा अडवून टेवावं लागलं किंवा जर त्यांना विशेष संधी नाकाराव्या लागल्या तर ते योग्य होणार नाही अशी त्यांची भूमिकाच होती. त्यामुळे न का शिकेनात लोक, ८० टक्के लोक असेनात का निरक्षर, आपल्याला काय करायचंय ? ९० टक्के बायका निरक्षर आहेत, असेनात का ? काही जे शिकू शकतात त्यांना मात्र हवं ते प्रगत व उच्च शिक्षण मिळालंच पाहिजे ! त्यांना "हाय टेक्नॉलॉजी" चं शिक्षण मिळालं पाहिजे ! त्यांना परदेशात जाऊन शिकता आलं पाहिजे ! इथे निर्माण झालेले सर्व इंजिनिअर्स परदेशात गेले तरी चालेल पण उच्च शिक्षण त्यांना उपलब्ध झालं पाहिजे. कारण ती माणसं "इनडिस्पेन्सिबल" आहेत. ती माणसंच विचारात घेण्यासारखी आहेत. कारण फक्त तीच २१ व्या शतकात जाण्याची आकांक्षा बाळगतात, सामर्थ्य बाळगतात आणि ज्यांच्या ठिकाणी हे सामर्थ्य नाही, ही कुवत नाही त्यांना मरु देत, त्यांना राहू देत मागे. ते अगदी १७ व्या शतकात राहिलेत तरी चालेल. आपण आपलं २१ व्या शतकात जायचं. २१ व्या शतकात जाणाऱ्यांची संख्या १० टक्के असली तरी असेना का, मग बाकीचे सगळे डिस्पेन्सिबल आहेत. बाकीचे सगळे नगण्य आहेत. त्यांचा विचार करण्याची आपल्याला गरज नाही, त्यांच्यासाठी खोळंबून बसण्यात काही मतलब नाही. युद्धाच्या किंवा आकस्मिक संकटाच्या काळात जीव घेऊन पळून

जाताना लोक लंगडे, म्हातारे, पांगळे, लुळे असलेल्यांचा विचार करीत नाहीत, सोडून देतात त्यांना तिथे. तसा हा विचार आहे. ही आजची आपली विदारक वस्तुस्थिती आहे.

विकेंद्रित व्यवस्थेमध्ये प्रत्येक आयुष्य सारख्याच मोलाचं मानलं गेल्यामुळे असं होऊच शकत नाही. कारण विकेंद्रित व्यवस्थेमध्येच खऱ्या अर्थाने माणसाला चेहरा असतो. बिन-चेहऱ्याचा माणूस निर्माण होणं हे समाजाच्या विकासाचं नव्हे तर अधःपतनाचं लक्षण आहे. आणि आज फार मोठ्या प्रमाणावरती बिनचेहऱ्यांच्या माणसांची पैदास सुरू झालेली आहे. बिनचेहऱ्याचा माणूस म्हणजे ज्याला ओळख नसते, ज्याला नाव नसतं, ज्याला गांव नसतं, ज्याला काही अस्तित्व नसतं, ज्याला काही अस्मिता नसते. तो एक फक्त युनिट असतो रेशनकार्डावरचा, तेवढंच फक्त त्याचं अस्तित्व असतं. राष्ट्रीय स्टॅटिस्टिक्समध्ये दर माणसीच्या हिशेबामध्ये तो एक माणूस असतो. त्याच्या पलिकडं त्याला चेहरा नसतो. आणि अशाप्रकारचा बिनचेहऱ्याचा माणूस हा गुन्हेगार सहज होऊ शकतो, कारण त्याला कोणी ओळखतच नाही. खेड्यामध्ये मी परवा सांगितल्याप्रमाणे बुटपॉलिश करायला कोणी धजत नाही, कारण त्याला घरंदाजपणा असतो. आईबाप असतात, भाऊबंद असतात. त्याला लोक ओळखतात आणि तो अमक्याचा मुलगा असं करतो असं त्याला कुणीतरी म्हणणारं असतं, हटकणारं असतं. तो गुन्हेगारी करू शकत नाही, किंवा असं कुठलंही कुळाला बट्टा लावणारं कृत्य करू शकत नाही. शहरामध्ये आल्यानंतर यापैकी काहीच नाही. तो खिसे कापत जरी फिरला तरी त्याला कोणी ओळखत नसतं. माणसाला माणसानं न ओळखणं, माणसाची ओळख नष्ट होणं, अस्मिताच

नष्ट होणं आणि माणूस हा फक्त एक भौतिक गरजांमागे धावणारा यंत्रमानव होणं असं खऱ्या विकेंद्रित व्यवस्थेत होत नाही. तळपातळीवर माणसं एकमेकांना ओळखतात, माणसं एकमेकांना जगवतात, एकमेकांना मदत करीत असतात आणि 'सिम्पथी' ने सहानुकंपेनें सारा समाज बांधला जातो. त्यामुळेच हा समाज माणसांचा समाज असतो. त्यांच्यामध्ये सौहार्द असतं, सुसंवाद असतो. त्यांच्यामध्ये भांडणं होणारच नाहीत अशातला भाग नाही. हे काय मी अगदी नंदनवनातलं वगैरे वर्णन करीत नाही. तर माणसं भांडतीलसुद्धा पण एकूण जनजीवनात प्राधान्येकरून सुसंवाद असेल, म्हणजे विसंवाद असला तरी तो मिटवण्याची परिणामकारक यंत्रणा असेल, त्यामुळे माणसं ही माणसासारखी असतील.

माणसाची प्रगती ही केवळ भौतिक प्रगतीच्या मोजमापाने मोजता येत नाही. दर हजारी किती शाळा आहेत ? दर हजारी किती दवाखाने आहेत ? दर हजारी किती इंजिनियर झालेत ? दर हजारी किती प्राध्यापक झालेत ? अशा भौतिक प्रगतीच्या मापाने विकास मोजलाच जाऊ शकत नाही. सुखी समाजाचं चित्र हे आपल्याला भौतिक मोजमापांनी काढताच येणार नाही. कारण सुख ही गोष्टच मुळात सापेक्ष आहे. सुख कशावर अवलंबून आहे ? आजची व्यवस्था असं मानते की गरजा अमर्याद वाढवत नेण्यावर सुख अवलंबून आहे, स्वामित्व व संग्रह अमर्याद वाढवत जाण्यावर सुख अवलंबून आहे. माझ्या संग्रही किती गोष्टी आहेत याच्यावरून माझी प्रतिष्ठा अवलंबून आहे. माझ्या किती इमारती आहेत, माझे किती प्लॉटस् आहेत, माझे किती दागदागिने व पैसे बंकेत आहेत, किती शेअर्स आहेत ?

यांवरून माझं सुख ठरतं. हे खरं आहे का पण ? माझं सुख, माझी प्रतिष्ठा हे माझ्या भौतिक स्वामित्वावर आधारित आहे की माझ्या अर्थपूर्ण अस्तित्वावर आधारित आहे ? मला तरी असं वाटतं की माणसाचं मोठेपण हे त्याच्या अर्थपूर्ण जगण्यावर अवलंबून आहे.

भौतिकतेच्या पसाऱ्यात अडकलेला माणूस आपलं माणूसपण हरवतो असं जेव्हा मी म्हणतो, जे एरिक फ्रॉमनं 'सेन सोसायटी' मध्ये फार चांगल्या पद्धतीनं सांगितलेलं आहे त्याचा मी पुनरुच्चार करतो. ताळ्यावर असलेला समाज म्हणजे काय तर अर्थपूर्ण जगणाऱ्या माणसांचा समाज. ताळ्यावर नसलेला समाज म्हणजे काय तर केवळ भौतिक भराभराटीच्या मृगजळामागे धावणाऱ्या माणसांचा समाज. हा दुसऱ्या प्रकारचा समाज सुखी होऊ शकत नाही, हा समाज आनंदसुद्धा घेऊ शकत नाही. नैसर्गिक सौंदर्याचा आस्वादसुद्धा घ्यायचा कसं विसरतो आम्ही हे एरिक फ्रॉमच्या पुस्तकात छान सांगितलेलं आहे. नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद आम्ही घेत नाही. आम्ही काय करतो ? आम्ही पिक-निकला जेव्हा जातो तेव्हा कॅमेरा घेऊन जातो, आणि मग कुठलंही चांगलं दृश्य दिसलं की आम्हाला ते कॅमेऱ्यात पकडायचं असतं, नैसर्गिक डोळ्यांनी बघून त्याचा उपभोग घेण्याचं माणूसपण आम्ही हरवलेलं असतं. आम्हाला फक्त संग्रही अल्बममध्ये लावण्यासाठी निर्जीव छायाचित्र हवं असतं. त्यामुळे एखाद्या सौंदर्याचा साक्षात्कार झाल्यावर डोळे दिपून जाणं किंवा अशी समाधी लागणं किंवा आपण देहभान विसरून जाणं यातला जो आनंद असतो, त्या उत्कट आनंदाचा क्षण आमच्या आयुष्यात येईनासाच झालाय. आम्हाला फक्त संग्रही काहीतरी हवं असतं.

आम्ही दक्षिण भारत पाहून आलो, आम्ही उत्तर भारत पाहून आलो, आम्ही परदेशी जाऊन आलो, आम्ही काश्मिरी ड्रेस घालून घोड्यावर बसून जोडीनं फोटो काढले एवढंच. हे फक्त लोकांना दाखवण्यासाठी. निसर्ग सौंदर्याचा अनिर्वचनीय आनंद आपण घेतल्याचं मात्र सहसा कोणी व्यक्त करीत नाही. माणूस फक्त हे सांगू शकतो. छायाचित्रं तर कॅमेऱ्यानं आपोआप काढता येतात, विकतही मिळतात, कुठे जाण्याची गरजच नाही. आज तंत्रज्ञानाची प्रगती इतकी झालेली आहे की रिमोटकंट्रोलने आपण इथं बसून सर्व देशातील काय अवकाशातले फोटोसुद्धा काढून आणू शकतो. चंद्रावरचे फोटोसुद्धा काढून आणलेत. म्हणजे डोळ्यांच्या ऐवजी कॅमेरा हेच जर जग पाहण्याचं साधन असेल तर त्यात 'मानवी' आनंदाचा भाग कितीसा येणार ?

माणसाच्या गरजा असं जेव्हा मी म्हणतो तेव्हा माणसाच्या या शब्दावर माझा भर असतो, गरजा या शब्दापेक्षासुद्धा. माणसाच्या काही गरजा असतात, 'ह्युमन वॉण्टस्' असा शब्द एरिक फ्रॉमने वापरला आहे, कोणत्या गरजा असतात माणसाच्या? निर्मितीचा आनंद मिळण्याच्या, इतर माणसांशी संवाद करण्याच्या. त्यांची परिपूर्तता न होणं हे उपासमारीपेक्षासुद्धा भीषण संकट असतं. ह्या मानवी गरजा उपभोगातून किंवा चंगळवादातून पूर्ण होत नाहीत. या मानवी गरजा मानवी समाजाच्या निर्मितीतूनच पूर्ण होतात. मानवी समाज हा अमर्याद उपभोगापेक्षा संयमावर आधारलेला असतो. मी येथे विरक्तीचं तत्वज्ञान सांगत नाहीं, मी दारिद्र्याचं गौरवीकरण करत नाही. कुणीतरी सांगितलं की गांधीजी हे दारिद्र्याचं गौरवीकरण करत होते. खोटं आहे. गांधीजी ज्या दारिद्र्याचं गौरवीकरण करीत होते ते दारिद्र्य

परिस्थितीनें लादलेलं, अगतिक करणारं दारिद्रच नव्हतं तर स्वेच्छेने स्वीकारलेलं, माणसाला उन्नत करणारं दारिद्रच होतं. मला दहा सूट शिवता येतात, पण एकही सूट न शिवता साधे कपडे घालायचं मी ठरवतो असं हे दारिद्रच असतं. ओंगळ श्रीमंती-पेक्षा साधेपणाचं आयुष्य हे जास्त सुखद असू शकतं. कारण ते अर्थपूर्ण अस्तित्व शक्य करतं.

मी म्हणतो, साध्या आदिवासींचं जीवन जर आपण उदाहरणार्थ घेतलं तर असं दिसेल की त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर संयम आहे. तुम्हाला सांगतो अनेक टोळ्यांचे अभ्यास झालेले आहेत. आणि त्या टोळ्यांच्या अभ्यासामध्ये असं आढळलं आहे की ती माणसं वाटेल ते नाही खात, ते शिकारीं असतात आणि जंगला-मध्ये अनेक प्राणी असतात. पण काही प्राणी ते अवध्य व अभक्षच मानतात. त्यांची काही कुलचिन्हं असतात. एखाद्या टोळीचं कुलचिन्ह जर सर्प हा प्राणी असेल तर त्या टोळीची माणसं साप खात नाहीत सर्पाची पूजा करतात. का करतात ? कारण त्यांचं माणूसपण यात सामावलेलं असतं की मला हे सहज उपलब्ध आहे तरी मी खात नाही. मला हे सहज उपलब्ध असूनही मी खात नाही कारण मी संयम पाळतो, कारण मी माणूस आहे. आपल्या जगात मात्र आपण असं पाहतो की आपली भूक या विज्ञानाच्या स्वीकारामुळे आणि या व्यक्तिवादी विकासाच्या स्पर्धात्मक-प्रतिमानाच्या स्वीकारामुळं इतकी वाढलेली आहे की प्राण्यांपेक्षासुद्धा आपली भूक जास्त आहे. प्राणी विवेक करतात, विधिनिषेध पाळतात, प्राणी पोटापेक्षा जास्त खात नाहीत, प्राणी प्रजोत्पादनाखेरीज केवळ सुखभोगासाठी शरीरसंबंध

करीत नाहीत, प्राणी बलात्कार करीत नाहीत, आम्ही माणसं मात्र करतो, कारण सुखोपभोगाची आमची व्याख्याच मुळात स्वामित्वावर आधारलेली आहे अर्थपूर्ण जीवनावर नाही. अनेक बलात्कारांच्या मागे स्त्रीवरती आपला अधिकार गाजवणं, स्त्री ही आम्ही मालमत्ता मानतो हे सिद्ध करणं हाच हेतू असतो. तेव्हा या समाजरचनेच्या सगळ्या व्याधींच्या मुळाशी ही जी पश्चिमी मूल्यव्यवस्था आहे, ही जी चंगळवादी मूल्यव्यवस्था आहे तीच नाकारली पाहिजे.

" हिंदस्वराज " ची मूळ भूमिका नेमकी हीच होती की आम्हाला नैसर्गिकपणं जगता आलं पाहिजे. निसर्गाशी आम्हाला सतत संवाद करता आला पाहिजे. निसर्गाचे आम्ही एक घटक म्हणून जगलं पाहिजे. माणूस हा या सबंध चराचर सृष्टीचा एक भाग आहे आणि विनम्रपणे त्यानं सृष्टीच्या इतर भागां-बरोबर स्वतःला जुळवून घेवून राहिले पाहिजे आणि यातच त्याचं आणि सबंध सृष्टीचं कल्याण आहे. तथाकथित विकासाच्या राक्षसी महत्वाकांक्षी, अहंकारी आणि स्वार्थप्रेरित विकासाच्या मागे लागून माणसानं स्वतःचंच नव्हे तर सृष्टीचंही अस्तित्व धोक्यात आणलेलं आहे. त्यामुळे माणसं आपल्या " मानवी " जीवनापासूनच दुरावत चाललेली आहेत.

ज्याला आपण विकास मानतो तो विकास तर नाहीच परंतु तो या सुंदर ग्रहाला भकास करण्याचा एक उपद्व्याप आहे. मानवी सभ्यतेचा इतिहास असं सांगतो की जिथे जिथे माणूस कधीकाळी राहिला तिथे तिथे आज वाळवंट आहे. याचं कारण त्यानं निसर्गात उपलब्ध संसाधनाचा अत्यंत बेसुमार गैरवापर केलेला

आहे. याचं कारण त्यानं जंगलं तोडून टाकली, स्वार्थासाठी निसर्ग हवा तसा वापरला. आज "टाइम्स ऑफ इंडिया" चा रोजचा अंक २०–२५ पानी असतो आणि अशी डझनोगणती विविध भाषेतील दैनिके देशात निघतात. तेव्हा रोज किती बांबू संपलेले असतात हे आपल्या मनात कधीच येत नाही. कारण आम्हाला वर्तमानपत्र हवं असतं. विचार करायचा नाही. जंगलापाठोपाठ जंगलं नष्ट होतात आणि कुणाच्या स्वार्थासाठी नष्ट होतात ? एकूण आपल्याच सर्व भाईबंदांच्या स्वार्थासाठी नष्ट होतात. वाळवंटीकरण होणार आहे या संपूर्ण पृथ्वी नावाच्या ग्रहाचं, ओझोनचा थर फुटला तर आपण कुणीच शिल्लक राहणार नाही हे कालच मी आपणास सांगितलं. तेव्हा या सगळ्या विकास-क्रमाचा आपल्याला विचार केला पाहिजे.


केवळ आपल्याला भयग्रस्त करणं, केवळ आपल्याला कुठल्या-तरी दूरस्थ अशा संकटाचा इशारा देऊन अस्वस्थ करणं हा माझ्या बोलण्याचा हेतू नाही. परंतु ही जी वस्तुस्थिती आहे ती फक्त आपल्यासमोर आणायची आहे. आम्ही ज्याला विकास म्हणतो तो विकास नाही, ती आत्मवंचना आहे ही अमानुष व्यवस्था आहे. आणि या अमानुष व्यवस्थेत आम्ही मूठभर लोक या देशाच्या कोटयावधीं लोकांच्या हिताचा बळी देऊन आमचं उखळ पांढरं करीत आहोत. आपण निगरगट्ट झालो आहोत. लोकांना गोळ्या घालून ठार केल्याबद्दल आम्हाला वाईट वाटतच नाही. स्वतःच्या हक्कांसाठी भांडणाऱ्या लोकांच्या लढ्यांबद्दल आम्हाला आपुलकी वाटतच नाही. आपला मध्यमवर्ग गेंड्याच्या कातडीचा झालेला आहे असं मला वाटतं. त्या कातडीवरती

ओरखडा काढण्याचा अल्पसा प्रयत्न करावा एवढाच फक्त हेतू माझ्या मनात हे सारं सांगताना होता.

आपण जर काही केले नाही तर आपला विनाश अटळ आहे. हे मी काही ज्योतिषशास्त्राच्या वगैरे आधारावर म्हणत नाही. मी म्हणतोय ते जगभर आजपर्यंत माणसाचं झालं, त्याच्या दुष्कृत्याचे जे दुष्परिणाम त्याला भोगावे लागले आहेत, त्याच्या आधारे मी बोलतोय. विकासाचा आताचाच नमुना पुढे चालू राहिला तर भोपाळसारखी गॅसकांडं वारंवार होणारच आणि हेच ॲसिड रेन किंवा विषारी वायू पाणी...हे सगळे दुष्परिणाम अटळ ठरणार आहेत. स्वार्थी व मतलबी धनवंतांच्या हितासाठी निरागस अशा बहुसंख्य गरीब लोकांना आणि आजच्या पिढीच्या स्वार्थासाठी पुढच्या सर्व पिढ्यांनासुद्धा हे दुष्परिणाम भोगावे लागणार आहेत. या भयंकर भवितव्याचा एक गंभीर इशारा करणं एवढंच फक्त माझ्या सबंध मांडणीचं प्रयोजन होतं.

तीन दिवस, तीन वेगवेगळ्या शीर्षकांतर्गत पण एकाच विषयाच्या अनुषंगाने ही मांडणी करण्याचा प्रयत्न मी केला. तो कितपत सफल झाला हे आपण ठरवायचं आहे. परंतु प्रबोधनाच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून मला ज्या चार गोष्टी वाचून, ऐकून, पाहून कळल्या त्या आपल्यासारख्या विचार करणाऱ्या लोकांच्या समोर ठेवणं मला अगत्याचं वाटलं. माझा हा हेतू काही प्रमाणात तरी साध्य झाला असावा असं मी समजतो. संयोजकांनी या तीन व्याख्यानांच्या निमित्ताने हे माझे विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे आणि

आपण तिन्ही दिवस येऊन अत्यंत शांतपणे, सगळे विक्षेप, विषयांतरं आणि फापटपसारा सहन केला आणि या व्याख्यानांना चांगला प्रतिसाद दिला याबद्दल मी आपल्या सगळ्यांचे आभार मानतो आणि आपली रजा घेतो. धन्यवाद !



# नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड च्या
# ' यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले ' ची
# गेल्या दोन दशकांची वाटचाल

(साल, वर्ष, विषय आणि व्याख्याते असा या सूचीचा क्रम आहे)

□ १९७३ वर्ष १ ले

राजकारण आणि समाजजीवन
प्राचार्य देवदत्त दाभोळकर, पुणे.

भारतीय समाजवाद: काही विचार
डॉ. मा. पं. मंगुडकर, पुणे

भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा
प्रा. गं. बा. सरदार, पुणे

□ १९७४ वर्ष २ रे

भारतीय लोकशाही: काही विचार
प्रा. ए. एम. खान, पुणे

लोकशाही समाजवाद
वि. अ. नाईक, पुणे

अविकसित समाजवादाचे स्वरूप
सदाशिव बागाईतकर, पुणे

□ १९७५ वर्ष ३ रे

आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग
डॉ. भा. शं. भणगे, मुंबई

समाज सुधारणेच्या समस्या
त्र्यं. कृ. टोपे, मुंबई

सद्यःस्थिती
डॉ. प्र. चिं. शेजवलकर, पुणे.

□ १९७६ वर्ष ४ थे

भारतीय समाजवादाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग (दोन व्याख्याने)
गोपाळराव मयेकर, गोवा.

राजर्षि छत्रपती शाहू आणि नवभारताची मागणी
पद्मभूषण धनंजय कीर, मुंबई.

□ १९७८ वर्ष ६ वे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती
डॉ. भालचंद्र फडके, पुणे.

□ १९७९ वर्ष ७ वे

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे (दोन व्याख्याने)
आमदार पी. बी. साळुंखे, कोल्हापूर.

भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन
डॉ. सत्यरंजन साठे, पुणे.

□ १९८० वर्ष ८ वे

महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण कालचे, आजचे व उद्याचे
(दोन व्याख्याने)
डॉ. जनार्दन वाघमारे, लातूर.

शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान
खासदार प्रतापराव भोसले, भुईंज.

○ १९८१ वर्ष ९ वे

विज्ञान आणि मानवी मूल्ये
( तीन व्याख्याने )
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.

○ १९८२ वर्ष १० वे

महाराष्ट्र धर्माची नवी व्याख्या
(दोन व्याख्याने)
नानासाहेब गोरे, पुणे,

○ १९८३ वर्ष ११ वे

बॅ. पी. जी. पाटील, सातारा.
तात्यासो कोरे, वारणानगर.
सौ. शांताबाई किर्लोस्कर, पुणे.
(जमावबंदी आदेश जारी झालेने ही व्याख्याने झाली नाहीत)

○ १९८४ वर्ष १२ वे

कार्ल मार्क्स - जीवन-विचार आणि समाजशास्त्र (तीन व्याख्याने)
वसंत पळशीकर, मंचर.

○ १९८५ वर्ष १३ वे

डॉ. पंजाबराव जाधव, पुणे.
द्वा. भ. कर्णिक, मुंबई.
(रशियाचे राष्ट्राध्यक्षांचे निधनामुळे ही व्याख्याने झाली नाहीत.

□ १९८६ वर्ष १४ वे

१) यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन;
२) यशवंतराव चव्हाण: काँग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते;
३) दिल्ली दरबारातील यशापयशाची मीमांसा (तीन व्याख्याने)

द्वा. भ. कर्णिक, मुंबई.

□ १९८७ वर्ष १५ वे

धर्म आणि इतिहास लेखन
( दोन व्याख्याने )
डॉ. रावसाहेब कसबे, संगमनेर.

○ १९८८ वर्ष १६ वे

भारतीय बहुजन समाजाच्या प्रगतीची वाटचाल (दोन व्याख्याने)
अॅड. डॉ. पंजाबराव जाधव, पुणे.

□ १९८९ वर्ष १७ वे

महात्मा फुले: सामाजिक विचार आणि-आजचे सामाजिक संदर्भ (दोन व्याख्याने)
प्रा. बा. ह. कल्याणकर, औरंगाबाद

□ १९९० वर्ष १८ वे

भारतीय राजकारण अभ्यासाची एक दिशा (दोन व्याख्याने)
डॉ. राम जोशी, मुंबई.

○ १९९१ वर्ष १९ वे

सामाजिक न्याय व सामाजिक परिवर्तन (दोन व्याख्याने)
प्रा. मे. पुं. रेगे, मुंबई.

□ १९९२ वर्ष २० वे

आपल्या विकासाची दिशा आणि लोकशाहीचे भवितव्य (तीन व्याख्याने)
डॉ. भा. ल. भोळे, नागपूर.

---

○ अशी दर्शविलेली व्याख्यानांची पुस्तके प्रकाशित झालेली नाहीत.

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ. क्र. | ओळ क्र. | मुद्रणदोष | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १ | ६ | त्यांनी वारंवार | त्यांनी येथे वारंवार |
| ५ | ५ | कारखान्यात मजूर | कारखान्यातला मजूर |
| ८ | १२ | विकास पाहिजे | विकास असला पाहिजे |
| ८ | १३ | क्षेत्रात विकास | क्षेत्रातला विकास |
| १२ | ८ | आधारतत्वं सबंधपणे | आधारतत्वही सबंधपणे |
| १६ | ११ | सरपंचाना जाब | सरपंचाना-पंचाना जाब |
| १७ | २२ | सफल झालं असं | सफल झालं असतं असं |
| ३६ | २४ | या प्रकारच्या | याच प्रकारच्या |
| ४१ | २४ | मात्र आला | पात्र झाला |
| ४२ | १७ | त्याला तंत्रज्ञानामागचं | त्याला त्या तंत्रज्ञानामागचं |
| ४८ | १२ | मोटार - मायकल | मोटर - सायकली |
| ४९ | ९ | दिलेले होते | दिलेलेच होते. |
| ६३ | २५ | हा आमचा दुष्मन | हा दलित हा आमचा दुष्मन |
| ६७ | २१ | या गरजा आम्ही | या गरजा काय आम्ही |
| ७२ | २५ | वापरतो, फक्त मनःपूतपणे पाणी | फक्त मनःपूतपणे पाणी वापरतो |
| ८८ | १ | या सगळयांनां | तेव्हा या सगळयांना |
| ९२ | १३ | कायम राहोल | कायमच राहील |
| ९५ | ३ | माहिती की मी | माहिती आहे की मी |
| ९५ | २१ | त्यामुळे | त्याच्यामुळे |
| ९९ | १९ | शेतीजमिनीवर | शेतजमिनीवर |
| १०१ | २१ | पिढयांना संसाधनसंपत्तीपैकी | पिढयांना त्यांच्यापैकी |
| १०७ | ६ | " आर ॲण्ड डी " रिसचं | " आर ॲण्ड डी "– रिसर्चं |
| १०९ | १ | लागणार नाही | लागणारच नाही |
| १११ | २३ | त्याचा अर्थ माणसापासून | त्याचा अर्थ माणूस माणसापासून |
| ११२ | १४ | जे तंत्रज्ञान स्वीकारलंय ते विकेंद्रित असूं शकत नाही | जे तंत्रज्ञान स्वीकारलंय ते केंद्रितच असूं शकतं, ते विकेंद्रित असूं शकत नाही. |
| १२१ | ४ | घालायचं मी ठरवतो | घालायचं जर मी ठरवतो |

टीप : व्याकरण दृष्टया शासकीय नियमांना अनुसरून या पुस्तिकेत किरकोळ मुद्रणदोष राहून गेलेत. तथापि ज्यामुळे संदर्भ / अर्थ बदलतात असे मुद्रणदोष येथे वाचकांच्या सोयीसाठी ' शुद्धिपत्रा ' त मुद्दाम दिलेले आहेत.

## ‘ यशवंतराव चव्हाण स्मृती सदन ’



करा‍ड नगरपालिकेच्या साहित्य - नाट्य - कला केंद्राची वास्तु